टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
अभिमत विद्यापीठ
(दुरशिक्षण विभाग)

सामाजिक शास्त्रातील एम.फिल.(इतिहास) पदवीसाठी
सादर करावयाचा लघू शोध प्रबंध

# "अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान"


अभ्यासक

**श्री.गवळी अरूण भास्कर**

मार्गदर्शक

**प्रा.डॉ. अंबाडे किसन मारूती**
अधिव्याख्याता, इतिहास विभाग,
न्यु आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर


सन – डिसेंबर २००८

# प्रतिज्ञापत्र

टिळक विद्यापीठाच्या दुरशिक्षण विभागांतर्गत एम.फिल. पदवीसाठी सादर केलेला **"अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान"** या विषयावरील लघू शोध प्रबंध प्रा.डॉ.अंबाडे किसन मारूती यांच्या मार्गदर्शनाखाली मी पूर्ण केला आहे. हे संशोधन अन्य कोणत्याही पदवीसाठी या व इतर कोणत्याही विद्यापीठात सादर केलेले नाही.

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, प्रबंधात वापरलेल्या साहित्य, कागदपत्राचे आवश्यकतेप्रमाणे त्या-त्या ठिकाणी ऋणनिर्देश केलेले असून हे संशोधन व प्रतिपादन मी स्वतंत्रपणे केलेले आहे.

दिनांक –

स्थळ –

अभ्यासक

**श्री. गवळी अरूण भास्कर**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.गवळी अरूण भास्कर यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम.फिल.पदवीसाठी **“अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान”** या विषयावरील लघू शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

त्यांचे संशोधन संपूर्ण नवे असून यापूर्वी या विषयावरील संशोधन कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

दिनांक –

स्थळ –

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. अंबाडे किसन मारूती**
अधिव्याख्याता, इतिहास विभाग,
न्यु आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

# ऋणनिर्देश

माझ्या या लघू शोध प्रबंधाच्या यशस्वीतेसाठी अनेकांचे सहकार्य लाभले म्हणूनच या प्रबंधास पूर्णत्व प्राप्त झाले आहे. **"अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान"** या विषयावरील लघू शोध प्रबंध पूर्ण करत असताना माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.अंबाडे के.एम यांनी बहुमोल असे मार्गदर्शन केले व हा प्रबंध लिहिण्यास सतत प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय हा संशोधन प्रबंध पूर्ण होऊ शकला नसता असे मला वाटते. त्यांचे ऋण व्यक्त करणे माझे आद्य कर्तव्यच समजतो.

ज्या विद्यापीठाने मला ही संधी उपलब्ध करून दिली त्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे इतिहास विभागाचे प्रमुख, प्रा.डॉ.देशपांडे तसेच प्रा.डॉ.कुंभोजकर मॅडम यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य, डॉ.रजनीश बार्नबस यांनी डॉ.भा.पां.हिवाळेंवर प्रबंध लिहिण्यास परवानगी देऊन सर्वतोपरी मदत केली. तसेच डॉ.सरला बार्नबस यांनी आपला अमूल्य वेळ देऊन डॉ.भा.पां.हिवाळेंच्या आठवणी सांगितल्या व दुर्मिळ अशी माहिती पुरवली त्याची मदत मला प्रबंध लेखनात झाली त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो. अहमदनगर कॉलेजचे उपप्राचार्य कवडेसर, पोकळेसर यांचेही वेळोवेळी प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले. डॉ.सुधीर शर्मा यांनीही मार्गदर्शन केले. त्याबरोबरच अहमदनगर महाविद्यालयाचे ग्रंथपाल लोंढेसर, सुरेशसर, कसोटेसर

व इतर कर्मचारीवर्ग यांनी वेळोवेळी मदत करून दुर्मिळ पुस्तके व वृत्तपत्रांचे अंक उपलब्ध करून दिले त्यांचाही मी आभारी आहे.

अहमदनगर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख, प्रा.डॉ.धोंडीराम वाडकर यांचे हा प्रबंध पूर्ण करताना मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रा.विजय कदम, डॉ.वृषाली तारे, प्रा.सचीन मोरे, प्रा.डॉ.सताप्पा चव्हाण, प्रा.बंडेलु मॅडम, डॉ.सुभाष पुलावळे, डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. हे सर्वच मार्गदर्शक व सहाय्यक ज्या बी.पी.एच.ई. सोसायटीमुळे मला उपलब्ध होऊ शकले त्यांचाही मी आभारी आहे.

ज्यांच्यामुळे मी हा एम.फिल.चा प्रबंध पूर्ण करू शकलो असे माझ्या कुटुंबातील आई सौ.राधाबाई, वडील श्री.भास्कर गवळी, भाऊ बाळासाहेब व वहीण शारदा, वहिनी मिरा, भाची आयोध्या भागवत यांचे पाठबळ व सहकार्यानेच हे काम पूर्णत्वास गेले त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

माझा हा प्रबंध पूर्ण होण्यास सहकार्य करणारे शुभेच्छा देणारे माझे सहकारी व मित्र प्रा.गणेश माळी, दीपक बेरड, घुंगार्डे सर, मते सर, संभाजी आखाडे, केदार राजू, विलास धनवे, सिनारे सर, प्रा.बेंजामिन गायकवाड, म्हस्के प्रकाश, महेश वाघ, सुशील काळे, संतोष घाटविसावे, योगेश होंडे या सर्वांचा मी ऋणी आहे.

**श्री. गवळी अरूण भास्कर**

अर्पणपत्रिका

आई वडील व गुरू

यांचे चरणी.........

# अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संशोधन पद्धती | १ – १३ |
| २. | डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे जीवनकार्य | १४ – ४४ |
| ३. | डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शैक्षणिक कार्य | ४५ – ९३ |
| ४. | डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिक कार्य | ९४ – १२४ |
| ५. | डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक आणि वाङ्मयीन कार्य | १२५ – १४९ |
| ६. | मूल्यमापन | १५० – १५८ |
| ७. | परिशिष्ट एक ....................<br>परिशिष्ट दोन .................... | १५९– १६०<br>१६१ |

# प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

- **प्रस्तावना**

विषयानुसार संशोधनाच्या पद्धती वेगवेगळया असतात. तसेच संशोधन करीत असताना काही महत्त्वपूर्ण गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात त्याशिवाय संशोधन पूर्ण होत नाही. प्रथमतः संशोधनाचा विषय ठरवून पुढील गोष्टींचा विचार करावा लागतो.

- **संशोधन समस्या**

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे अहमदनगरच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. अहमदनगरसारख्या ग्रामीण व मागासलेल्या भागात उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. समाजातील सर्व स्तरातील लोकांना उच्च शिक्षण खुले केले. त्यांनी सुरू केलेल्या अहमदनगर महाविद्यालयाचा विस्तार आज मोठया प्रमाणावर झालेला आहे. बहुजन समाजाला उच्चशिक्षण त्यांनी उपलब्ध करून दिले. त्याचबरोबर त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन नंतरच्याकाळात अहमदनगर जिल्ह्यात अनेक महाविद्यालये स्थापन झाली. त्यामुळे डॉ.हिवाळे हेच खरे अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षणमहर्षी आहेत. काळाच्या ओघात अनेक शिक्षणमहर्षी निर्माण होत आहेत. परंतु शिक्षण प्रसारक हिवाळेंच्या कार्याची जाण लोकांना नाही. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक कार्य समाजासमोर आणणे ही एक समस्या आहे.

डॉ. हिवाळेंनी स्थापन केलेल्या अहमदनगर महाविद्यालयांतर्गत अनेक कोर्स चालविले जातात. त्याचबरोबर त्यांच्या कार्याविषयी निबंध व वक्तृत्व स्पर्धा होतात. मात्र त्यांच्या जीवनाची समग्र माहिती मिळेल असे एकही पुस्तक नाही. अनेक विद्यार्थी व सुशिक्षित तरूण अहमदनगरमध्ये उच्चशिक्षणाची सुरूवात कशी झाली याची माहिती

मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात पण त्यांनाही माहिती मिळत नाही. यासंबधी माहिती उपलब्ध व्हावी यादृष्टीने हा प्रबंध लेखनाचा निर्णय घेतलेला आहे.

आजपर्यंत भा.पा.हिवाळे यांनी फक्त शैक्षणिक क्षेत्रातच कार्य केले आहे असे लोक मानतात. त्यांना डॉ.हिवाळेंच्या सामाजिक कार्याविषयी माहिती नाही. खरे तर त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानही महत्त्वाचे आहे. त्यांनी ज्ञानोदयासारख्या जुन्या वृत्तपत्रातून संपादक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व आपले सुधारकी विचार समाजापर्यंत पोहोचविले. एवढेच नव्हेतर ज्ञानोदय नियतकालिक बंद पडण्याच्या मार्गा वर असताना त्याचा आर्थिक भार स्वतः स्वीकारून हे नियतकालिक बंद पडू दिले नाही. पुढे १९५१ मध्ये ज्ञानोदयाचे संपादकत्व सोडल्यानंतर स्वतःचे उषा साप्ताहिक सुरू केले व आपले सामाजिक शैक्षणिक विचार त्यातून प्रभावीपणे मांडले व समाजजागृती घडविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी मांडलेले विचार समाजासाठी आजही उपयुक्त आहेत. त्याचा अभ्यास होऊन ते समाजासमोर येणे गरजेचे आहे. याशिवाय त्यांचे साहित्यिक कार्यही महत्त्वाचे आहे. परंतु ते आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेले आहे.

वरील सर्व समस्यांशिवाय डॉ.हिवाळेंचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी हे सर्व कार्य सर्वसाधारण कुटुंबातून पुढे येऊन केलेले आहे. एक सर्वसाधारण कुटुंबातील व्यक्ती आपल्या अंगभुत गुणांच्या जोरावर उच्चपदावर कशी पोहोचते हे पाहणे गरजेचे आहे. म्हणून मी “अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान” ही समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे**

“अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान” या विषयाचा अभ्यास हा त्यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा

असला तरी त्या अनुषंगाने समकालिन घटना घडामोडींच्या आकलनासाठी तो महत्त्वाचा आहे. म्हणून पुढील उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी केली आहे.

१. शिक्षणमहर्षी डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या जीवनकार्याविषयी माहिती जाणून घेणे.

२. शिक्षणमहर्षी डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे अहमदनगर, मुंबई येथील शैक्षणिक कार्य जाणून घेणे.

३. डॉ.हिवाळे यांनी मांडलेल्या विचारातील मार्गदर्शक तत्त्वे आजही किती आवश्यक आहेत याचा अभ्यास करणे.

४. डॉ.हिवाळे यांनी आदर्श शिक्षक, शिक्षण प्रसारक, महाविद्यालय संस्थापक व विद्यार्थी प्रेमी अशा भूमिकांतून केलेली कामगिरी अभ्यासणे.

५. राजकारणापासून अलिप्त राहून शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे त्यांचे कार्य अभ्यासणे.

६. एक प्रथितयश लेखक, संपादक व प्रकाशक म्हणून त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा अभ्यास करणे.

७. डॉ.हिवाळे यांच्या धार्मिक कार्याचा अभ्यास करणे.

८. डॉ.हिवाळे यांच्या संघर्षमय जीवनाचा अभ्यास करणे.

९. डॉ.हिवाळे यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

ही उद्दिष्टये डोळयासमोर ठेऊन मी संशोधन कार्य हाती घेतलेले आहे आणि ते पूर्ण करीत आहे.

- **संशोधनाच्या मर्यादा**

"अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान" या विषयावरील संशोधनात काही मर्यादा आहेत. हा विषय

एका व्यक्तीच्या जीवनकार्यावर आधारित असल्यामुळे त्याला कालखंडाची मर्यादा पडते. इ.स.१८८९ ते १९६१ हा कालखंड संशोधनासाठी निवडला आहे. त्याचबरोबर डॉ. हिवाळेंच्या समकालिन व्यक्ती हयात नसल्याने त्यांच्या कार्याविषयी विशेष माहिती मिळत नाही. त्याबरोबरच डॉ.हिवाळे स्वतःविषयी कुठेही लेखन केलेले नाही तसेच त्यांचे आत्मचरित्रही नाही. त्यामुळे समकालिनांनी लिहिलेले चरित्र व वृत्तपत्रे यातील संदर्भांचा आधार घेत हे संशोधन करावे लागते. अशा काही मर्यादा लक्षात घेऊन हे संशोधन मी केले आहे.

- **संशोधनाचे महत्त्व**

डॉ.भा.पां.हिवाळे यांचे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. डॉ. हिवाळेंनी अत्यंत बिकट परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले. तसेच आर्थिक परिस्थितीवर मात करत अमेरिकेत जाऊन डॉक्टरेट पदवी मिळविली. स्वातंत्र्यपूर्वकाळात फक्त उच्चभ्रू वर्गातील लोकच परदेशात जाऊन शिक्षण घेवू शकत मात्र हिवाळेंच्या अथक परिश्रमातून हे शक्य झाले होते. अनेक तरूणांना प्रेरणादायी ठरणारी ही घटना आहे.

आपल्याला उच्च शिक्षण घेण्यासाठी जे हाल कष्ट सोसावे लागले ते इतरांना सोसावे लागू नये यासाठी त्यांनी अहमदनगर सारख्या दुष्काळी व ग्रामीण भागात पहिले महाविद्यालय सुरू केले. यामुळे दलित व आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. हे करत असताना त्यांना अनेक अडचणी आल्या व संघर्षही करावा लागला यांचा विचारही महत्त्वाचा वाटतो. स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असणाऱ्या भारताला तरूण शिक्षित पिढींची गरज लागेल हे ओळखून त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी मांडलेल्या शिक्षणविषयक विचारांची आजही गरज असल्याने ते विचार समोर आणणेही या अभ्यासातून शक्य होणार आहे.

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिक विचारही कांतिकारी होते. ते वेगवेगळया नियतकालिकातून व साप्ताहिकातून लेखन करत असत. या सामाजिक व धार्मिक विचारांचा अभ्यास होणेही आवश्यक वाटते. एकुणच विविध क्षेत्रातील त्यांचे कार्य पाहता त्यांचा विचार होण्याची आवश्यकता आजही वाटत असल्याने या विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे.

- **संशोधन साहित्याचा आढावा**

इतिहासात भूतकालिन घटनांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे त्या घटनांचा अभ्यास करताना आपल्याला अस्सल पुराव्यांची आवश्यकता असते. त्यांचे वर्गीकरण प्राथमिक व दुय्यम साधने असे केले जाते.

**प्राथमिक साधने**

१. ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे भाग १ व २ – हा ग्रंथ डॉ. हिवाळे यांनी संपादीत केलेला आहे. यात ज्ञानोदय नियतकालिकातील १८४२ ते १९४२ या कालखंडातील निवडक लेखांचे संपादन त्यांनी केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील अहमदनगर जिल्ह्याची सामाजिक व शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यास हा ग्रंथ उपयोगी पडतो. १९४२ मध्ये ज्ञानोदय सोसायटीने हा ग्रंथ प्रकाशित केला.

२. अनक्षर लोकांसाठी सोपी वाचनपद्धती – हे पुस्तक डॉ.हिवाळे यांनी प्रौढशिक्षण प्रसाराच्या हेतूने लिहिलेले आहे. त्याच बरोबर नवीन लिहायला व वाचायला शिकणाऱ्यांसाठी सोपे आणि सुटसुटीत उतारे दिलेले आहेत. या पुस्तकादवारे त्यांनी साक्षरता प्रसारासाठी हातभार लावला असे म्हणण्यास वाव आहे. तत्त्वविवेचक प्रेस मुंबई यांनी १९३६ मध्ये हे पुस्तक प्रकाशित केले.

३. बायबल व तत्संबद्ध इतिहास – डॉ.हिवाळेंच्या या पुस्तकावरून त्यांना जागतिक इतिहासाची माहिती होती याचा प्रत्यय येतो. या पुस्तकात त्यांनी जगातील वेगवेगळया संस्कृत्यांविषयी माहिती लिहिलेली आहे. तसेच ख्रिश्चन धर्माच्या उगमाविषयी माहिती दिलेली आहे. तत्त्वविवेचक प्रेस मुंबई यांनी १९३६ मध्ये हे पुस्तक प्रकाशित केले.

४. इंग्रजी शब्द – हा डॉ.हिवाळेंनी लिहिलेला इंग्रजी शब्दकोश आहे. आपल्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी शिकण्याच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी हा शब्दकोश रचलेला आहे.

५. रोजची अध्यात्मिक प्रगती – या पुस्तकाच्या आधारे डॉ.हिवाळेंचा धार्मिक दृष्टिकोन कसा होता हे समजण्यास मदत होते.

**वृत्तपत्रे**

१. ज्ञानोदय – हे नियतकालिक १८४२ मध्ये सुरू झाले होते. यातून सुरूवातीपासून समाजजागृती घडवून आणण्याचे कार्य वेगवेगळया संपादक व लेखकांनी केलेले होते. म्हणूनच याला सुधारणेचा वारसा होता. तोच वारसा पुढे चालविण्याचे काम डॉ. हिवाळेंनी केले. १९२१ ते १९५१ या कालावधीत त्यांनी ज्ञानोदयाचे संपादक म्हणून कार्य केले व आपले सुधारकी विचार समाजापर्यंत पोहोचविले.

२. उषा – हे डॉ.भा.पां. हिवाळे यांनी १९५२ मध्ये सुरू केलेले साप्ताहिक होय.

**दुय्यम साधने**

१. डॉ.भा.पां.हिवाळे यांचे जीवनकार्य – पुस्तकात वेगवेगळया लेखकांचे हिवाळे यांच्या विषयीचे लेख आहे. संशोधन करत असताना हे पुस्तक उपयक्त ठरते.

२. आमचे कृतार्थ सहजीवन – हे आत्मचरित्र डॉ.हिवाळे यांच्या पत्नी रूथबाई हिवाळे यांनी लिहिलेले आहे. यातून हिवाळेंच्या विषयी आठवणींना त्यांनी उजाळा दिला आहे. संशोधन करत असताना हे आत्मचरित्र उपयक्त ठरते.

३. मर्मबंधातील ठेव – हे डॉ.हिवाळे यांची मुलगी डॉ.सरला बार्नबस यांचे आत्मचरित्र आहे याचाही संशोधन करत असताना उपयोग होतो.

वरील महत्त्वपूर्ण ग्रंथाशिवाय 'म. ज्योतिबा फुले' हे पुस्तकही संदर्भ म्हणून वापरले आहे त्याचे लेखक धनंजय कीर हे आहेत. बी.एल.ग्रोवर / एन.के.बेल्हेकर यांचे 'आधुनिक भारताचा इतिहास', पुणे विद्यापीठातील इतिहास विभागातून प्रकाशित होणारी इतिहास संशोधन पत्रिका, सरदार मिरीकर यांचे 'अहमदनगर शहराचा इतिहास', 'हुद्देदार माधुरी यांचा 'भास्करायण' हा कविता संग्रह यांचा संशोधन करताना उपयोग होतो. दुय्यम साधन म्हणून वरील संदर्भाशिवाय दै.लोकमत, दै.समाचार, दै.लोकसत्ता या वृत्तपत्रांचाही संशोधन करताना आधार घेतलेला आहे.

- **सैद्धांतिक पार्श्वभूमी**

मी संशोधनासाठी निवडलेला विषय वंचितांचा इतिहास या घटकात मोडणारा आहे. गतकाळात जे सत्य आहे पण आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेले आहे. ते समाजासमोर आणण्याचे कार्य वंचितांचा इतिहास करतो. डॉ.हिवाळे यांचे कार्यही अशा रितीने दुर्ल क्षित राहिल्याने ते आजपर्यंत समाजासमोर येऊ शकले नाही. विशेष म्हणजे त्यांचे कार्य समाजाला प्रेरणा देणारे व विचार अंतर्मुख करायला लावणारे आहेत.

स्वातंत्र्यपूर्वीच्या कालखंडात अहमदनगर जिल्हा तसेच आसपासचा भाग सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता. उच्च शिक्षण घेण्याची अनेकांची इच्छा

असूनही ते घेता येत नव्हते. उच्च शिक्षण ही श्रीमंताची मक्तेदारी होती ती हिवाळेंनी मोडीत काढली व शिक्षण सर्वसामान्य दलितांपर्यंत पोहोचविले.

सामाजिक दृष्टिकोनातून विचार करता डॉ.हिवाळेंनी ज्ञानोदयासारख्या जुन्या वृत्तपत्रातून आपले समाजसुधारणाविषयक विचार निर्भिडपणे मांडले. त्यांनी मांडलेले सुधारणा विषयक विचार आजही समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत. प्रौढशिक्षण ही काळाची गरज ओळखून त्यासाठी परिश्रम घेतले. 'उषा' साप्ताहिकातून शैक्षणिक जागृती घडविली.

डॉ.हिवाळे हे काही उच्चभ्रू कुटुंबातून आलेले नव्हते तर ते अतिशय बिकट परिस्थितीतून शिक्षण घेऊन पुढे आलेल्यांपैकी एक होते. एका सर्वसाधारण कुटुंबात जन्म घेऊन आपल्या दीर्घोद्योगीपणामुळे त्यांनी हा चमत्कार घडवून आणला होता. म्हणून त्यांच्या शैक्षणिक कार्यावरून ते खरे शिक्षण महर्षी आहेत असे वाटते.

- **गृहितके**

संशोधन करीत असताना संशोधन विषयासंबधी काही गृहीतके निश्चित करावी लागतात. त्याचप्रमाणे माझ्या संशोधनाविषयी गृहितके पुढीलप्रमाणे आहेत.

१. शिक्षण महर्षी डॉ.हिवाळे प्रतिकूल परिस्थितीतून कसे घडले याचा आदर्श समाजासमोर ठेवता येईल.
२. शिक्षण महर्षी डॉ.हिवाळे यांचे शैक्षणिक कार्य समाजासमोर आणता येईल.
३. डॉ.हिवाळे यांच्या साहित्याचा अभ्यास करताना त्यांचे चौफेर लेखन समाजासमोर आणता येईल.
४. डॉ.हिवाळे यांचे ज्ञानोदयातील कार्य समाजासमोर आणता येईल.
५. अहमदनगरमध्ये पहिले महाविद्यालय सुरू करताना त्यांना कोणत्या अडचणी आल्या त्यांचा अभ्यास करता येईल.

६. डॉ.हिवाळे यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार अभ्यासता येतील.

७. डॉ.हिवाळे यांचे विद्यार्थी प्रेम अभ्यासता येईल.

८. डॉ.हिवाळे यांनी केलेल्या विविध क्षेत्रातील कार्यातून त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अभ्यासता येईल.

वरील गृहितके निश्चित करून मी संशोधन प्रबंध पूर्ण केला आहे.

- **संशोधन पद्धती**

इतिहासामध्ये गतकालिन मानवी जीवनाच्या विभिन्न घटकांचा त्यात घडलेल्या प्रसंगाचा, महत्त्वाच्या घडामोडींचा, परिवर्तनाचा अभ्यास संशोधकाला करावा लागतो. गतकाळ हा दृष्टिआड गेलेला व अज्ञात असल्यामुळे त्याची माहिती करून घेण्यासाठी त्याचा शोध घ्यावा लागतो. गतकालिन माहिती तत्कालिन साधनसामग्रीच्या दवारा उपलब्ध होते. गतकालीन स्त्रोतसाधनाचे अध्ययन करून संशोधकाला अज्ञात गतकाळाचा शोध घ्यावा लागतो. या संशोधनाचे सामान्यतः तीन प्रकार पडतात.

१.कथनात्मक किंवा निवेदनत्मक संशोधन – या प्रकारच्या संशोधनात एखाद्या घटनेबाबत, प्रसंगाबाबत अगर विषयासंबधी नवी माहिती, आजपर्यंत अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सुसंबद्ध रीतीने वाचकापुढे मांडणे हा संशोधनाचा पहिला प्रकार होय. याचा मूळ उद्देश गतकालीन बाबींवर प्रकाशझोत टाकणे, ज्ञानाचे नवे दालन खुले करणे हा असतो. यात नव्या माहितीच्या संशोधनावर त्याच्या पद्धतशीर सुसंगर मांडणीवर भर असतो.

२. विश्लेषणात्मक संशोधन – या प्रकारात एखाद्या घटकाविषयी माहिती प्रकाशात आणण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या ऐतिहासीक माहितीचा, साधनांचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रस्थापित प्रमेयावरून भिन्न प्रमेय मांडणे हा उद्देश असतो. उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो.

३ . मूलगामी संशोधन – या प्रकारातील संशोधन अधिक तात्त्विक व मौलिक स्वरूपाचे असते . इतिहास विषयाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनातून काही नवे सिद्धांत मांडण्याचा त्यात प्रयत्न असतो .

वरील तीन संशोधन प्रकारांपैकी माझा संशोधनाचा विषयी मुलभूत किंवा मूलगामी संशोधन कथनात्मक किंवा निवेदनत्मक प्रकारात बसणारा आहे . डॉ . भा . पां . हिवाळे यांच्या विषयी अज्ञात असणारी माहिती सुसंबद्ध रीतीने वाचकांसमोर आणण्याचा उद्देश आहे .

- **सामग्री संकलन पद्धती**

संशोधन करताना वेगवेगळया साधनातून मिळणारी माहिती कशाप्रकारे संकलित करायची स्त्रोत साधनांचे परिशीलन करताना त्यातील आवश्यक ती माहिती स्मरणात ठेवणे केवळ अशक्यच असते त्याचबरोबर सर्व तपशील स्मरणात ठेवून लेखनाचे वेळी त्याचा योग्य वापर करणे कठीण असते . त्यासाठी वेगवेगळया सामग्री संकलन पद्धतीचा आधार घ्यावा लागतो . ऐतिहासिक सामग्री संकलनासाठी पुढील पद्धतीचा वापर केला जातो .

१ . सर्वेक्षण /निरिक्षण पद्धती

२ . प्रश्नावली पद्धती

३ . मुलाखत पद्धती

४ . टिपणे घेण्याची पद्धती

वरील पद्धतींपैकी टिपणे घेण्याची पद्धती मी संशोधनासाठी वापरली आहे .

टिपणे घेण्याची पद्धती – संशोधनास सुरूवात केल्यानंतर वेगवेगळया साहित्याचे वाचन केले . ते करत असताना महत्त्वाचे व आवश्यक वाटलेले मुद्दे पद्धतशीरपणे कार्डवर टिपून घेतली . त्यावेळी पुढील गोष्टी लक्षात घेतल्या .

१ .ग्रंथाचा मथळा, लेखकाचे नाव, प्रकाशन, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे अनेक खंड असल्यास खंडाची नोंद, अनेक आवृत्त्या असल्यास वापरलेल्या ग्रंथाच्या आवृत्तीची नोंद घेतली आहे .

२ .टिपण मुद्देसुद व विषयानुसार केले .

३ .मुद्दयाच्या नोंदीनंतर पृष्ठक्रमांक दिला .

४ .संदर्भासाठी घेतलेले विधान त्यात कोणताही बदल न करता घेतले .

ही टिपणे करताना एका ठराविक आकाराचे कार्ड वापरले . त्यानंतर त्याचे वर्गी करण केले . वर्गीकरणानंतर मिळालेल्या तपशिलाची कारणमीमांसा करून कारणांची योग्य मांडणी केली . त्यापूर्वी कागदपत्राचे अंतरंग व बाह्यांग परीक्षण करून घटितांची योग्यप्रकारे जुळणी केली . अशाप्रकारे वेगवेगळया टप्प्यातून गेल्यानंतर संशोधन प्रबंध तयार झाला .

- **प्रकरण नियोजन**

"अहमदनगरच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे योगदान" या विषयाचे संशोधन करीत असताना प्रबंधाची प्रकरणशः मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे .

प्रकरण पहिले – संशोधनपद्धती

या प्रकरणात संशोधन करत असताना कोणत्या पद्धतीचा अवलंब केला तसेच संशोधनाची पार्श्वभूमी काय आहे यासारखे मुद्दे मांडलेले आहेत . त्यामध्ये प्रामुख्याने संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधन साहित्याचा आढावा, सैद्धांतिक पार्श्वभूमी, गृहितके, प्रकरण नियोजन या घटकांचे विश्लेषण केले आहे .

प्रकरण दुसरे – डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे जीवनकार्य

या प्रकरणात हिवाळे यांचा जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, कुटुंब याविषयी विस्तृत लिहिले आहे. त्याचबरोबर त्यांच्या कार्यात त्यांच्या पत्नीचा सहभाग कशाप्रकारचा होता हे दाखविले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ.हिवाळे यांचे अमेरिकेतील कार्य, विल्सन कॉलेजातील कार्य, ज्ञानोदयाचे संपादक म्हणून केलेले कार्य, शिक्षणक्षेत्रातील कार्य, वाङमयीन व धार्मिक क्षेत्रातील कार्य वृद्धापकाळ व मृत्यू या घटकांचे थोडक्यात वर्णन केले आहे.

प्रकरण तिसरे – डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शैक्षणिक कार्य

या प्रकरणात हिवाळे यांचे शैक्षणिक विचार आजही कसे उपयुक्त आहेत याचे स्पष्टीकरण केले आहे. त्याचबरोबर विल्सन कॉलेजातील शैक्षणिक कार्य, ह्यूम हायस्कूलमधील कार्य व पुढे अहमदनगरसारख्या ग्रामीण भागात महाविद्यालय काढून केलेली शैक्षणिक कांती याविषयी दुसऱ्या प्रकरणात मांडलेले आहे. महाविद्यालय सुरू करताना त्यांना कोणत्या अडचणी आल्या व त्यांनी आपल्या बुद्धिचातुर्याने त्यावर कशी मात केली याविषयीचे लेखन दुसऱ्या प्रकरणात केले आहे. महाविद्यालय सुरू झाल्यानंतर पहिले प्राचार्य म्हणून डॉ.हिवाळेंच्या कार्यासंबधी तसेच सचिव असतानाच्या कार्यासंबधीची माहिती या प्रकरणात दिली आहे.

प्रकरण चौथे – डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिककार्य

या प्रकरणात हिवाळे यांचे समाजसुधारणा विषयक विचार कसे प्रभावी होते ते दाखविले आहे. त्याचबरोबर त्यांनी वेगवेगळया ख्रिश्चन कौन्सिलच्या अधिवेशनात पार पाडलेल्या जबाबदाऱ्यांविषयी लिखाण केले आहे. त्यांनी वेगवेगळया नियतकालिकातून व साप्ताहिकातून लेखन करून केलेली समाजजागृती त्यात प्रामुख्याने ज्ञानोदय व डॉ.हिवाळे ख्रिस्ती लोकशिक्षण मासिक व डॉ.हिवाळे, उषा साप्ताहिक व डॉ.हिवाळे,

सेवा नियतकालिक व डॉ.हिवाळे इ. घटकांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर प्रौढशिक्षण क्षेत्रातील कार्य या प्रकरणात विचारात घेतले आहे.

प्रकरण पाचवे – डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक व साहित्य क्षेत्रातील योगदान

या प्रकरणात हिवाळेंचे विचार धर्मनिरपेक्ष होते हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर धार्मिक कार्याला समाजसुधारणेची जोड कशी होती हे मांडलेले आहे. त्यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान व त्यांनी रचलेला इंग्रजी शब्दकोश याविषयी लिहिलेले आहे.

प्रकरण सहावे – मूल्यामापन

या प्रकरणात हिवाळेंचे कार्य कशाप्रकारे आधुनिक होते. तसेच समाजाला ते कसे मार्गदर्शक आहे हे दाखविले आहे. त्यांनी सर्वसाधारण कुटुंबातून पुढे येऊन केलेले होते. त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास वाचकाला व अभ्यासकाला प्रेरणा देऊन एक नवी दिशा देतो. एकंदरीत त्यांच्या सर्व कार्यातून स्वतंत्र भारताच्या विकासाला महत्त्वपूर्ण हातभार लागला हे दिसून येते याचे विवेचन केलेले आहे.

❖❖❖

# प्रकरण दुसरे

## डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे जीवनकार्य

प्रास्ताविक

२.१ डॉ.भा.पां.हिवाळे यांचा जन्म व बालपण

२.२ शिक्षण

२.३ नोकरी

२.४ विवाह

२.५ कुटुंब

२.६ पत्नी रूथबाईचे योगदान

२.७ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सेवाव्रत

२.८ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे अमेरिकेतील कार्य

२.९ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे विल्सन कॉलेजातील कार्य

२.१० डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे 'ज्ञानोदया'चे संपादक असतानाचे कार्य

२.११ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य

२.१२ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे वाङ्मयीन कार्य

२.१३ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक क्षेत्रातील कार्य

२.१४ वृद्धापकाळ व मृत्यू

❖❖❖❖❖

# प्रकरण दुसरे

# डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे जीवनकार्य

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात, अर्थकारणात अहमदनगर जिल्ह्याचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्याचे कारण म्हणजे अहमदनगर जिल्ह्याने स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्योत्तरकाळात सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात वेगाने प्रगती घडवून आणली आहे. महाराष्ट्राच्या नकाशावर अहमदनगर जिल्ह्याने वेगळा असा ठसा उमटवलेला आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या इतिहासाकडे कोणालाही डोळेझाक करून चालणार नाही. अहमदनगरच्या इतिहासाचा वेध घेत असताना आपल्याला मध्ययुगीन भारताच्या इतिहासाकडे दृष्टी वळवावी लागते. मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास घडविणाऱ्या व मराठेशाहीच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या निजामशाहीच्या या राजधानीस अहमदनगर असे म्हणतात. पंधराव्या शतकाच्या अखेरीस इ.स.१४८६ मध्ये बहामनी राज्याची शकले झाल्यानंतर फुटून निघालेल्या अहमदशहा बाहिरी याने या राज्याची स्थापना केली. "इ.स.१४९४ साली अहमदशहाने अहमदनगर या शहराची स्थापना केली."[१] अहमदनगरची निजामशाही १६३६ पर्यंत टिकली.

निजामशाही काळात या शहराने अहमदशहा, बुऱ्हाणशहा सुलताना चांदबीबी यासारख्या शूर वीरांची कारकीर्द पाहिली. तसेच मोगलांच्या आक्रमणाचा चमत्कारही भोगला. सलाबतखान, चंगेजखान, मलीक अंबर यांच्यासारखे मुत्सद्दी शहातादीर सारखे विदवान राजे, शहाजीराजे, कुवरसेन यांच्यासारखे हिंदू प्रधान, शहाशरीफ – मिरावली सारखे साधू पुरूष निजामशाहीच्या काळात होऊन गेले. निजामशाहीच्या पडत्या काळात

शहाजीराजांनी मुर्तजा निजामशहाला गादीवर बसवून राज्य कारभार हाती घेतला आणि परकीय आक्रमणापासून हे राज्य वाचविण्याचा प्रयत्न केला. मराठेशाहीची मुहूर्तमेढ तेव्हाच रोवली गेली. नंतरच्या काळात याच मराठ्यांनी आपले नियंत्रण दिल्लीच्या बादशहावर प्रस्थापित केले. शहाजहान बादशहाने निजामशाहीचा समूळ नाश करून अहमदनगर मोगलांच्या ताब्यात घेतले. इ.स. १७५७ मध्ये अहमदनगर पेशव्यांच्या ताब्यात आले. पुढे १८१८ पासून ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळातही अहमदनगर आघाडीवर होते. १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनाच्या काळात पं.नेहरू, वल्लभभाई पटेल, मौ. आझाद इ. महत्त्वाचे नेते नगरच्या भूईकोट किल्ल्यात बंदिवासात होते. या राष्ट्रपुरुषांच्या पदस्पर्शाने हे शहर पुनीत झाले आहे. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा जगप्रसिद्ध ग्रंथ पंडितजींनी याचकाळात शब्दबद्ध केला. डॉ.आंबेडकरांचा 'थॉट्स ऑन पाकिस्तान' आणि मौ.आझादांचा 'तुम्हारे खातीर' हे ग्रंथही याच शहरात लिहिले गेले.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही अहमदनगर जिल्ह्याने महाराष्ट्राचे नेतृत्व केलेले दिसून येते. "अहमदनगर जिल्ह्यातील शैक्षणिक विकास कार्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य स्पृहनीय ठरले आहे."[२] १८१३ नंतर कंपनीच्या धोरणात बदल झाला व ख्रिस्ती मिशनऱ्यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मान्यता दिली गेली. त्याचा लाभ घेऊन "अहमदनगरला २१ डिसें. १८३१ रोजी अमेरिकन मराठी मिशनचे कार्य सुरू झाले."[३] त्यांनी शैक्षणिक संस्था अनाथालये काढून ख्रिस्ती धर्मप्रसाराचे सहेतूक कार्य केले. मात्र त्यांच्या या कार्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक लोकांना शिक्षण प्रसाराची प्रेरणा मिळाली. शिक्षणाच्या सुधारणेमुळे सामाजिक सुधारणा घडून येण्यास वेळ लागला नाही. त्यामुळे हा जिल्हा महाराष्ट्रात सर्व क्षेत्रांत आघाडीवर राहिला. मिशनऱ्यांच्या टीकेमुळे नवशिक्षित हिंदी तरुणांमध्ये स्वधर्म परंपरांची अस्मिता जागी होऊन ते आत्मपरीक्षण करू लागले. मिशनऱ्यांप्रमाणे आपणही देशभर छापखाने वृत्तपत्र, कार्यशाळा

काढाव्यात, असे येथील लोकांना वाटू लागले. त्यातून श्रीमंत उच्च वर्गाने १८५१ मध्ये मुलींची शाळा सुरू केली. मिशनरी शिक्षणप्रसार कार्याचे पर्यावसान महाराष्ट्रभर शैक्षणिक संस्था वाढीसाठी प्रेरणादायक ठरले म.फुलेंनी अहमदनगरच्या मिशनरी शाळेपासून प्रेरणा घेऊन पुण्यात मुलींची पहिली शाळा आपल्या घरामध्ये सुरू केली.

मिशनऱ्यांपासून प्रेरणा घेऊन हिंदू – मुस्लिम यांनी नवतेची कास धरली. आतापर्यंत फक्त मॅट्रिक शिक्षणापर्यंत सोय अहमदनगर जिल्ह्यात होती हजारो तरुण मॅट्रिक परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणाची सोय नसल्याने आपले शिक्षण थांबवत होते ही गोष्ट डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या लक्षात आल्याने त्यांनी मिशनच्या मदतीने अहमदनगरला महाविद्यालय स्थापनेचा विचार मांडला. परंतु तो मिशनला पसंत न पडल्याने मिशनने नामंजूर केला. तेव्हा डॉ.हिवाळेंनी तो प्रत्यक्षात उतरवला व अहमदनगर जिल्हयात पहिले महाविद्यालय काढले. व उच्च शिक्षणाची मक्तेदारी मोडीत काढीत सर्वसामान्यापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा आणली त्यामुळे त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याच्या अभ्यासाशिवाय अहमदनगर जिल्ह्याचा शैक्षणिक विकास अपुरा ठरेल.त्यांनी आपल्या कार्याद्वारे अहमदनगर जिल्ह्यावर आपला ठसा कायमचा उमटवला. सामान्य परिस्थितीतून शिक्षण घेऊन आधुनिक विचारांची कास धरून निरपेक्ष भावनेने अहमदनगर भागाची सेवा डॉ.हिवाळे यांनी केली आहे.

## २.१ भा.पां.हिवाळे यांचा जन्म व बालपण

मनुष्य कोठे व कोणत्या परिस्थितीत जन्माला येतो हे माणसाच्या हाती नाही, पण अत्यंत बिकट परिस्थितीवर मात करून चिकाटीने प्रयत्न करून नावलौकिक मिळवणे सुजाण माणसाच्या हाती असते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ.भा.पां.हिवाळे होय. महाराष्ट्रातील सोलापूर या ठिकाणी त्यांचा जन्म झाला तो दिवस होता २२

जानेवारी १८८९ त्यांच्या आई वडिलांचे ते पहिलेच अपत्य होते. पुढे हा भास्कर नावाप्रमाणे तळपला व संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यातच नव्हे तर देश विदेशातही त्याच्या प्रकाशकिरणांचे तेजोवलय निर्माण झाले. डॉ.भा.पां.हिवाळे नंतर त्यांच्या माता – पित्यांना पाच मुली व एक मुलगा अशी एकूण सात अपत्ये झाली. पांडुरंग हिवाळेंची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखिची होती. ते स्वत: "ख्रिस्ती धर्मोपदेशकाचे"[४] काम करीत त्यामुळे त्यांचे उत्पन्न जेमतेमच होते. त्यातच एवढ्या मोठ्या मुलांचा सांभाळ करायचा त्यामुळे मिळणारी मिळकत अपुरी पडू लागली घरातील वातावरण धार्मि क असल्यामुळे बालवयातच भा.पां.हिवाळे यांच्यावर धार्मिक संस्कार झाले. भास्कर हिवाळे जसजसे मोठे होऊ लागले तसे त्यांच्या आई-वडिलांना त्यांच्या शिक्षणाने ग्रासले. शेवटी घरची आर्थिक स्थिती ठिक नसल्याने त्यांना अहमदनगर मराठी मिशनचा आधार घ्यावा लागला. बालवयातच हिवाळे हे शांत व मनमिळाऊ स्वभावाचे होते. आपल्या बोलण्याने ते इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधत असत. बालवयातच त्यांनी धार्मिक व इतर पुस्तके वाचनाची गोडी स्वत:ला लावून घेतली त्यामुळे त्यांच्या शिक्षकामध्ये ते प्रिय झाले.

अहमदनगरच्या मराठी मिशन शाळेत शिकत असताना त्यांना एका मोठ्या धक्कादायक प्रसंगास सामोरे जावे लागले. त्याकाळात देवी, कॉलरा, प्लेग यासारख्या आजारांच्या साथी वारंवार पसरत असत आजच्या सारख्या लस तेव्हा उपलब्ध नसल्याने अशा रोगांवर नियंत्रण मिळवणे अवघड होत असे. या साथीच्या रोगांत गावेच्या गावे ओसाड होत असत. असेच एका प्लेगच्या साथीत हिवाळेंचे " आई – वडील दोघेही साथीच्या रोगास बळी पडल्याची बातमी त्याला ऐकविण्यात आली."[५] ही बातमी ऐकून त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. आता ते त्यांच्या आई-वडिलांना कधीही पाहू शकणार नव्हते. कारण रोगाची लागण इतरत्र होऊ नये, म्हणून अशा प्रेतांचे लवकर दहन किंवा दफन करण्यात येत. या दु:खातून बाहेर पडणे हिवाळेंना आवश्यक होते.

कारण आता त्यांच्यापेक्षा लहान असणाऱ्या भावंडांचे पालकत्व त्यांच्यावर येऊन पडले. तेव्हा त्यांचे वय अवघे चौदा वर्षांचे होते. इतक्या लहान वयात त्यांनी ती जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांचे बालपण अतिशय खडतर गेले. याच काळात त्यांनी उच्च शिक्षण घेण्याचा संकल्प सोडला व त्या दृष्टीने मार्गक्रमण केले.

## २.२ शिक्षण :

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे वडील स्वत: धर्मोपदेशक असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाची योग्यप्रकारे काळजी घेतली व डॉ.हिवाळेंना अहमदनगर मराठी मिशनच्या शाळेत घातले. तेथे शिक्षण घेत असतानाच त्यांच्या खडतर जीवनास आरंभ झाला. बालवयातच घरापासून दूर यावे लागल्याने व मिशनच्या शाळेत शिक्षण घेतल्याने स्वावलंबनाची सवय त्यांना जडली ती त्यांनी जीवनभर जोपासली. शाळेत सर्वात हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला कोणतीही गोष्ट लवकरात लवकर आत्मसात करण्याच्या त्यांच्या गुणामुळे ते शिक्षकांत प्रिय झाले. डॉ.हिवाळेंचे "हायस्कूल पर्यंतचे शिक्षण अमेरिकन मिशन मुलांचे हायस्कूल, अहमदनगर येथे झाले."[६]

अहमदनगर मराठी मिशनच्या शाळेत शिक्षण घेत असताना एका प्लेगसारख्या दुर्धर आजाराने त्यांचे माता-पिता मृत्यू पावले त्यांच्या बालवयातच माता-पित्यांचे छत्र हरपले तेव्हाच या अनाथ मुलाने आपले भविष्य आपल्या हाताने घडवण्याचा निश्चय केला. कितीही संकटे आली तरी आपण शिक्षण सोडायचे नाही, असा निर्धार त्यांनी केला. भरपूर अभ्यास करून मॅट्रिक परीक्षा ते उत्तीर्ण झाले. पुढील शिक्षण घेण्यासाठी कधी अहमदनगर येथील मुलांच्या हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून तर कधी औषधाच्या दुकानात मदतनीस म्हणून त्यांनी काम केले. यातूनच त्यांनी आपल्या शिक्षणासाठी पैसा उभा केला. डॉ.हिवाळे यांचा शिक्षण प्रवास अतिशय खडतर होता. त्यांच्या स्वत:च्या

शिक्षणाबरोबरच त्यांच्या भावंडाच्या पालनपोषणाची जबाबदारीही त्यांच्यावर होती. ते एकदा एका पारश्याच्या दुकानात कामाला असताना त्यांनी मालकाला सर्वसामान्य शक्तिवर्धकाची बाटली मागितली. मालकाने कुणासाठी पाहिजे म्हणून विचारले तेव्हा हिवाळेंनी सांगितले की, "आई-वडील दगावले व लहान बहीण भावंडाना वाढीसाठी असल्या शक्तिवर्धकाची गरज असते. म्हणून त्या पारशी गृहस्थाला कळवळा आला आणि त्यांनी भास्करला त्या बाटल्यांचा एक खोकाच देऊन टाकला."[७] ते औषध डॉ. हिवाळेंनी आपल्या भावंडासाठी पाठवले. यावरून त्यांच्यावर असलेली पालकत्वाची जबाबदारी त्यांनी कशा पद्धतीने पार पाडली हे दिसून येते.

डॉ. हिवाळे यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजपासून झाला. परंतु तेथे त्यांचे मन न रमल्यामुळे एका वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढील दोन वर्षाच्या अभ्यासासाठी ते मुंबईच्या विल्सन कॉलेज येथे गेले. विल्सन कॉलेजमध्ये त्यांना पाहिजे असलेले वातावरण होते. तसेच उत्तम शिक्षकही होते. त्यांनी तेथे "तत्त्वज्ञान मुख्य विषय घेऊन मुंबई विश्वविद्यालयाची ग्रॅज्युएटची उपाधी मिळविली."[८] आता त्यांच्यापुढे पुढील शिक्षणाचा प्रश्न होता त्यावर त्यांनी लवकरच मात केली. पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्याचे त्यांनी ठरवले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात भारतातील प्रतिष्ठित व उच्चभ्रू घराण्यातील लोक अमेरिका व इंग्लंडसारख्या देशात जाऊन शिक्षण घेत, परंतु गरिबांसाठी व दलितांसाठी आर्थिक परिस्थिती हालाखिची असल्याने ही दारे बंद होती. डॉ. हिवाळेंनी त्यावर मात करीत मिशनच्या मदतीने अमेरिकेला शिक्षण घेण्याच्या दृष्टीने जाण्याची तयारी सुरू केली. मिशननेही त्यांचा उत्साह पाहून " बॉस्टनमधील ॲडोव्हर ईश्वर विज्ञानाच्या सेमीनरीत बॅचलर ऑफ डिव्हिनिटी पदवीसाठी त्याने प्रवेश घ्यावा असे ठरवले."[९] डॉ. हिवाळेंच्या जीवनातील ही संधी अतिशय अनमोल होती. त्यांनी आतापर्यंत शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे सार्थक होणार होते. त्यांनी केलेला त्याग,

संघर्ष सत्कारणी लागणार होता. तसेच तेथे असलेल्या अत्यंत हुशार व विद्वान शिक्षकांकडून ज्ञान प्राप्ती होणार होती ठरल्याप्रमाणे त्यांनी इ.स.१९१७ मध्ये अमेरिकेला प्रयाण केले आणि हॉर्वर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला. त्यांनी तेथे शिकत असताना सर्व ज्ञान स्पंजाप्रमाणे आत्मसात केले व "१९२0 मध्ये त्यांनी थिऑलॉजीकल सेमीनरीत उच्च पदवी घेतली."[१0] तेथे शिकत असताना त्यांच्या मनात हॉर्वर्ड विद्यापीठाविषयी जबरदस्त आकर्षण निर्माण झाले व यापुढील शिक्षण आपण येथेच घ्यावे अशी त्यांची इच्छा होती ती इच्छा एक ना एक दिवस पूर्ण करण्याचा निश्चय केला व पुन्हा आपल्या मायभूमीकडे प्रयाण केले.

अमेरिकेतून बी.डी.ची पदवी घेऊन आल्यावर अमेरिकन मराठी मिशनने त्यांना वेगवेगळ्या पदांवर कार्य करण्याची संधी दिली, परंतु हिवाळेंसाठी या संधी जितक्या महत्त्वाच्या होत्या तितकीच त्यांना पुढील शिक्षणाची ओढ लागली होती. भारतात परतल्यावर त्यांनी ८ जून १९२१ मध्ये आपला विवाह उरकून घेतला व अमेरिकेला जाण्याच्या तयारीला लागले. अमेरिकेतून बी.डी.ची पदवी मिळवून आल्यानंतर या तरुणांकडून आपल्या कार्याला मोठा हातभार लागेल, अशी मिशनची अपेक्षा होती. परंतु डॉ.हिवाळेंनी आपली पुढील शिक्षणाची योजना आधीच आखली होती. "भारतात सात–आठ महिने गेल्यानंतर ते अमेरिकेला परत जाणार होते. सॅडोव्हर सेमीनरीचे डीन डॉ.जे.डब्ल्यू.प्लॅटेनर नी भास्करला एम.ए.पीएच.डी.पूर्ण करण्यासाठी तीन वर्षाची शिष्यवृत्ती मिळवून देण्याचे वचन दिले होते. त्यांच्या भावी पत्नीसाठी शिष्यवृत्ती देण्याचेही वचन दिले होते.परंतु यावेळी प्लॅटनरचा स्वर्गवास झाल्याची दु:खद बातमी आली."[११] या बातमीमुळे डॉ.हिवाळेंना मोठा धक्का बसला कारण त्यांच्या अमेरिकेला जाण्याच्या व एम.ए.पीएच्.डी.मिळविण्याच्या स्वप्नावर पाणी फिरले होते. पण त्यांची जिद्द व ज्ञानलालसा मोठी होती. त्यामुळे त्यांनी अडचणीवर मात केली व अमेरिकेत जाऊन शिक्षणासाठी पैसा उभा करण्याचे ठरवले.

डिसेंबर १९२१ च्या दहा तारखेस डॉ.हिवाळे अमेरिकेला प्रयाण करणार होते. परंतु एकदा संकटे यायला लागली की त्यांची मालिकाच सुरू होते. त्याप्रमाणे त्यांना घेऊन जाणारी बोट कलकत्ता बंदरात थांबण्याऐवजी सिलोनमधील कोलंबो बंदरात थांबली होती. १९२१चा काळ म्हणजे स्वातंत्र्यचळवळीचा जोमदार काळ होता. क्रांतिकारकांच्या हालचालींना वेग आला होता. त्यामुळे बोटीवर हल्ला होऊ नये म्हणून ती सुरक्षित स्थळी नेऊन ठेवली होती. तेथे जाऊन ती बोट पकडणे आवश्यक होते त्यावेळी त्यांच्याजवळ सिलोनपर्यंत जाण्यासाठी लागणारे पैसे नव्हते व जरी तेथपर्यंत गेले तरी पुढील खर्चासाठी पैसे अपुरे पडणार होते. त्यावेळी त्यांनी आपल्या पत्नीचे दागिने व मेहुण्याची अंगठी विकली व ते अमेरिकेला गेले.

अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर नव्या दिनक्रमाला सुरूवात झाली होती. सरला बार्नबस म्हणतात, "हॉवर्ड मध्ये प्रवेश मिळवला आणि सकाळी वर्गात हजर राहू लागले दुपारी तो वाचनालयात पुस्तके वाचू लागले."[१२] कॉलेजचा दिनक्रम सुरळीत सुरू झाला, परंतु महत्त्वाची आर्थिक अडचण त्यांना सतावत होती. त्यासाठी त्यांनी आपल्या मित्रांकडे चौकशी सुरू केली. सामाजिक व धार्मिक विषयांवर व्याख्याने देण्याची तयारी दाखवली त्याप्रमाणे त्यांचे मित्र व इतर सामाजिक धार्मिक संस्थांकडून त्यांना व्याख्याने देण्याची निमंत्रणे येऊ लागली व त्याचा आर्थिक मोबदलाही त्यांना चांगला मिळू लागला. तात्पुरती आर्थिक अडचण दूर झाली.

हॉर्वर्ड विद्यापीठातून एम.ए. पदवी मिळविण्यासाठी फ्रेंच भाषा येणे आवश्यक होते ती भाषा त्यांनी महत्प्रयासाने आत्मसात केली. कधी दिवसभर व्याख्याने देऊन रात्रीच्या वर्गास हिवाळे जात असत रूथबाई म्हणतात, "फ्रेंचची लेखी परीक्षा त्यांनी यशस्वीपणे दिली व त्यांना एम.ए.ची पदवी मिळाली."[१३] एम.ए. पदवी मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या पीएच्.डी.च्या कार्यास सुरूवात केली. परंतु याच दरम्यान त्यांना एका ट्रकचा अपघात झाला व बरेच दिवस ते अंथरूणावर पडून

होते.हॉस्पिटलचा खर्च वाढला त्यातच व्याख्याने देऊन मिळणारी मिळकत कमी झाली. त्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढला. त्यांना थोडे बरे वाटू लागल्यावर ते आपल्या पत्नीला म्हणाले, "आता दुप्पट काम करावे लागेल."[१४] कारण बरेच दिवस आजारपणामध्ये फुकट गेले होते. त्यामुळे परत त्यांनी व्याख्याने देण्याचा उपक्रम सुरू केला. अमेरिकेतील वेगवेगळ्या राज्यात त्यांच्या व्याख्यानांचा दौरा राहात असे परंतु आपण जर जास्त काळ व्याख्याने देत राहिलो तर आपला पीएच्.डी. प्रबंध सादर करण्यास बरेच दिवस लागतील म्हणून त्यांनी यावर उपाय म्हणून " एक हजार डॉलर कर्जाऊ घ्यावे म्हणजे उन्हाळयाचे काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि निवांतपणे अध्ययनही करता येईल."[१५] असा विचार केला व त्याप्रमाणे कर्ज घेऊन अभ्यास सुरू केला. सुरूवातीला त्यांनी जर्मन भाषा अवगत केली व जर्मन भाषेत त्यांना "परीक्षेतही यश आले"[१६] आता फक्त त्यांना पीएच्.डी. प्रबंध सादर करणे बाकी होते. त्यासाठी दिवसातून दहा – बारा तास अभ्यास करून तो पूर्ण केला व विद्यापीठाला सादर केला. रूथबाई हिवाळे म्हणतात, "एकदाचे यांचे नाव पीएच्.डी.च्या यादीत झळकले."[१७] त्यांनी 'Religious Consciousnessw & the Idia of God in contemporary occidental Philosophy' या तत्त्वज्ञानाच्या विषयात प्रबंध लिहिला. त्याबद्दल "अमेरिकेतील हॉर्वर्ड विद्यापीठाने इ.स.१९२८ साली पीएच्.डी. पदवी दिली."[१८] त्यांनी बरेच दिवसापासून पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. आता त्यांना भारतात परतण्याची घाई झाली होती. परंतु एक समस्या त्यांच्यासमोर होती ती म्हणजे घेतलेले कर्ज देणे त्याची लवकरच त्यांनी परतफेड केली तरीही त्यासाठी त्यांना "दोन वर्षे लागली."[१९]

डॉ.हिवाळे व्याख्यान दौऱ्यावर असताना अतिशय मार्मिकपणे व्याख्याने देत असत श्रोते त्यांच्या व्याख्यानाने भारावून जात तासन तास त्यांचे व्याख्यान चालत असे.

त्यामुळे त्यांना व्याख्याने देण्यासाठी सारखी आमंत्रणे येत होती. परंतु कर्जाचे पैसे दिल्याबरोबर त्यांनी आपला अभ्यास दौरा आटोपता घेतला. कर्जाचा शेवटचा हप्ता देताना ते म्हणतात, "आता मी शांत मनाने मायदेशी जाईल माझ कर्ज फिटलं."[२०] त्यानंतर लवकरच त्यांनी अमेरिकेचा निरोप घेतला.

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळेंनी आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याचे जे ध्येय ठेवले होते ते ध्येय त्यांनी आत्मविश्वास, चिकाटी, सहनशीलता यांच्या जोरावर अथक परिश्रम करून साध्य केले. आता त्यांना भारतात आपले पुढील कार्य पूर्ण करावयाचे होते. भारतातील त्यांच्या कार्याची सुरूवात मुंबईच्या विल्सन कॉलेज पासून झाली. परंतु खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याला अहमदनगर मध्येच बहर आला. येथील कार्यामुळेच ते देशातच नव्हेतर विदेशातही ओळखले जाऊ लागले होते.

## २.३ नोकरी :

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचा शिक्षण घेत असतानाचा काळ अतिशय खडतर गेला. त्यांना शिक्षण घेत असतानाच वेगवेगळ्या नोकऱ्या कराव्या लागल्या त्याची सुरूवात अहमदनगर मराठी मिशनपासून झाली. " मॅट्रिक झाल्यानंतर ते तेथेच शिक्षक म्हणून नोकरी करू लागले."[२१] तेथे काही दिवस नोकरी केल्यानंतर पुढील शिक्षण घेण्यासाठी दुसरीकडे राहिल्याने तेथील नोकरी सोडावी लागली. विल्सन कॉलेजमधून बी.ए ची पदवी मिळवली तसेच १९२० मध्ये अमेरिकेतून बी.डी.ची पदवी मिळवल्यानंतर ते "१९२१ च्या मार्चच्या १० तारखेस 'ज्ञानोदया'चे संपादक झाले."[२२] हे त्यांचे 'ज्ञानोदया'चे पहिले संपादन कार्य होते. १९१९ पासून ते मिशनच्या कार्यात सक्रीय झाले. त्यांना इतर मिशनरींच्या बरोबरीने बोलण्याचा अधिकार मिळाला तसेच वेगवगळ्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यात आल्या. मार्च १९१९च्या ज्ञानोदयाच्या अंकात ज्ञानोदयकार म्हणतात की, "संपादनाच्या कार्याच्या व्यवस्थेविषयी

आम्ही आश्चर्य करीत असताना रेव्ह.बी.पी.हिवाळे, बी.ए.बी.डी हे साडेतीन वर्षाच्या पेक्षा जास्त कालावधीनंतर हॉर्वर्ड विद्यापीठाचा अभ्यासक्रम संपादून परत येत आहेत. मि.हिवाळेंना नैसर्गिक संकोच सोडून आल्याबरोबर मराठी संपादनाची जबाबदारी स्वीकारण्यास यश आले आहे. मि.हिवाळे ह्या कार्यासाठी अनेक उत्तम गुणांनी सुसज्ज आहेत."[२३] 'ज्ञानोदया'चे संपादक म्हणून त्यांनी सुरूवातीच्या काळात उत्तम प्रकारे कार्य केले. परंतु शिक्षण घेण्यासाठी ज्ञानोदयाचे संपादकत्व त्यांना लवकरच सोडावे लागले यावेळी ते "८ डिसें.१९२१ पर्यंत म्हणजे आठ महीने यावेळी संपादक होते."[२४] १९२२ ते १९३0 पर्यंत त्यांनी अमेरिकेत हॉर्वर्ड विद्यापीठाची डॉक्टरेट मिळविली पुन्हा भारतात आले व विल्सन कॉलेजात रूजू झाले. " अमेरिकेत मराठी मिशनचा प्रतिनिधी म्हणून ते आपल्या मातृविद्यालयात रूजू झाले."[२५] डॉ.हिवाळे अमेरिकेत असतानाच त्यांच्या भारतातील आगमनाविषयी चर्चा चालू होती, कारण मिशनला शंका वाटत होती की, कदाचित डॉ.हिवाळे हे अमेरिकेत एखाद्या चांगल्या नोकरीलाच राहतील किंवा भारतात आल्यानंतर भारत सरकारच एखादी नोकरी पत्करतील त्यापूर्वीच त्यांना आपल्याकडे वळविणे आवश्यक होते. म्हणून त्यांना भारतात आल्याबरोबर प्राध्यापकपदावर रूजू करून घेतले गेले. 'ज्ञानोदया'च्या जानेवारी १९३१ च्या अंकात उल्लेख आहे की, "प्राचीन काळच्या सिझरप्रमाणे ते आले. त्यांनी पाहिले व त्यांनी जिंकले डॉ.हिवाळे ह्या कॉलेजचे विद्यार्थी आहेत शिक्षक वर्गात येऊन तेथे शिकवण्याची त्यांची अनेक वर्षाची इच्छा होती."[२६] विल्सन कॉलेजात तत्त्वज्ञान हा विषय ते शिकवत. "१९३0 – १९४६ पर्यंत त्यांनी विल्सन कॉलेजात नोकरी केली."[२७] ज्या कॉलेजात डॉ.हिवाळेंनी पदवी पर्यंत शिक्षण घेतले त्याच कॉलेजमध्ये त्यांना तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाल्यामुळे डॉ.हिवाळेंना सुद्धा मनातून खूप आनंद झाला. जवळ जवळ सोळा वर्षे त्यांनी या कॉलेजात सेवा केली.

१९४६ नंतर ग्रामीण भागात एखादे महाविद्यालय सुरू करण्याचे विचार त्यांच्या मनात सुरू झाले व त्यासाठी ते प्रयत्नाला लागले. पुढे १९४७ मध्ये अहमदनगर या ठिकाणी महाविद्यालय काढल्यानंतर त्यांनी संस्थापक व पहिले प्राचार्य म्हणून १९५१ पर्यंत जबाबदारी यशस्वी रीतीने पार पाडली हे सर्व करत असताना त्यांनी कधीही नोकरी पैसा मिळविण्याचे साधन म्हणून केली नाही, तर सेवा म्हणून केली.

## २.४ विवाह :

महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर डॉ.हिवाळे हे अहमदनगर येथे आले होते. एक दिवस ते काही कामानिमित्त अहमदनगर रेल्वे स्टेशनवर आले होते. तेव्हा त्यांना एक मुलगी कुणाची तरी वाट बघत असल्याची दिसली तिची आपुलकीने चौकशी केल्यावर त्यांना समजले की, वर्ध्यावरून अहमदनगर येथे मराठी मिशनच्या मुलींच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी करण्यासाठी ही मुलगी आली आहे. हिच डॉ.हिवाळे व रूथबाई यांची पहिली ओळख होती ती शेवटपर्यंत टिकली. रूथबाई अहमदनगर मध्ये नवीन असल्याने त्यांना येथील विशेष माहिती नव्हती. तेव्हा त्यांनी तिचे सामान हमालाकरवी टांग्यात टाकून तिच्या टांग्यामागून सायकलवर “ते तिला मुलींच्या शाळेतील कंपाऊंडमध्ये घेऊन आले.”[२८] व तिला मुक्कामाच्या ठिकाणी सोडून तिचा नम्रपणे निरोप घेतला. या भेटीच्या वेळी आपला रूथबरोबर विवाह होईल असा विचारही त्यांच्या मनात आला नाही.

रूथबाई या विनायक व शांताबाई भांबळ या दांपत्यांची एकुलती एक मुलगी होती. त्यांचे मूळगाव मध्यप्रदेशातील वर्धा हे होते. याच गावात गांधीजींनी आपला आश्रम सुरू केला होता. तेव्हापासून या गावाला प्रसिद्धी मिळाली. याच गावात रूथ जन्मली, येथेच शिक्षण पूर्ण केले. त्यांना त्यांच्या वडिलांनी वर्ध्यापासून दूर असलेल्या

अहमदनगर या ठिकाणी नोकरी करण्यास परवानगी दिली त्यावेळी ही साधीसुधी गोष्ट नव्हती. त्यांची आई अतिशय मवाळ व धार्मिक अंत:करणाची होती.

अहमदनगरमध्ये रूथबाईची एक मावशी होती. त्या सुट्टीच्या दिवशी मावशींना भेटण्यासाठी जात. एका रविवारी असाच योगायोग झाला डॉ.हिवाळे रूथबाईच्या घरी काही कामानिमित्त गेले होते. तेथे त्यांची रूथशी दुसऱ्यांदा भेट झाली. तेव्हा रूथबाईना डॉ.हिवाळेंनी रेल्वेस्टेशनवरून मुलींच्या शाळेत येण्यास केलेल्या मदतीबद्दल आपल्या मावशीस सांगितले. मावशीची आधीच त्यांच्याशी ओळख होती. व त्यांच्या चांगुलपणाविषयी जाणीव होती. डॉ.हिवाळेंचा आणखी एक स्वभावगुण म्हणजे समोरच्या व्यक्तीबरोबर न थांबता बोलणे त्यांचे हे न अडखळता बोलणे रूथला फार आवडले. रूथही फार गोरी आणि सडपातळ बांधा असलेली सुंदर तरूणी होती. त्यामुळे डॉ.हिवाळेंना तिच्याविषयी आकर्षण वाटू लागले. तिच्याबरोबर लग्न करण्याचा विचार त्यांच्या मनात येऊ लागला ही कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यांनी रूथच्या वडिलांना एक पत्र लिहून पाठविले. "विनायकरावांना मुलीला मागणी करणारे एक पत्र पोहोचले."[२९] इतक्या दूरच्या प्रदेशात जाऊन रूथच्या वडिलांकडे तिला मागणी घालणे त्यांना कामाच्या व्यापामुळे शक्य नव्हते. त्यांनी पाठविलेले पत्र विनायकरावांना मिळाल्यावर ते मोठ्या संभ्रमात पडले. कारण पत्र पाठविणाऱ्या तरूणाला त्यांनी कधी पाहिले नव्हते भेटले नव्हते. काय करावे त्यांना सुचेना इतका उच्च विद्याविभुषित तरूण त्यांना अजुन भेटला नव्हता. हिवाळेंनासुद्धा बऱ्याच शिकलेल्या मुली लग्नासाठी चालून आलेल्या होत्या. त्यावेळी शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे इतका शिकलेला तरूण कोणत्याही मुलीच्या वडिलांना आपला जावई करून घेणे आवडले असते. परंतु, त्यांनी आपल्या भावी पत्नीची निवड मनामध्ये केली होती आणि ती रूथच होती.

डॉ.हिवाळे बी.डी.ची पदवी मिळविण्यासाठी अमेरिकेला जाणार होते, रूथच्या वडिलांकडून लग्नासंबधी कोणतीही हालचाल होईना. अमेरिकेला जाण्याची तारीख जवळ येत होती. तेव्हा रूथच्या वडिलांची वाट न बघता हिवाळेंनी तिच्या वडिलांना पत्राने कळविले की, " मी अमेरिकेला निघालो आहे. आणि परतल्यानंतर तिच्याशी लग्न करण्याची पक्की तयारी आहे. विनायकरावांनी त्यांचे उत्तर 'होय' किंवा 'नाही' या शब्दाने तारेने कळवावे."[३०] विनायकराव मोठ्या द्विधेत पडले होते. आपली मुलगी इतक्या दूर आहे तिला भेटणे सुद्धा शक्य नव्हते. विनायकरावांनी मुलीला कोणतीही कल्पना नसताना डॉ.हिवाळेंना तार पाठविली त्यात एकच शब्द होता 'होय' विनायकरावांनी नंतर हा निर्णय आपल्या मुलीला कळवला. तिलाही मनोमन आनंद झाला.

१९१७ मध्ये डॉ.हिवाळेंनी अमेरिकेला प्रयाण केले व १९२० मध्ये बी.डी.ची उच्च पदवी मिळविली. आता त्यांच्या पुढील योजनांचा मार्ग मोकळा झाला. अहमदनगरला येऊन विवाहाची सर्व तयारी केली व ८ जून १९२१ रोजी भास्कर व रूथबाई यांचा विवाह पार पडला. हा दिवस त्यांच्या आयुष्यात संस्मरणीय ठरला. तेथून पुढे दोघांनीही नवीन जीवनाची वाटचाल सुरू केली व शेवटपर्यंत एकमेकांच्या सुख दु:खात साथ दिली. डॉ.हिवाळेंनी रूथबाईशी विवाह करण्याचा जो निर्णय घेतला त्याविषयी सरला बार्नबस म्हणतात, "त्यांच्या जीवनातील अत्यंत शहाणपणाच्या निर्णयातील एक होता."[३१] पुढील आयुष्यात रूथबाईंनी मोलाची साथ दिली. पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले, त्यामुळे हिवाळे आपल्या कल्पना प्रत्यक्षात उतरवू शकले. हिवाळे शेवटच्या क्षणी सुद्धा पत्नीचे आभार मानायला विसरले नाही. ते म्हणतात की, " मी जेव्हा लग्न केले तेव्हा मला कधी वाटले नाही की, मी इतका सुखी होईन आणि इतक्या गोड रीतीने माझे आयुष्य जाईल."[३२] जीवनाच्या वाटेवर सर्व सुख दु:खाच्या क्षणी पत्नी म्हणून जे-जे कार्य करायला पाहिजे ते सर्व रूथबाईंनी केली. त्यामुळे

हिवाळेंचे उद्गार म्हणजे त्यांचे जीवन सर्वार्थपणे पत्नीमुळे कृतार्थ झाले होते, याची साक्ष आहे.

## २.५ कुटुंब :

भास्कर हिवाळेंना पाच बहिणी व एक भाऊ होता. आई-वडिलांच्या निधनानंतर आपल्या भावंडांचे पालनपोषण केले. पुढे भास्कर हिवाळेंचा रूथबाईशी विवाह झाल्यानंतर त्यांना एकूण चार अपत्य झाली आणि विशेष म्हणजे त्या चारही मुली होत्या. त्यामध्ये सर्वात थोरली मनोरमा हिचा जन्म सप्टेंबर १९२३ मध्ये अमेरिकेत झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण अमेरिकेतच झाले. नंतर उच्च शिक्षण भारतात झाले. त्यांनी बी.ए.फिलॉसॉफी विल्सन कॉलेजात केले. त्यांचा विवाह थॉमस बार्नबस यांच्याबरोबर झाला. थॉमस बार्नबस हे काही काळ अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य होते. डॉ. हिवाळेंची दुसरी मुलगी इंदू ही जुलै १९२५ मध्ये अमेरिकेतच जन्माला आली तिचेही प्राथमिक शिक्षण भारतात झाले. तिने विल्सन कॉलेज मुंबई येथे शास्त्र शाखेची पदवी मिळविली व पुढे वेल्लोर मेडिकल कॉलेजला एम.बी.बी.एस पदवी मिळवून वैद्यकीय व्यवसाय स्वीकारला तिचा विवाह हेन्री बरोबर झाला. डॉ.हिवाळेंची तिसरी मुलगी विमल हिचा जन्म जुलै १९२७ मध्ये अमेरिकेत झाला तिचे पदवी पर्यंतचे शिक्षण भारतात झाले. पुढील शिक्षण अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीत झाले. तिचा विवाह कांतिलाल बरोबर झाला. त्यांची चवथी मुलगी सरला हिचा जन्म भारतात १५ नोव्हें.१९३४ रोजी झाला. शिक्षण मुंबई विद्यापीठात झाले. त्यांचा विवाह जोसेफ बार्न बस बरोबर झाला जोसेफ बार्नबसही काही काळ अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य होते. त्यांचेच पुत्र त्यांच्या प्राचार्यपदाचा वारसा चालवत आहेत. रजनीश बार्नबस हे आज अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य आहेत.

## २.६ पत्नी रूथबाईचे योगदान :

देशात आणि विदेशात ज्या थोर विभूती होऊन गेल्या त्यांच्या पाठीमागे नेहमी त्यांच्या पत्नीची साथ होती, असे दिसून येते. उदाहरण घ्यायचे म्हटले, तर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांचा मोलाचा वाटा होता. म.फुले यांच्या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी महत्त्वाचे कार्य केले. यासारखी उदा. अतिशय बोलकी आहेत. प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एक स्त्री उभी असते. सर्वांच्याच परिचयाचे हे वाक्य असले तरी “त्यातून प्रत्येकाच्या आयुष्यातील स्त्रीचे स्थान तिचे महत्त्व परिणामकारकतेने अधोरेखित होते. आपल्या समोर आदरणीय डॉ.हिवाळे यांच्या कार्याचा पट उलगडताना अशीच एक स्त्री सतत भेटते. ती म्हणजे डॉ.हिवाळेंची पत्नी खऱ्या अर्थाने त्यांची सहधर्मचारिणी रूथबाई हिवाळे”[३३] विवाहानंतर रूथबाई व डॉ.हिवाळे यांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली व पुढील कार्यात हिवाळेंच्या बरोबरीने त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला. विवाहानंतर थोडयाच दिवसात डॉ.हिवाळे अमेरिकेला जाणार होते. त्यासाठी आवश्यक असणारे पैसे त्यांच्या जवळ नव्हते. तेव्हा लग्नात भेट आलेल्या वस्तू विकण्यास रूथबाईनी होकार दिला व पैसे उभे केले. रूथबाईसुद्धा त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाल्या. तेव्हा आपल्या जवळ असलेले पैसे पुरतील काय ? असा प्रश्न डॉ.हिवाळेंनी करताच रूथबाईंनी त्यांना धीर दिला व सांगितले की, “इतकी काळजी करण्याचे कारण नाही. माझ्या बांगड्या व इतर वस्तू आहेत. गरज पडली तर आपण कोलंबोत सोनं विकू”[३४] या त्यांच्या वक्तव्यावरून आपणास जाणीव होते की, सुरूवातीपासूनच त्यांनी हिवाळेंना शिक्षणासाठी सहकार्य केले व अडचणीतून मार्ग काढण्यास मदत केली.

अमेरिकेत असताना फक्त स्वत:च्या शिक्षणाकडेच लक्ष दिले असे नाही तर डॉ. हिवाळेंनी आपल्या पत्नीला वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. रूथबाईना सुद्धा बालपणापासून शिक्षणाची आवड असल्याने त्यांनी त्या कोर्सला प्रवेश

घेऊन ते पूर्ण केले. डॉ. हिवाळेंचे आई-वडील बालपणीच मृत्यू पावल्याने ते त्यांच्या प्रेमास पारखे झाले होते. रूथबाईंनी त्यांना आई-वडिलांचे व पत्नीचे प्रेम दिले. अमेरिकेत असताना त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्यानास जावे लागले. तेव्हा रूथबाईही त्यांच्याबरोबर जात असत व व्याख्यानाच्या सुरूवातीला आपल्या सतारवर श्रोत्यांसाठी दोन तीन गाणी सादर करीत असत. त्यामुळे त्याचा मोबदला पैशाच्या स्वरूपात मिळे त्यामुळे त्यांची आर्थिक अडचण दूर होण्यास मदत झाली. त्याचबरोबर हिवाळेंबरोबर वेगवेगळ्या प्रांतात प्रवास करता आला. अमेरिकेत असताना रूथने हिवाळेंना मोलाचीसाथ दिली कुटुंब व स्वत:चे शिक्षण सांभाळून त्यांची काळजी घेतली. पीएच्.डी.पूर्ण झाल्यानंतर हिवाळेंना व्याख्यान दौऱ्यामुळे पदवीदान समारंभास उपस्थित राहता येणार नव्हते, तेव्हा आपल्या पत्नीस पदवीदान समारंभात उपस्थित राहण्यास सांगितले व शिक्षणाचे सर्व श्रेय आपल्या पत्नीस दिले. एकदा हिवाळे व त्यांचा मेहुणा गप्पा मारत असताना ते म्हणाले की, "ब्रदर हिने जर मला सर्व प्रकारे मदत केली नसती तर मला पीएच्.डी. मिळविणे अगदी अशक्य होते."[३५] यातून रूथबाई त्यांच्या पाठीशी कशा उभ्या राहिल्या याची कल्पना येते. ते पुढे असेही म्हणतात, "ब्रदर थिसीस पुस्तकरूपाने छापेल त्यावेळी तो मी हिलाच अर्पण करणार आहे."[३६] यातून त्यांचे पत्नीविषयी असलेले प्रेम व तिच्या मदतीबद्दल दाखविलेली कृतज्ञता दिसून येते.

डॉ.हिवाळे विल्सन कॉलेजमध्ये शिक्षक म्हणून रूजू झाल्यावर खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याला सुरूवात झाली त्यावेळी विल्सन कॉलेजात कोणत्याही प्रकारचे सामाजिक उपक्रम होत नसत ते त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी रूथबाईच्या मदतीने सामाजिक कार्यक्रम घेण्यास सुरूवात केली. अशा कार्यक्रमांची जबाबदारी कोणीही घेत नसत तेव्हा त्यांनी कॉलेजच्या प्रिंन्सिपलला भेटून सांगितले की, " मी व माझ्या पत्नीने स्वत: अशा कार्यक्रमांची देखरेख केली, तर काही हरकत होईल काय ?"[३७] साहजिकच प्रि.जॉन मॅकन्झी यांनी परवानगी दिली व सामाजिक विषयावर एकत्र येण्याचे कार्यक्रम

सुरू झाले. त्याची जबाबदारी स्वत: रूथबाईंनी घेतली व पार पाडली. तसेच कॉलेजमधील गरीब विद्यार्थ्यांना दोन वेळचे पोटभर जेवण घेता यावे यासाठी आपल्या पतीची मदत घेऊन अल्पदरात मेस चालवली. ज्या विद्यार्थ्यांना हे थोडे पैसे देणे शक्य नव्हते अशांना मोफत भोजनाची व्यवस्था केली. मेस मधील सर्व कामे स्वत: रूथबाई करत असत हे करत असताना मी एका उच्च विद्याविभुषित प्राध्यापकाची पत्नी मी कसे मेसमध्ये काम करू असा विचारही त्यांच्या मनात कधी येत नव्हता, असा संकोचही त्यांनी मनात कधी बाळगला नाही.

रूथबाई या चर्चमधील दर्कस मंडळाच्या अध्यक्षा होत्या त्यावेळी त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबविले व दीन – दुबळ्यांना आवश्यक ते सहकार्य केले. 'युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' या संघटनेचे अधिवेशन मुंबईला भरले असताना सर्वांच्या जेवणाची व्यवस्था रूथबाईंनी पार पाडली. त्यामुळे प्राचार्यांनी त्यांना बोलावून भर सभेत त्यांचा सत्कार केला व आभार मानले. पुढे मुंबईमध्ये अमेरिकन मराठी मिशनने चालवलेले हायस्कूल हिवाळेंनी चालवायला घेतले त्यावेळी रूथबाईंनी त्यांना मोलाची साथ दिली. डॉ.हिवाळे हायस्कूलचे प्रिन्सिपॉल होते. रूथबाई म्हणतात, " प्रिन्सिपलची पत्नी म्हणून प्राथमिक शाळेची जबाबदारी माझ्याकडे आली."३८ ती जबाबदारी त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडली व शाळा उर्जितावस्थेत आणली. विल्सन कॉलेजात काम करत असताना हिवाळेंच्या मनात अहमदनगर या ठिकाणी कॉलेज काढण्याची कल्पना आली ती साकार करण्यास रूथबाईंनी त्यांना प्रोत्साहनच दिले नाही, तर " सौ.रूथबाईंनी कॉलेज उभे करण्यासाठी आपले दागिने मोडले."[३९] व कॉलेज उभे करण्यास मोलाचा हातभार लावला कॉलेज सुरू झाल्यानंतर गरीब मुलांना मोफत भोजन देण्याच्या योजनेत त्या स्वत: सहभागी झाल्या व ती जबाबदारी व्यवस्थित पार पाडली. या ठिकाणी आपल्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांची आठवण झाल्या शिवाय राहत नाही त्यांनी ज्या वेळी शक्य होईल त्या वेळी आपल्या परीने आपल्या

पतीबरोबर शिक्षण, समाजसेवा, धार्मिक कार्य यात भाग घेऊन डॉ.हिवाळेंना मोलाची साथ देऊन वेळोवेळी प्रोत्साहन दिले. डॉ.हिवाळेंनी जेव्हा उषा प्रकाशन सुरू केले व उषा नावाने साप्ताहिक चालवले तेव्हा वेळप्रसंगी मजकूर पुरवणे, पुफ तपासणे, हिशेब ठेवणे, मुद्रणालयातील पगारवाटप, लागणाऱ्या वस्तुंच्या वेळच्या वेळी ऑर्डर देणे ही सर्व कामे स्वत: त्या बघत असत. डॉ.हिवाळे "निश्चयाचा महामेरू होते.पण सरितेसारखी निर्मळमनाची पत्नी त्यांना लाभली होती."[४०] पतीला सदैव साथ देताना डॉ.हिवाळेंच्या जीवनकार्यास आकार देण्यात त्यांनी हातभार लावला त्यांच्या या कार्याची दखल घेऊन अहमदनगर महाविद्यालयाने मुलींच्या वसतिगृहास रूथबाई हिवाळे यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

## २.७ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सेवाव्रत :

इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. तिचा उद्देश प्रामुख्याने सुरूवातीला सामाजिक व राजकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे हा होता. १८८५ तो १९०५ या काळात राष्ट्रीय सभा प्रामुख्याने सामाजिक सुधारणांवर भर देत होती. भारतीय समाज दारिद्र्य, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यात गुरफटलेला होता. याचे मुख्य कारण शिक्षणाचा अभाव हेच होते, मात्र हिवाळे याच काळात शिक्षणासाठी आपले घरदार सोडून अहमदनगर येथील मराठी मिशनच्या शाळेत दाखल झाले होते. मॅट्रिक पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्या मनात भारतीयांच्या खऱ्या परिस्थितीची जाणीव होऊ लागली होती. राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक सुधारणा घडून आणणे त्यांना आवश्यक वाटू लागले होते. त्यासाठी आपण स्वत: उच्च शिक्षण घेऊन समाजसुधारणा घडवून आणावी असे त्यांना वाटत होते. राष्ट्रीय समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील उच्च शिक्षण घेऊन आयुष्यभर समाजसुधारणेचे व्रत जोपासणारी व्यक्ती म्हणून आपण त्यांच्याकडे पाहतो.

बालपणी पासूनच बिकट परिस्थितीतून मार्ग काढून डॉ.हिवाळेंनी अहमदनगर सारख्या दुष्काळी व पीडित भागात आपले मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले त्यामुळे त्यांना तेथील समाजाची दयनीय स्थीती जवळून पाहता आली. सर्वसामान्य समाज शिक्षणापासून दूर जात होता. उच्च शिक्षण तर श्रीमंत व उच्चभू लोकांची मक्तेदारी होती ती मक्तेदारी मोडून काढावी, असे त्यांना वाटत होते. अहमदनगर सारख्या भागाचीही स्थिती सुधारण्याची जबाबदारी आपणच घ्यावी, असे त्यांच्या मनाने बालपणापासूनच ठरवले. त्यामुळे त्यांच्या स्वत:च्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी आपल्या बुद्धीचातुर्याने मात करत आपले शिक्षण पूर्ण केले. सुरूवातीचे शिक्षण ख्रिश्चन मिशनच्या शाळेत झाल्याने त्यांच्यावर मिशनऱ्यांच्या सेवाकार्याचा प्रभाव पडला. भावी काळात त्यांनी तो जोपासला त्याची सुरूवात अमेरिकेत शिक्षणासाठी गेल्यावरच झाली होती. तेथे त्यांनी धार्मिक व सामाजिक विषयावर व्याख्याने देण्यास सुरूवात केली होती. पुढे भारतात आल्यावर सर्व आयुष्य सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यासाठी खर्च केले.

## २.८ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे अमेरिकेतील कार्य :

अमेरिकेतील शिक्षणासाठी १९२१ मध्ये गेल्यावर त्यांनी वेगवेगळ्या प्रांतात धार्मिक व सामाजिक विषयावर व्याख्याने देऊन समाजजागृतीचे कार्य केले. "प्रत्येक व्याख्यानाच्या वेळी नवीन राज्यात जावे लागे, त्यामुळे या वास्तव्यात ते अमेरिकेच्या ४८ राज्यात जाऊन आले."[४०] इतका मोठा प्रवास करणे ही सोपी गोष्ट नव्हती या व्याख्यान दौऱ्यामुळे त्यांना अमेरिकेतील सर्व प्रांताची, तेथील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची माहिती झाली तेथील अनुभवाचा उपयोग त्यांनी भारतात आल्यावर भारतीयांच्या हितासाठी केला.

## २.९ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे विल्सन कॉलेजातील कार्य :

१९३१ पासून डॉ.हिवाळे विल्सन कॉलेजात प्राध्यापक म्हणून रूजू झाले अध्यापनाबरोबरच त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक कार्यास सुरूवात केली. सरला बार्नबस म्हणतात, "आतापर्यंत स्कॉटिश प्राध्यापकांचे सभासदत्व असलेल्या कॉलेजात सिनेटमध्ये स्थान प्राप्त झालेले पप्पा पहिले भारतीय होते."[४१] ही त्यांच्या ज्ञानाची किमया होती. आपल्या ज्ञानाच्या बळावर त्यांनी इतर मिशनरींप्रमाणे स्वत:चे स्थान निर्माण केले होते. तो काळ पारतंज्याचा होता आणि मिशनरी भारतीयांना विचार व बुद्धिमत्तेने कमी लेखत होते. भारतीयांना बरोबरीने वागविण्यास ते तयार नव्हते अशावेळी हिवाळेंनी सिनेटमध्ये प्रवेश करून अनेक धडाडीचे निर्णय घेण्यास त्यांना भाग पाडले. कॉलेज तरूण तरूणींना एकत्र येऊन मनमोकळेपणाने बोलण्यावर त्यावेळी मनाई होती. त्याची खंत त्यांना वाटत असे त्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबविण्यास त्यांनी सुरूवात केली.स्वत:च्या घरी कॉलेज तरूण-तरूणींना स्नेहभोजनाचा कार्यक्रम दर पंधरा दिवसाला घेऊन वेगवेगळ्या सामाजिक विषयावर त्यांच्याबरोबर चर्चा करण्यास सुरूवात केली. त्यामुळे या तरूणांमध्ये सामाजिक सुधारणेचे बीज रोवण्यास सुरूवात झाली.

विल्सन कॉलेजमध्ये मुलींच्या वसतिगृहाची सोय नव्हती त्यामुळे मुलींची गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी हा विषय सिनेटमध्ये मांडून मुलींसाठी वसतिगृह करण्याची विनंती केली. ती मान्य होऊन मुलींचे वसतिगृह उभे राहिले त्यास पं.रमाबाई मुलींचे वसतिगृह असे नाव देण्यात आले. ग्रामीण भागातील मुलींच्या दोनवेळच्या पोटभर जेवणासाठी कमी किमतीत स्वत: मेस चालविली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये येण्यास उशीर होतो दूरवरून पायी यावे लागते ही गोष्ट त्यांना खटकत होती या विद्यार्थ्यांनी कॉलेजला वेळेवर उपस्थित रहावे यासाठी त्यांनी स्वत:च्या पैशाने विद्यार्थ्यांना सायकली खरेदी करून दिल्या."[४२] या ठिकाणी डॉ. हिवाळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिकावे व त्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये हाच दृष्टिकोन होता.

तरूणांबरोबर प्रौढांनी सुद्धा शिकावे, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी 'ख्रिस्ती लोकशिक्षण' मासिक व 'गावकरी' नावाचे जाड टाईपमध्ये वृत्तपत्र सुरू केले. खेड्यातील लोकांना वाचनाची गोडी लागावी, हा त्यामागचा उद्देश दिसून येतो. मुंबईचे ह्यूम हायस्कूल बंद पडण्याच्या मार्गावर होते ते त्यांनी स्वत: चालवावयास घेऊन त्यास उर्जितावस्था प्राप्त करून दिली. तेथील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सोय उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराची काळजी घेऊन स्वखर्चाने मुलांना दुपारच्या सुट्टीत दूध देण्यास सुरूवात केली. आज जो विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो तो त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळातच सुरू केला होता यातून त्यांची विद्यार्थ्यांविषयीची प्रीती, आपुलकी व सहानुभूती दिसून येते.

## २.१० डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे 'ज्ञानोदया'चे संपादक असतानाचे कार्य :

'ज्ञानोदय' म्हणजे ज्ञानाचा उदय हे नियतकालिक १९४२ मध्येच सरू झाले होते. या मधून आपण आपले समाजजागृतीचे कार्य यशस्वीपणे पार पाडू असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी १० मार्च १९२१ मध्ये 'ज्ञानोदया'चे प्रथमत: संपादकत्व स्वीकारले यावेळी ते ८ डिसेंबर १९२१ पर्यंत ज्ञानोदयाचे संपादक राहिले. पुढे ते शिक्षणासाठी अमेरिकेला गेल्याने काही काळ या नियतकालिकापासून दूर होते. अमेरिकेतून आल्यावर १ जाने.१९३९ ते ३१ डिसे.१९४० : १ जाने १९४२ ते ३० जून १९४४ : ५ जाने १९४५ ते २९ मार्च १९४५ : १९४७ साली काही काळ व मग १९५१ अखेरपर्यंत ज्ञानोदयाचे संपादन त्यांनी केले. त्यांनी या वृत्तपत्रातून दीन – दुबळ्यांना शहाणे करण्याचे व समाजजागृतीचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

## २.११ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य :

सुरूवातीपासूनच डॉ.हिवाळेंना ग्रामीण भागातील विद्यार्थी व लोकांविषयी सहानुभूती होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, त्यांना शिक्षण घेण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरविल्या जात नाहीत, ग्रामीण भागात उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयाची सोय नाही. शहरात येऊन शिक्षण घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना शिक्षण घेता येत नाही ही परिस्थिती लक्षात घेऊन १९४७ मध्ये अहमदनगर सारख्या दुष्काळी व ग्रामीण भागात महाविद्यालय काढून ग्रामीण भागाला उच्चशिक्षणाची सोय करून दिली. ग्रामीण भागातील प्रौढ लोक अडाणी असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहीत नाही त्यामुळे ते त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात, ही वस्तुस्थिती डॉ.हिवाळेंना माहीत होती. म्हणून त्यांनी 'प्रौढ शिक्षणाची योजना' आखली व 'निरक्षर लोकांसाठी सोपी वाचन पद्धती' सुरू केली. यातून त्यांची ग्रामीण भागातील लोकांविषयीची व शिक्षणाविषयीची तळमळ जाणवते.

## २.१२ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे वाङ्मयीन कार्य :

डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या जीवनावर सुरूवातीपासूनच नियतकालिकांचा परिणाम झालेला होता. ही नियतकालिके जशी समाजसुधारणेची कार्य करतात तसेच कार्य आपण आपल्या साहित्याच्या माध्यमातून करावे, असा त्यांचा साहित्य निर्मिती मागील हेतू होता. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक ग्रंथ संपादित करून प्रकाशित केले. १९५२ मध्ये 'उषा' नावाचे इंग्रजी मराठी साप्ताहिक सुरू केले. 'ज्ञानोदया'च्या शंभरीनिमित्त, 'ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे भाग १ व भाग २' असे ग्रंथ प्रकाशित केले. तसेच प्रार्थना कशी करावी क्रुसावरील उदगार, हिंदी खिस्तीमंडळाचे एकीकरण, मानवी स्वभाव अशी छोटी छोटी पुस्तके लिहून वाङ्मयीन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावली.

## २.१३ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक क्षेत्रातील कार्य :

सुरूवातीपासूनच मिशनरी संस्कार हिवाळे यांच्यावर झाले होते. त्यांच्या धार्मिक कार्याचा वसा त्यांनी मिशनऱ्यांपासूनच घेतला होता. अमेरिकेत असताना धार्मिक विषयावर व्याख्याने देण्याचे व्रत त्यांनी घेतले होते. "विल्सन कॉलेजमध्ये कामावर रूजू झाल्यानंतर त्यांनी भायखळ्याच्या ह्यूम मेमोरियल चर्चच्या मॉडरेटरचे काम एका वर्षाच्या आत पत्करले."[४३] चर्चमध्येही अनेक सुधारणा केल्या, तसेच चर्चच्या कार्याचे साप्ताहिक सुरू केले. ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिलच्या दिल्ली अधिवेशनाचे प्रिसिडेंट डॉ.हिवाळे हे होते. तेथे त्यांनी आपल्या ज्ञानाची छाप देशी व परदेशी लोकांवर टाकली तसेच त्यावर्षी सर्व भारताचा दौरा केला 'युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' या संघटनेचे अधिवेशन मुंबईला भरवून यशस्वीपणे पार पाडले. तसेच हिंदी ख्रिश्चन व परदेशी ख्रिश्चन यांच्यातील भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न केला १९३८ मध्ये तांबरम येथे 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेसचे मोठे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनास रूथबाई हिवाळे म्हणतात, "महाराष्ट्रातील एतद्देशिय नि युरोपियन पुरूष वर्गाचे प्रतिनिधी म्हणून यांची निवड झाली."[४४] तेथे त्यांनी आपले विचार तर मांडलेच त्याचबरोबर लोकशिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले. अशाप्रकारे हिवाळेंनी बालवयात घेतलेले सेवाव्रत शेवटपर्यंत जोपासले त्याचा फायदा समाजातील सर्वसामान्यांपासून उच्चभ्रू वर्गापर्यंत झाला.

## २.१४ वृद्धापकाळ व मृत्यू :

कार्यप्रवण माणसाला वृद्धापकाळ नसतोच कारण या काळात सुद्धा ते लोक काहीना काही नवीन कल्पना करत असतात. सदैव प्रयत्नशील असतात. असेच डॉ.हिवाळे यांच्या संदर्भात झाले. १९४७ च्या नंतरचा काळ अतिशय धावपळीत गेला. कॉलेजची स्थापना झाल्यानंतर वेगवेगळ्या अडचणी सोडविण्यात तीन – चार

वर्ष निघून गेली. वेळोवळी पैसा जमविण्यासाठी अमेरिकेला वाऱ्या कराव्या लागल्या परंतु त्याचा त्यांना कधीही कंटाळा आला नाही. प्राचार्यपदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर सुद्धा वेगवेगळ्या कल्पना राबविण्यात त्यांचा वेळ जात असे. कॉलेजातील तरूण विद्यार्थी वर्गात ते सतत खुश असत आपणही त्यांच्याप्रमाणे तरुण आहोत, असे त्यांना वाटे, व तरूणांप्रमाणे आपण धावत पळत कार्य करावे, असा उत्साह त्यांच्यात राहात असे, तो शेवटपर्यंत राहिला. "चर्च कौन्सिलची बैठक ११ जुलै १९६१ ला भरली होती या दिवशी ते जवळ जवळ तीन तास बोलत होते."[४५] यावरून आपल्याला कल्पना येते की, त्यांची प्रकृती शेवटपर्यंत चांगली होती परंतु जास्त कामे व तणाव यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला. १४ जुलै १९६१ रोजी त्यांना हृदयविकाराचा झटका आला.त्याची तीव्रता कमी होती त्यामुळे त्यातून वाचले व पुन्हा आपल्या कामाला लागले. परंतु एक महिन्यानंतर त्यांना पुन्हा असाच त्रास झाला यावेळी त्यांचे मित्र डॉ.थोलार जवळ असल्याने त्यांच्यावर तातडीने उपचार केले व त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला. अंथरूणावर पडून राहणे त्यांना अजिबात आवडत नसे ते म्हणतात, "अशा जगण्याचा काय अर्थ आहे ? मला खूप कामे करायची आहेत सप्टेंबरमध्ये अमेरिकेला जायचे आहे. ह्या रविवारी मला चर्चमध्ये संदेश द्यायचा आहे."[४६] अशी त्यांच्या कामाची यादी तयार होती परंतु नियतीला हे मान्य नव्हते. ८ सप्टेंबर १९६१ ची रात्र होती या रात्री त्यांना परत हृदयविकाराचा झटका आला व त्यामध्ये एका संघर्षमय जीवनाचा अंत झाला.

एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म होऊनही डॉ.हिवाळेंनी अतिशय कठीण परिस्थितीतून मार्ग काढून शिक्षण पूर्ण केले. स्वत: उच्चविद्याविभुषित झाल्यानंतर इतर लोकांप्रमाणे ऐश आरामात जीवन न घालता सतत समाजपरिवर्तनाचा ध्यास घेऊन समाजाला मार्गदर्शन करून दारिद्रयात खितपत पडलेल्या समाजाला वर काढण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी उच्चशिक्षण ही गरज ओळखून अहमदनगर येथे महाविद्यालय

स्थापन केले. याचकाळात भारत स्वतंत्र होवून देशात जशी क्रांती झाली तशीच क्रांती अहमदनगर महाविद्यालयाने अहमदनगर व आसपासच्या जिल्ह्यात केली. म्हणून अहमदनगरमधील उच्च शिक्षणाच्या क्रांतिचे जनक डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## संदर्भ

१. सरदार ना.य.मिरीकर : अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, अहमदनगर पृ.१२

२. चिटणीस कृ.ना.(संपा) : इतिहास संशोधन पत्रिका, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे १९९० पृ.५९

३. कित्ता पृ.५९

४. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१०

५. वार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७ पृ.४

६. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३ पृ.२

७. वार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.५

८. कित्ता, पृ.५

९. कित्ता, पृ.६

१०. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी. १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१०

११. वार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.१४

१२. कित्ता, पृ.२१

१३. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन , विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.६0

१४. कित्ता, पृ.६९

१५. कित्ता, पृ.७२

१६. कित्ता, पृ.७५

१७. कित्ता, पृ.९७

१८. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.२

१९. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.९८

२0. कित्ता, पृ.९९

२१. कित्ता, पृ.११

२२. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.२

२३. ज्ञानोदय, मार्च १९२१

२४. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.२

२५. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७, पृ.६१

२६. कित्ता, पृ.६१

२७. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.२

२८. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.११

२९. कित्ता, पृ.१०

३०. कित्ता, पृ.१०

३१. कित्ता, पृ.१०

३२. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.२४

३३. हुद्देदार माधुरी : भास्करायण, ऋतू प्रकाशन, अहमदनगर २००८ पृ.४८

३४. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१९

३५. कित्ता, पृ.९७

३६. कित्ता, पृ.६३

३७. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.६३

३८. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१६२

३९. दै. समाचार, २२ जानेवारी २००२

४०. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.९७

४१. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.६२

४२. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१४२

४३ . कित्ता, पृ . १२८

४४ . कित्ता, पृ . १६७

४५ . कित्ता, पृ . २३९

४६ बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा . पां . हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ . २५१

❖❖❖❖

# प्रकरण तिसरे

# डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शैक्षणिक कार्य

३.१ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शिक्षण विषयक विचार

३.२ डॉ.हिवाळेंचे विल्सन कॉलेजमधील कार्य

३.३ विल्सन कॉलेजातील सामाजिक उपक्रम

३.४ गरीब विद्यार्थ्यांना कॉलेजला येण्यास प्रोत्साहन व मदत

३.५ ह्यूम हायस्कूलमधील डॉ.हिवाळे यांचे कार्य

३.६ विल्सन कॉलेजातील सिनेटमधील कार्य

३.७ अहमदनगर कॉलेजच्या उभारणीत डॉ.हिवाळेंचे योगदान

३.८ कॉलेज काढण्यातील अडचणी

३.९ अमेरिकेतील प्रयत्न

३.१० कॉलेज काढण्याची पूर्वतयारी

३.११ अहमदनगर कॉलेज प्रत्यक्षात उभे करण्याचा ऐतिहासीक क्षण

३.१२ डॉ.हिवाळे यांचे प्राचार्य म्हणून कार्य

३.१३ अहमदनगर कॉलेजचे सचिव असतानाचे कार्य

३.१४ डॉ.हिवाळे यांचे विद्यार्थी प्रेम

३.१५ डॉ.हिवाळे यांचा जीवनातील त्याग

❖❖❖❖❖

# प्रकरण तिसरे

# डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शैक्षणिक कार्य

मानवाचे जीवन सुलभ व सुसंस्कृत होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. या अर्थाने शिक्षण हे एक मूल्य ठरते. शिक्षणामुळे मानवाच्या जीवनात परिवर्तन घडून येते. ते मूलगामी स्वरूपाचे असते. त्यामुळे शिक्षण फक्त ज्ञानवृद्धीचे साधन न राहता मानवाचे सर्व अंग व्यापते. यामुळे शिक्षण मानवाच्या उदरनिर्वाहाचे साधन बनू शकते. यातून मानवाची नैतिक प्रगती होते. मानव व समाज यांचा परस्परसंबध असल्याने शिक्षणाने समाजाला गतिशिलता प्राप्त होते. "समाज सुसंस्कृत करून प्रगतीचा परमोच्च बिंदू गाठण्यासाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर केला जातो. शिक्षण हा समाज परिवर्तनाचा एक घटक बनते. कोणत्याही समाजाचे द्रुतगतीने स्थित्यंतर घडवून आणण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्यक असते, ती मूलभूत अशी आवश्यकता असते. शिक्षणाने सत्यासत्याचा नी अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव त्यांच्यात जागृत होते. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे."[१] म्हणून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाची अवस्था हीन दर्जास जाऊन पोहोचते. अशा समाजाची स्थिती सुधारण्याकरिता शिक्षणाचा प्रचार त्यांच्यामध्ये करणे आवश्यक ठरते. शिक्षणापासून वंचित झालेल्या समाजात म्हणून अधोगती प्राप्त होते. अशावेळी समाजसुधारक समाजाची उन्नती करताना शिक्षण हा मुख्य धागा पकडताना दिसतात.

'शिक्षण' म्हणजे मानवाचा तिसरा डोळा आहे, अशा शब्दात म. फुले शिक्षणाचे महत्त्व सांगतात. तर शिक्षणाने माणसाला पैसा, प्रतिष्टा व ज्ञान प्राप्त होते, असे लोकहितवादी शिक्षणाचे यथार्थ वर्णन करतात. शिक्षणाबाबत विचार मांडताना "विद्या

हे एक प्रकारचे धन आहे."[२] असे आगरकर सांगतात. संघटीत होऊन संघर्ष करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचेच महत्त्व अधोरेखित केले आहे, हे अर्थपूर्ण आहे. शिक्षणाने माणसाला शहाणपण प्राप्त होते. त्यांच्या ज्ञानात वद्धी होते. ज्ञानसाधनेत जाणीवांचा प्रवास अखंड चालू असतो. ज्ञान ही एक व्यापक संकल्पना आहे, व ती जाणिवांच्याच आधारे विकसित होत असते. ज्ञान प्राप्तीची साधने विविध आहेत. अज्ञानाचा अंध:कार नष्ट करण्यासाठी इ.स. ६ व्या शतकात गौतम बुद्धांनी त्रिपिटका मध्ये 'अत: दीप भव' म्हणजे स्वयंप्रकाशित व्हा, असे सांगितले आहे.

शिक्षण आणि मानव यांचा जसा संबध आहे, तसा मानव आणि समाज यांचा घनिष्ट संबध आहे. या नात्याने समाज निर्मितीचा एक घटक बनतो. शिक्षणाच्या चांगल्या व घातक दोन्हीही बाबी लक्षात घ्याव्या लागतात, म्हणून शिक्षण ही दुधारी तलवार मानली जाते.

भारतातील शिक्षणाचा प्रवास हा वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या प्रकारे झालेला दिसून येतो. प्राचीन कालखंडात गुरूकुल पद्धती होती. विद्यार्थी आपल्या गुरूकडे राहून शिक्षण घेत असत. ती काही लोकांचीच मक्तेदारी होती. पुढे मध्ययुगीन काळात शिक्षणाची दारे सामान्यांसाठी थोड्याफार प्रमाणात उघडली गेली. याकाळात प्रामुख्याने धार्मिक व उदरनिर्वाहासाठी व्यवसायिक शिक्षण दिले जात होते. परंतु जास्त भर हा धार्मिक शिक्षणावरच होता. पुढे भारतात पाश्चात्यांचा प्रवेश झाला. हे पाश्चात्य उच्च शिक्षित व आधुनिक विचारांचे असल्याने भारतीयांना आधुनिक मूल्यांची जाणीव होऊ लागली, तरी सुद्धा भारतीयांसाठी या आधुनिक व पाश्चात्य शिक्षणाची दारे बंदच होती. परंतु १८१३ नंतर खऱ्या अर्थाने पाश्चात्य व आधुनिक शिक्षणास सुरूवात झाली व वेगवेगळ्या ठिकाणी आधुनिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन होऊ लागल्या. त्यात ख्रिश्चन मिशनरी व एतद्देशिय समाज सुधारक यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली सुरूवातीच्या काळात शिक्षणप्रसारासाठी प्रयत्न करणाऱ्या एतद्देशिय

समाजसुधारकात राजाराम मोहन रॉय यांचे नाव घ्यावे लागते. नंतर वेगवेगळ्या समाजसुधारकांनी प्रयत्न सुरू केले. तरीही शिक्षणाची दारे सर्वसामान्यासाठी खुली झाली नव्हती. ती खुली करण्यासाठी नंतरच्या काळात म.फुले, राजर्षि शाहू महाराज, म.कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रम करून शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत आणण्याचा प्रयत्न केला. अशाच प्रकारचे शिक्षण प्रसाराचे कार्य करणारे डॉ.भा.पां.हिवाळे हे सुद्धा पहिल्या पिढीतील एक समाजसुधारक म्हणून ओळखले जातात.

### ३.१ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे शिक्षण विषयक विचार :

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारतात तसेच जगाच्या पाठीवर अनेक शिक्षण तज्ज्ञ होऊन गेले. त्यांनी काळाच्या गरजेनुसार शिक्षणात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. किंबहुना काहींनी काळाच्या पुढे जाऊन भावी शिक्षण व समाजाच्या गरजा यांचा विचार करून आपले विचार मांडले. त्यामुळे त्यांचे विचार हे क्रांतिकारकच मानावे लागतात. भारतात सुद्धा अशा क्रांतिकारक शिक्षण विषयक विचारवंताची पिढी निर्माण झाली. ती म्हणजे रविंद्रनाथ टागोर, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील हे होत. यांच्या पंगतीत हिवाळेंना बसविणे योग्य होईल. या सर्व समाजसुधारकांचे विचार खरोखरच देशाला स्वावलंबी करणारे व बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे होते.

डॉ.हिवाळे यांच्या शैक्षणिक विचारांवर बालपणापासून ख्रिश्चन मिशनरींच्या सुधारकी विचारांचा प्रभाव पडलेला होता. पुढे शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक सुधारणांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो. या सर्वांच्या शैक्षणिक सुधारणांचा, विचारांचा डॉ.हिवाळेंनी अभ्यास करून आपली स्वत:ची शैक्षणिक मते मांडली व ती समाजापर्यंत पोहोचविली आहेत. त्यासाठी त्यांनी

वेळोवेळी 'ज्ञानोदय' नियतकालिकातून लेखन केले. तसेच आपल्या विचारांच्या प्रसारासाठी 'उषा' नावचे साप्ताहिक चालवले व आपल्या पुस्तकांतून शिक्षणासंबधी लेखन करून बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. हिवाळे फक्त बोलके समाजसुधारक नव्हते, तर ते कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली. १९४२ मध्ये मुंबईतील ह्यूम हायस्कूल चालवायला घेऊन, तसेच पुढे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून 'अहमदनगर कॉलेज'ची स्थापना केली. यातून त्यांनी विचारांना दिलेली कृतीची जोड दिसून येते. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणात सुसंगतता असावी. प्राथमिक शिक्षण हे उच्च शिक्षणाचा पाया असल्याने प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नये, असे त्यांना वाटत असे. त्यासाठी त्यांनी वेळोवेळी प्राथमिक शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी यांच्यासंबधी लिखाण केले आहे.

प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ.हिवाळे म्हणतात, "लहानपणी मुलांची केवळ शारीरिक वाढ होते, असे नाही तर त्यांची मानसिक वाढ होत असते. पुष्कळ आई बापांचे लक्ष मुलांकडे मूल शाळेला जाऊ लागेपर्यंत मुळीच नसते, ही फार मोठी चूक आहे. कारण मूल सात वर्षाचे होण्यापूर्वीच सर्व आयुष्यभर ज्याचा परिणाम होईल, अशा सवयी मुलाला लागलेल्या असतात."[३] मुलांवर शाळेत जाण्यापूर्वीच अथवा मूल पहिल्या - दुसऱ्या वर्गात असतानाच्या काळातच त्याच्यावर चांगले संस्कार झाल्यास ते मूल ते संस्कार जन्मभर विसरत नाही, असे त्यांना वाटत असे. डॉ. हिवाळेंचे शैक्षणिक विचार आधुनिक होते. आज ज्या शिक्षणपद्धतीचा पाश्चात्य देशात व भारतात प्रभाव जाणवतो तो म्हणजे मुलांच्या प्राथमिक शिक्षणापासून मुलाला रूची असणाऱ्या विषयाचे शिक्षण देणे हा होय. याविषयी डॉ.हिवाळेंनी भारत पारतंत्र्यात असल्यापासून लेखन सुरू केले होते. विनाकारण विद्यार्थ्यांना आवड नसणाऱ्या क्षेत्रात घालू नये विद्यार्थ्यांचे तर नुकसान होतेच; परंतु देशाचेही नुकसान होते. याविषयी ते

म्हणतात, “काही विद्यार्थ्यांना वाटते आपल्याला हे शिक्षण झेपणार नाही. त्याच्यावर त्या शिक्षणाचा बोजा टाकणे इष्ट नाही. त्याला त्याच्या आवडीचे शिक्षण घेऊ देणे हेच शेवटी इष्ट ठरते. त्यांना त्यांच्या स्वाभाविक आवडीच्या क्षेत्रात नेऊन सोडले पाहिजे, तसे होत नाही. त्यामुळे बेशिस्तीचा प्रश्न उद्‌भवतो.”[४] याची सुरूवात प्राथमिक शिक्षणापासूनच व्हावी, असे डॉ. हिवाळेंना वाटत असे. आज हे म्हणणे सर्वांना पटत आहे. सध्या प्राथमिक शाळेपासूनच आवडीनुसार शिक्षण देणाऱ्या संस्था निघत आहेत. त्यामुळे मुले काही ठराविक क्षेत्रात प्राविण्य मिळवत आहेत.

प्राथमिक शिक्षण हे किती गरजेचे आहे, हे भारतातील राजकीय पुढाऱ्यांनी आणि समाजसुधारकांनी जनतेला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व सांगताना हिवाळे ज्ञानोदयात म्हणतात, “प्राथमिक शिक्षणाचा योग्य प्रसार झाल्याशिवाय राष्ट्राची खरी उन्नती होत नाही.”[५] राष्ट्राची उन्नती, विकास व्हावयाचा असेल तर प्राथमिक शिक्षणावर भर देऊन दर्जेदार प्राथमिक शिक्षणाची पायाभरणी करावी तरच देशाचा विकास होईल. बहुजनसमाजापर्यंत शिक्षणाचा प्रवाह वाहत जावा व मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण देऊन राष्ट्र उभारणीचा पाया मजबूत करावा, त्यासाठी ते वेगवेगळ्या राष्ट्रातील साक्षरतेचा दाखला देतात. तेथील साक्षरतेमुळे त्या देशाचा कसा विकास होत आहे. या विषयीही त्यांनी लिखाण केले आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय जनता आपल्या राजकीय हक्कासाठी लढणार नाही याची जाणीव हिवाळेंना होती.

डॉ.हिवाळे वेळोवेळी शिक्षकांविषयी लेखन करत. शाळांचा दर्जा घसरतो अथवा शिक्षक हा पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करत नाही, अशी ओरड अनेकदा ऐकायला येते. याचे कारण म्हणजे, “ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा पास होऊन बाहेर पडलेल्या लोकांपैकी बरेच लोक शाळा खात्यात नोकऱ्या करू इच्छित नाही याचे कारण शिक्षकास फार कमी पगार मिळतो.”[६] हेच होय. असे डॉ.हिवाळेंना वाटत तेव्हा शिक्षकांच्या

योग्य पगाराची व्यवस्था शासनाने करावी. तेव्हा ते पूर्ण कार्यक्षमतेने शिकवतील असे त्यांना वाटत. १९२१ मध्ये ते ज्ञानोदयातील 'खेडेगावातील शिक्षक' या मथळयाच्या लेखात लिहितात, "कित्येक शाळा बंद कराव्यात पण शिक्षकांचे हाल होऊ देऊ नये, असे आम्हास वाटते. संसाराची काळजी नसली म्हणजे शिक्षक लोकांस अधिक सेवा करणे शक्य होईल."[७] काही लोक म्हणतात, शिक्षकाने विनामूल्य किंवा अल्प वेतनावर सेवा करावी, परंतु तसे करणे सर्वांनाच शक्य नाही. शिक्षकालासुद्धा घर संसार असतो तेव्हा हा संसाराचा गाडा चालविण्यासाठी त्याला आर्थिक समस्या भेडसावू नये, त्यासाठी त्यांना योग्य तो पगार दिला जावा. तेव्हाच त्या शिक्षकाचे लक्ष घरच्या समस्यांकडे न लागता मुलांच्या विकासाकडे लागेल. स्वातंत्र्योत्तर भारताने याच विचारसरणीतून शिक्षकाच्या पगारात वेळोवेळी वाढ घडवून आणली आहे. डॉ.हिवाळे यांनी वेळोवेळी सरकारी धोरण तसेच लोकल बोर्डाच्या धोरणाविषयी नापसंती व्यक्त केलेली दिसून येते. शिक्षणप्रसारात इमारतींसारख्या गोष्टींची सक्ती करू नये, असे त्यांना वाटत. शाळा सुरू करण्यासाठी विशिष्ट पद्धतीची इमारतच पाहिजे हे सरकारी धोरण बरोबर नाही. यामुळे बऱ्याच शाळांची अनुदाने अडकून पडली आहेत, असे त्यांना वाटे. ते म्हणत की, "हिंदुस्थानात अशा निर्बंधाचे कारण दिसत नाही इथे खेड्यापाड्यात कुठेही झाडाखाली किंवा देवळात सुद्धा शाळा चालविता येते मग अमूक आकाराची इमारत पाहिजे म्हणून अशा तऱ्हेने पैसा अडकविण्यात काय फायदा आहे. खरोखरच सध्या शिक्षणाच्या फैलावाची आवश्यकता आहे. शिक्षणोपयोगी ठराविक इमारतीची नाही."[८] पारतंत्र्यात भारताची आर्थिक स्थिती अधिक खालावलेली होती. या परिस्थितीत इमारतींसाठी पैसा खर्च करण्यापेक्षा शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी हा पैसा वापरावा असे त्यांना वाटते. या ठिकाणी हिवाळेंवर रवींद्रनाथ टागोरांच्या निसर्गातून शिक्षण या विचारांचा प्रभाव पडलेला जाणवतो.

डॉ.हिवाळे भारतीय शिक्षण पद्धतीतील दोष दाखवून त्यात सुधारणा कशा पद्धतीने करता येतील, याविषयी वैचारिक मंथन ज्ञानोदयातील लेखातून करीत असत. काहीवेळा ते सरकारी धोरणावर सडेतोड टीकाही करतात. विद्यार्थ्यांच्या ध्येय शून्यतेबद्दल व बेशिस्तपणा बद्दल नेहमी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना जबाबदार धरले जाते. भारताचे राष्ट्रपती आपल्या भाषणात म्हणतात, "याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधील संबध तुटले आहेत."[९] या विषयी आपले विचार मांडताना हिवाळेंनी लिहिले की, "राष्ट्राध्यक्षांसारख्या एका अत्युच्च स्थानावरील व्यक्तीने एका महत्त्वाच्या प्रश्नावर केलेले मतप्रदर्शन अत्यंत उथळ आहे. कारण राष्ट्राध्यक्षांचे विवेचन खरे मानले, तर त्यातून दुसरा प्रश्न उद्‌भवतो. तो हा की, विद्यार्थ्यातील आणि शिक्षकातील संबध ताणण्याचे तरी कारण काय? आजकालचे शिक्षकच नालायक आहेत, अगर आजकालचे विद्यार्थीच बेजबाबदार आहे, असा सवंग तळतळाट करून काही या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही.आजच्या शिक्षणव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत काही तरी दोष असला पाहिजे हेच त्याचे कारण असू शकते आणि वस्तुस्थितीही तशीच आहे."[१०] म्हणून विद्यार्थी व शिक्षक यांच्यावर याचे खापर न फोडता समाजव्यवस्था व शिक्षणपद्धतीत बदल घडवून आणावा, असे डॉ.हिवाळेंना वाटत असे.

राष्ट्रांच्या गरजेनुरूप शिक्षण पद्धतीला आकार दिला जात असतो. राष्ट्रांच्या गरजा शिक्षणपद्धतीतून भागविल्या जात असतात. याचा प्रत्यय आपल्याला इंग्रजी शासनकाळापासून ते आतापर्यंत येतो. इंग्रजांचा भारतीय शिक्षण व शिक्षणपद्धतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वार्थी होता. त्यानुसार त्यांनी भारतीय शिक्षणपद्धतीला आकार दिला. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही त्या शिक्षणपद्धतीत फारसा बदल झाला नाही. त्यामुळे यात अमुलाग्र बदल घडवून आणावा व देशाच्या विकासात भर घालणाऱ्या शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांची निर्मिती करावी, असे हिवाळेंना वाटत होते. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या दशकातील शिक्षण पद्धतीवर टीका करताना हिवाळे म्हणतात,

"आजच्या शिक्षण पद्धतीला ना रूप आहे; ना आकार, ना तिच्या पाठीशी कसली निश्चित योजना आहे. इंग्रजांनी आपले राज्य चालवणारे नोकर नि नोकरशहा निर्माण करण्यासाठी उभारलेल्या शिक्षण पद्धतीची मूळ चौकट अजूनही जशीच्या तशीच कायम आहे. फारसा फरक झाला असेल तर तो एवढाच की, शिक्षणशास्त्र कशाशी खातात याची गंधवार्ताही नसलेल्या कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी आपले काही खुळे या योजनेत घुसडून दिली आहेत. प्राथमिक शाळेचा शिक्षक बनायलाही शिक्षणक्षेत्रात किमान प्रावीण्य मिळवण्याचे प्रमाणपत्र लागत असले तरी शिक्षणमंत्री बनायला मात्र कॉंग्रेसचा येनकेन पुढारी बनण्याखेरीज कसलीही लायकी लागत नाही. शिक्षण खात्यातील नोकरशाही शिक्षणक्षेत्रात दर्दी असावी असा नियम नाही."[११] असे परखड मत डॉ.हिवाळेंनी आपल्या शिक्षण पद्धतीबाबत 'उषा' साप्ताहिकाच्या लेखातून १९५८ मध्ये कॉंग्रेस शासनाच्या काळात मांडले होते. शिक्षकाची लायकी काय असावी हे शिक्षण क्षेत्राचा गंधही नसलेला माणूस ठरवतो ही खरोखरच खेदाची बाब आहे. शिक्षणमंत्री बनायला राजकीय पाठबळ आवश्यक असते त्याला शिक्षण क्षेत्रातील पुसटशी माहिती नसते. शिक्षणमंत्री हा त्या क्षेत्रातील तज्ज्ञ असावा असे डॉ.हिवाळेंना वाटत होते.

डॉ.हिवाळे यांनी शालेय अभ्यासक्रमाविषयी लेखन केले आहे. ते शालेय शिक्षणाबद्दल बोलताना म्हणतात, "कोवळ्या मुलांच्या अपरिपक्व डोक्यात सबंध पृथ्वीचा भूगोल नी मानवजातीचा लक्षावधी वर्षांचा इतिहास प्रथम भरून मग मारावयाच्या इयत्तान त्यांना कलकत्ता, मद्रास व नागपूर कुठे आहे, हे शिकविण्याचा जो उलटाक्रम मुंबई राज्यातील शाळांत चालू आहे तो ही सर्वांना माहीत आहे. शाळेच्या शेवटच्या तीन वर्षातच काय ते इंग्रजी शिकवायचे नी मग ही तुटपुंजी शिदोरी घेऊन कॉलेजात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत गहन विषयही सर्रास इंग्रजीमध्ये शिकवायला सुरूवात करायचे हा मुंबई विद्यापीठाने काढलेला अजब शिरस्ता व त्यामुळे उडालेला गोंधळही सर्वांना माहीत आहे."[१२] अशा शब्दात त्यांनी शालेय अभ्याक्रमावर टीका

केली. त्यांच्या मते, शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करत असताना सुरूवातीला विद्यार्थ्यांना माहिती असलेल्या घटकाकडून माहिती नसलेल्या घटकाकडे म्हणजेच सोप्याकडून कठीणांकडे अशा पद्धतीने अभ्यासक्रम तयार करावा त्यामुळे विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे पडेल व विद्यार्थी संख्या वाढेल तसेच इंग्रजीच्या अध्ययनाबाबत होते. आज महाराष्ट्र शासनाने पहिल्या वर्गापासून इंग्रजी शिकवण्याचा आग्रह धरला आहे. तोच इंग्रजी शिकवण्याचा आग्रह डॉ.हिवाळेंनी स्वातंत्र्यपूर्वकाळापासून धरला होता. कारण इंग्रजी ही अंतरराष्ट्रीय भाषा आहे. व याच भाषेत मोठ्या प्रमाणात ज्ञान साठलेले आहे. ते जर मिळवायचे असेल तर पहिल्या वर्गापासून इंग्रजी भाषा शिकल्यास मुलांना उच्च शिक्षण घेताना इंग्रजी भाषा अवघड जाणार नाही. तसेच भारतीय तरुण सुद्धा परदेशी लोकांपेक्षा कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत.

डॉ.हिवाळेंनी इंग्रजी भाषेचा जो आग्रह धरला होता. यावरून काहींचा असा ग्रह होतो की, त्यांनी मायबोलीला कमी लेखले किंवा तिची अवहेलना केली. परंतु तसे नसून डॉ.हिवाळेंना असे वाटत असे की, प्रत्येकाला स्वत:च्या मायबोलीचा अभिमान वाटावा. कारण ती त्याची जन्मानंतर पहिल्यांदा आत्मसात केलेली भाषा असते असाच अभिमान डॉ.हिवाळेंना मराठी भाषेविषयी होता. हे त्यांच्या साहित्यावरून दिसून येते. ते उषा साप्ताहिकाच्या लेखात लिहितात की, "सरकारी दरबारीनी भांडवलवाल्या कंपन्यांच्या बाजारी जनतेच्या व विद्यार्थ्यांच्या मायबोलीला हिणकस मानले जात असल्याने शिक्षणक्षेत्रातही मायबोलीची उपेक्षा होत आहे."[१३] मायबोली मराठीची उपेक्षा थांबवावी यासाठी सुरूवातीला शासनाने स्वत:हून पुढे यावे व सरकारी कार्यालयात व शाळेत मराठी भाषा अनिवार्य करावी त्याशिवाय मराठीची उपेक्षा थांबणार नाही, असे स्पष्ट मत डॉ.हिवाळे मांडताना दिसतात. आज हा मराठीचा प्रश्न गंभीर रूप धारण करत आहे व शासनाने सुद्धा नमते घेऊन सरकारी कार्यालये व न्यायालयात मराठी

भाषा अनिवार्य केली आहे. यातून आपल्याला डॉ.हिवाळेंची मराठी विषयी असणारी आत्मियता दिसून येते.

आज जो शिक्षणक्षेत्रात सावळा गोंधळ चालू आहे, शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे ते थांबवावे व शिक्षणातून चांगले कुशल तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत असे डॉ.हिवाळेंना वाटत असे स्वातंत्र्यानंतर काही शिक्षणसंस्था स्थापन करण्यात आल्या व काहींमधून मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला त्याचे वर्णन करताना ते म्हणतात, “असेल त्या जागेत जास्तीत जास्त विद्यार्थी कसेबसे कोंबायचे त्यांच्याकडून डोईजड फी वसूल करायची नी कमीतकमी शिक्षकांवर कामाचा डोईजड बोजा लादून विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेशीतून कसेबसे पलिकडे ढकलायचे हा आमच्या शिक्षणव्यवस्थेचा ढाचा आहे. त्यातच ‘राष्ट्राच्या भावी पिढीचा शिल्पकार’ म्हणून शब्दांनी गौरविल्या जाणाऱ्या शिक्षकांना पगार इतका अपुरा असतो की, संसारिक विवंचनेपुढे त्यांना स्वत:चा व्यासंग वाढवायलाही उसंत नसते आणि उमेदही नसते. शिवाय शिक्षणाची व राष्ट्रीय विकासाची सांगड घातलेली नसल्याने शिक्षण संस्थातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांपुढे बेकारी आ वासून उभी राहते.”[१४] यासाठी प्रथमत: शिक्षण व राष्ट्रीय विकास यांची सांगड घालावी त्यामुळे बेकारीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल असे डॉ.हिवाळेंना वाटत असे. नुसती शिक्षण व्यवस्था सदोष आहे असे म्हणून न थांबता त्यात सुधारणा करण्यासाठी शिक्षण, विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी पुढे येऊन त्यात भाग घेतला पाहिजे असे त्यांना वाटत असे.

डॉ.हिवाळेंना शिक्षणाबद्दल, शिक्षण घेणाऱ्याबद्दल व शिक्षणदानाचे काम करणाऱ्याबद्दल विशेष आदर होता. त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. ग्रामीण भागातील बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिलेला होता. त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत यासाठी त्यांनी अहमदनगर कॉलेजची स्थापना करून महाविद्यालयामार्फत ग्रामीण समाज व बहुजनापर्यंत

शिक्षण पोहोचविले त्यांच्या मते, "बौद्धिक पात्रता असूनही आर्थिक अक्षमतेमुळे ज्यांना शिक्षण घेणे अशक्य आहे, अशा सर्वांनाच शैक्षणिक बाबतीत तरी समान संधीचे महान तत्त्व अवलंबिले पाहिजे."[१५] असे डॉ.हिवाळेंना वाटत असे. यासाठी त्यांनी अहमदानगर महाविद्यालयाची स्थापना केली व ही संस्था आजही नवी शैक्षणिक मूल्ये रूजवित आहे व ज्ञानदानाचे कार्य करीत आहे.

### ३.२ डॉ.हिवाळेंचे विल्सन कॉलेजमधील कार्य :

डॉ.हिवाळे ३0 मे १९३0 मध्ये अमेरिकेतून हॉर्वर्ड विद्यापीठातून पीएच.डी.पदवी घेऊन भारतात परतल्यानंतर लगेचच मुंबईच्या विल्सन कॉलेजात प्राध्यापक म्हणून रूजू झाले. ते अमेरिकेतून परतण्याआधीच त्यांनी भारतात आल्यावर कोणत्या ठिकाणी स्थायिक व्हावे व कोणत्या कार्यात सहभागी व्हावे याविषयी भारतातील अमेरिकन मराठी मिशनच्या सभासदात चर्चा होती. कारण इतका शिकलेला तरूण अमेरिकेतच एखाद्या लठ्ठपगाराची नोकरी करील अशी भीती मिशनला होती. किंवा भारतात येऊनही एखादी चांगली नोकरी मिळवतील असे वाटत होते. परंतु डॉ.हिवाळेंनी आपले कार्यक्षेत्र शिक्षण घेत असतानाच ठरविले होते. ते म्हणजे ज्ञानदानाचे शिक्षणक्षेत्र होय. त्याची सुरूवात मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून झाली. डॉ.हिवाळेंनी निवडलेल्या क्षेत्रात शेवटपर्यंत योगदान दिले. १ जाने.१९३१ च्या ज्ञानोदयच्या अंकात ज्ञानोदयकार म्हणतात, "डॉ.हिवाळे कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत शिक्षक वर्गात येऊन तेथे शिकविण्याची त्यांची अनेक वर्षाची इच्छा होती आणि आम्हाला सर्वांना आनंददायी घटना झाली आणि त्यांची इच्छा पूर्ण झाली. डॉ.हिवाळेंनी अनेक वर्ष अमेरिकेत खर्ची घातली आणि त्याचबरोबर त्यांनी जगातील इतर देशही पाहिले आणि आता तो सर्व अनुभव शहाणपणाचा खजिना विल्सन कॉलेजच्या सेवेत उपयोगी होईल."[१६] खरोखरच त्यांनी आपल्या अनुभवाचा व शहाणपणाचा उपयोग

विल्सन कॉलेजमध्ये विद्यार्थी घडविण्यासाठी केला. त्याची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना देताना त्यांना आनंद वाटे विद्यार्थ्यांनासुद्धा तेथील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीची जाणीव झाली व आपणही डॉ.हिवाळेसरांसारखे अमेरिकेत जाऊन शिक्षण घ्यावे; असे वाटू लागले.

## ३.३ विल्सन कॉलेजातील शैक्षणिक कार्य :

विल्सन कॉलेजात रूजू होताच डॉ.हिवाळेंच्या असे लक्षात आले की, येथे कोणतेही सामाजिक उपक्रम होत नाही व अशा कार्यासाठी कुणीही पुढाकार घेत नाही. इतर पाश्चात्य देशातील विद्यार्थ्यांप्रमाणे येथील विद्यार्थ्यांना कॉलेजच्या वर्गाशिवाय इतर वेळी एकत्र येता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये येथील प्रश्नावर तसेच आपल्या समस्यांवर विचार विनिमय करता येत नाही ही गोष्ट डॉ.हिवाळेंना सतत सतावत होती. विद्यार्थ्यांना मोकळ्या वेळेत एकत्र येण्यासाठी काहीतरी उपक्रम सुरू करावा यासाठी त्यांनी त्यावेळचे विल्सन कॉलेजचे प्राचार्य डॉ.मकन्झी यांची भेट घेऊन त्यांनी आपल्या मनातील विचार त्यांना बोलून दाखविले परंतु डॉ.मॅकन्झी यांच्या बोलण्याचा सार असा होता की, मुले व मुली एकत्र आल्यानंतर काही समस्या निर्माण होतात व त्या समस्या सोडविण्यास व असे कार्यक्रम घेण्यास कुणाला वेळ नाही. परंतु डॉ.हिवाळेंनी समस्या निर्माण होऊ न देण्याच व झाल्यास स्वत: त्यास सामोरे जाण्याची तयारी दाखवली व सर्व जबाबदारी स्वत: होऊन आपल्या खांद्यावर घेतली. डॉ.मॅकन्झी यांनी परवानगी दिल्याने त्यांचा मार्ग मोकळा झाला अशा सामाजिक उपक्रमाची सुरूवात डॉ.हिवाळेंनी स्वत:च्या घरापासून केली. कॉलेजच्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना निमंत्रणे देऊन पहिला कार्यक्रम आपल्या घरी घेतला. या कार्यक्रमात स्नेहभोजन, गप्पा, गोष्टी, गाणी, खेळ तसेच सामाजिक विषयावर चर्चा, शिक्षक – विद्यार्थी समस्यांवर चर्चा यासारख्या वेगवेगळ्या विषयावर चर्चा झाली व करमणूकही झाली. यामुळे अशा

कार्यक्रमाची प्रथाच कॉलेजमध्ये पडली व प्रत्येक सुट्टीच्या दिवशी असे कार्यक्रम होऊ लागले अशा सामाजिक कार्यक्रमाचा आर्थिक भार डॉ.हिवाळे सोसत असत त्यामुळे विद्यार्थ्यांना एकत्र येऊन मनमोकळेपणाने बोलता येऊ लागले तसेच त्यांच्यातील सामाजिक प्रश्नांच्या चर्चेमुळे विद्यार्थ्यात सामाजिक प्रश्नाची जाण निर्माण होऊन एक सुशिक्षित भारतीय समाजसुधारकांचा गट निर्माण होऊ लागला व तो नंतर भारतीय राजकारण आणि समाजकारणात सक्रिय भाग घेऊ लागला.

डॉ.हिवाळेंना शिक्षकाने वर्गात चार भिंतीच्या आत शिकवावे, इतर सामाजिक बाबींकडे लक्ष देऊ नये, हे मान्य नव्हते. शिक्षकाने शिकविण्याचे कार्य तर उत्कृष्टपणे पार पाडावेच त्याचबरोबर इतर सामाजिक कार्यातही भाग घ्यावा असा त्यांचा विचार होता. डॉ.हिवाळे विद्यार्थी व शिक्षकात अल्पकाळामध्येच आवडते शिक्षक म्हणून ओळखले जाऊ लागले. विद्यार्थी हा त्यांचा केंद्रबिंदू होता. विद्यार्थी कधीही व कोणतीही समस्या घेऊन आल्यास ते ती वैयक्तिक पातळीवर सोडवत असत.

### ३.४ गरीब विद्यार्थ्यांना कॉलेजला येण्यास प्रोत्साहन व मदत :

डॉ.हिवाळे फक्त बोलके समाजसुधारक नव्हते तर कर्ते समाजसुधारक होते. मुंबई सारख्या ठिकाणी विल्सन कॉलेजातून शिक्षण घेणाऱ्या गरीब खेडूत मुलांच्या हालअपेष्टांची त्यांना जाणीव होती. त्यामुळे या खेड्यातील अशिक्षित पालकांच्या मुलांविषयी अतुलनीय सहानुभूती डॉ.हिवाळेंना होती त्यांच्या समस्या त्यांना स्वत:च्या समस्यांसारख्या वाटत व ते त्या सोडविण्यासाठी धावून येत.

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात शहरातून फक्त बोटांवर मोजण्याइतकीच महाविद्यालये होती.तरीही या महाविद्यालयातून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अजूनही कमीच होती मात्र माध्यमिक शाळेतून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेऊन मोठ्या प्रमाणात तरून बाहेर पडत होते. ते उच्च शिक्षणासाठी प्रवेश का घेत नाही हा प्रश्न डॉ.हिवाळेंना सतत पडत

असे यावर त्यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला तेव्हा त्यांना समजले की, या विद्यार्थ्यांना दूरच्या खेड्यातून कॉलेजला येण्यासाठी कसलीही सोय नाही तसेच मुंबई सारख्या ठिकाणी राहून शिक्षण घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नाही इतक्या दूरच्या परिसरातून पायी येणे सकाळच्या वर्गास येणे शक्य नव्हते व कॉलेजला न येता परीक्षेला बसले तर नापास होत असत, यामुळे खेड्यातील विद्यार्थ्यांची संख्या रोडावली होती. डॉ.हिवाळेंनी हा प्रश्न सोडविण्यासाठी मॅट्रिक परीक्षेचा निकाल लागल्यानंतर जितकी मुले उत्तीर्ण झाली त्यांचा तपास करून त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या भेटी घेऊन उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले सर्वांना कॉलेजात दाखल करून घेतले. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी "पुष्कळ विचारांती यांनी दूरून येणाऱ्या मुलांना सायकली घेऊन दिल्या त्यामुळे तरी ही मुले वेळेवर तासांना उपस्थित राहतील असे त्यांना वाटले त्याकाळी आजच्या इतक्या महाग नव्हत्या पण आजच्या इतक्या स्वस्तही नव्हत्या यांनी स्वत:च्या पैशाने त्या सायकली खरेदी करून दिल्या."[१७] त्यांचा हा उपक्रम खरोखरच अतुलनीय होता. शिक्षणाचे महत्त्व सर्वच सांगतात परंतु प्रत्यक्षात विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यास थोडेच पुढे येतात. त्यातील डॉ.हिवाळे हे एक होते. स्वत:च्या जेमतेम उत्पन्नातून त्यांनी हा उपक्रम राबविला होता. यामागे फक्त विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन ज्ञान आत्मसात करून देशासाठी आपले योगदान दयावे, हा उदात्त हेतू होता. या त्यांच्या कार्यातून त्यांना ग्रामीण दीन दलित समाजाविषयी असलेली आस्था दिसून येते.

### ३.५ ह्यूम हायस्कूलमधील डॉ.हिवाळे यांचे कार्य :

डॉ.हिवाळे यांनी प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या ज्ञानोदयाच्या लेखातून त्यावर प्रकाश टाकला. प्राथमिक शिक्षण जर उच्च दर्जाचे असेल तर आपोआपच विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी तयार होतील व त्यामुळे देशाच्या विकासास हातभार लागेल. प्राथमिक शिक्षण हा देश विकासाचा पाया आहे.

तो भक्कम झाला पाहिजे जर त्याकडेच दुर्लक्ष झाले व विद्यार्थीसंख्येला गळती लागली तर उच्च शिक्षण दयायचे कुणाला हा त्यांच्या समोर प्रश्न उभा राही त्यामुळे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून चालणार नाही तर खेड्यापाड्यातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मोहीम आखली पाहिजे कारण खेड्यापाड्यातील अनेक कुटुंबातील मुले आजही सक्तीचे व मोफत करूनही दुर्लक्षित आहेत. त्यांच्या समस्यांचा शोध घेतला पाहिजे असे डॉ. हिवाळेंना वाटत असे.

डॉ. हिवाळे आपल्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेच्या कार्यात मग्न असतानाच त्यांना एका बातमीने अनपेक्षित धक्का बसला "मिशनने मायखळ्याचे ह्यूम हायस्कूल बंद करण्याचे ठरविले त्याची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली होती. ही शाळा ऐतिहासीक दृष्टीने महत्त्वाची होती. गेली अनेक वर्षे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्याचे कार्य करत होती."[१८] हा ख्रिश्चन मिशनने घेतलेला निर्णय त्यांना पटला नाही व त्यांनी मिशन बरोबर बोलणी करून हायस्कूल चालू राहावे यासाठी प्रयत्न सुरू केले. इतक्या वर्षापासून ही शाळा ज्ञानदानाचे कार्य करीत आहे आणि अशी शाळा अचानक बंद पडावी हा विचार त्यांना बोचत राहिला.

१९४२ चा काळ स्वातंत्र्याच्या धामधुमिचा होता. चलेजाव चळवळ जोमात होती त्याच वेळी इंग्रज सरकार दुसऱ्या महायुद्धात गुंतलेले होते. स्वातंत्र्यचळवळ एका निर्णायक टप्प्यावर येऊन उभी होती व निश्चितच पारतंत्र भारताची स्वातंत्र्याकडे वाटचाल चालू होती भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा होता. युद्ध समाप्ती नंतर इंग्रज भारताला स्वातंत्र्य देतील असा डॉ. हिवाळेंना विश्वास होता. अशा नवस्वतंत्र राष्ट्रास सर्वात जास्त गरज भासणार ती सुशिक्षित पिढीची त्यामुळे नवनवीन शिक्षण संस्था स्थापन व्हाव्यात असे त्यांना वाटत होते आणि तसे होण्याऐवजी मिशनरीने चालवलेले कित्येक दशकांचा वारसा असलेले हायस्कूल बंद पडण्याच्या मार्गावर होते. तसे होऊ नये म्हणून मिशनबरोबर विचार विनिमय करून त्यांनी मिशनला विनंती केली

की, “एका वर्षासाठी शाळा माझ्या ताब्यात द्या आणि शाळेला आपल्या पायावर उभी करून दाखवतो हे आव्हान दिले.”[१९] केवढा हा आत्मविश्वास त्यांच्या ठायी होता जर एका वर्षात शाळेतील परिस्थिती बदलली नाही व विद्यार्थी संख्या वाढून आर्थिक सुस्थिती निर्माण न झाल्यास खुशाल शाळा बंद करा असे मिशनला कळवले. मिशनलासुद्धा त्यांच्या कर्तृत्त्वाची जाणीव होती अर्थातच मिशनने शाळा त्यांच्या ताब्यात दिली व एक वर्षाचा प्रयोग करून पाहण्यास सांगितले. त्यांनी स्वत: या शाळेचे विनावेतन काम पाहण्यास सुरू केले. त्यांच्या कामाचा व्याप आणखीच वाढला तरीही त्यांनी कोणतीही तक्रार न करता आपले विल्सन कॉलेजमधील विद्यादानाचे कार्य चालू ठेवले.

डॉ.हिवाळे यांनी शाळा ताब्यात घेतल्यानंतर मुलांच्या गळतीची कारणे शोधून काढली. त्यावर उपाययोजना करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला ते स्वत: शाळेच्या आवारात राहण्यास गेले. विद्यार्थी गळतीच्या कारणांचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, बरेचसे विद्यार्थी लांबच्या अंतरावरून शाळेत येतात. येण्याजाण्याची सोय नसते शाळेत वाचनासाठी पुस्तके नाहीत, शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना क्रीडांगणावर खेळण्याची परवानगी नाही बरेच विद्यार्थी गरीब परिस्थितीमुळे दुपारचे जेवण आणत नाहीत, त्यामुळे त्यांची शाळेत बसण्याची मानसिकता नाही ही सर्व कारणे शोधून त्यावर अंमलबजावणी केली.

शाळेतील मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी व शाळेच्या विकासकार्यात जास्तीत जास्त वेळ देता यावा, म्हणून ते शाळेच्या आवारात कुटुंबासह राहण्यास गेले. आपल्या घरात बालपणापासून जमविलेली ग्रंथसंपदा त्यांनी शाळेच्या वाचनालयात दिली. दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा जर राहण्याचा प्रश्न सुटला तर बरेच विद्यार्थी वाढतील याची त्यांना खात्री होती यासाठी “अतिशय गरजू विद्यार्थ्यांसाठी त्यांनी होस्टेल काढले.”[२०] त्यामुळे जे विद्यार्थी दूरवरच्या खेड्यातून शाळेत येत होते त्यांची राहण्याची

सोय झाली. शाळेच्या आसपास व वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या क्रीडांगणावर शाळा सुटल्यानंतर खेळण्यासाठी परवानगी दिली. तसेच मुलांच्या जेवणाचा प्रश्न सोडविण्यासाठी मेसची अल्पदरात सोय केली त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येत अल्पावधीतच मोठ्या प्रमाणावर वाढ झाली याकाळात येणारा सर्व खर्चाची स्वत: जबाबदारी सोसून त्यांनी ही शाळा मुलांनी फुलवून टाकली.

पुढे १९४५ नंतर डॉ.हिवाळेंची अहमदनगरला कॉलेज काढण्याची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू झाली. तेव्हा त्यांच्या पत्नीने ह्यूम हायस्कूलची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या पत्नी रूथबाई हिवाळे म्हणतात, "आम्ही दोघांनी सतत विनामूल्य चार वर्षे त्या शाळेचे काम पाहिले इकडे मुलांची संख्या फार वाढल्याने शाळेचे उत्पन्नही वाढले."[२१] शाळा चालविण्यामागे डॉ.हिवाळेंचा एक मात्र उद्देश असलेला दिसून येतो तो म्हणजे समाजातील वंचित घटकांना शिक्षण मिळावे कोणत्याही कारणाने हा दुर्लक्षित असलेला घटक शिक्षणापासून वंचित राहू नये. इतर शिक्षण सम्राटाप्रमाणे पैसा, प्रसिद्धी हा उद्देश नव्हता. पुढे डॉ.हिवाळे अहमदनगर येथे स्थायिक झाल्यानंतर ह्यूम हायस्कूलची जबाबदारी मराठी मिशनचे एक सभासद श्री. घाटगे यांच्याकडे देण्यात आली.

### ३.६ विल्सन कॉलेजातील सिनेटमधील कार्य :

अमेरिकन मराठी मिशनने सुरू केलेल्या शैक्षणिक कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व कार्य सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी काही वरीष्ठ व विदवान प्राध्यापकांची एक समिती नेमलेली होती तिला सिनेट म्हणत असत. या समितीत डॉ.हिवाळेंपूर्वी अमेरिकन व काही युरोपियन प्राध्यापकांचा भरणा असे त्यात भारतीयांना कोणतेही स्थान नव्हते भारतीय हे पाश्चात्यांपेक्षा बुद्धीचातुर्य, विदवत्ता, ज्ञान यांनी मागासलेले

आहेत अशी धारणा पाश्चात्यांची होती. त्यामुळे त्यांना कोणत्याही महत्त्वाच्या पदावर कार्य करण्यास संधी दिली जात नव्हती, परंतु डॉ. हिवाळेंनी ही गोष्ट खोटी ठरविली.

डॉ. हिवाळे स्कॉलरशिप बोर्डाचे सदस्य झाल्यानंतर त्यांना त्याचे प्रमुख करण्यात आले. या बोर्डाकडे स्कॉलरशिपसाठी जे अर्ज आलेले आहेत त्यांची पडताळणी करून खरोखरच गरजू व होतकरू आहेत अशांचीच निवड स्कॉलरशिपकरता केली जात होती. अर्जाची छाननी करताना डॉ. हिवाळेंच्या एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली, ती म्हणजे बहुतेक अर्ज मुंबई, गुजराथ व इतर प्रमुख ठिकाणचे असत. उर्वरीत महाराष्ट्राचे किंवा नगरसारख्या दुष्काळी व मागासलेल्यांचे नसत कारण हे विद्यार्थी कॉलेज शिक्षणापर्यंत येऊच शकत नसत. मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊन ते कारकूनाच्या नोकऱ्या मिळवत पुढील शिक्षणाची त्यांची आर्थिक परिस्थिती नव्हती. "ही वस्तुस्थिती पाहून यांना खूप वाईट वाटते या विद्यार्थ्यांना शिकण्याच्या फी ची सवलत जरी मिळाली, तरी दोन वेळच्या जेवणाचा खर्च, इतर खर्च परवडण्यासारखा नसे. यासाठी अतिशय कमी दरात जेवणाची सोय करणे अत्यावश्यक आहे, असे यांचे म्हणणे होते. असे झाल्याशिवाय गरीबांच्या मुलांना मुंबईत येऊन शिक्षण घेणे अशक्य आहे याबद्दल यांच्या मनाला सतत तळमळ लागून राहिलेली असे."[२२] हाच विचार त्यांच्या मनामध्ये कायमस्वरूपी घोळत असे जे काही अर्ज ग्रामीण व दुष्काळी भागातून येत त्याची सर्व शहानिशा करून त्यांना स्कॉलरशिप मंजूर करत. याठिकाणी त्यांचा कल प्रामुख्याने दुष्काळी व गरीब ग्रामीण होतकरू विद्यार्थ्यांकडे असलेला दिसून येतो. त्यांनाच ते शिष्यवृत्ती मंजूर करत असत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली तरी त्यांचा राहण्याचा व जेवणाचा मोठा प्रश्न होता. तो सोडविण्यासाठी डॉ. हिवाळेंनी सिनेटच्या सभेत अनेकदा तो मांडला व कॉलेजने अशा विद्यार्थ्यांसाठी कमी किमतीत भोजनाची सोय करावी, असा आग्रह धरला. परंतु ती त्यांची मागणी अनेकदा मांडूनही पूर्ण न झाल्याने त्यांनी स्वत:

कॉलेजच्या विद्यार्थ्यांना कमी किमतीत भोजनाची सोय करण्याची योजना आखली व त्यासाठी कॉलेजकडून जागा मिळविली. खानावळ सुरू करून विद्यार्थ्यांना अल्पदरात भोजन मिळण्याची सोय केली.

एक समस्या सुटल्याबरोबर डॉ.हिवाळे दुसरी समस्या घेऊन तिचा पाठपुरावा करण्यास तयार असत. विल्सन कॉलेजमध्ये मुलांसाठी दोन वसतिगृहे होती परंतु मुलींसाठी एकही वसतिगृह नव्हते त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थीनींची संख्या कमी आहे असे त्यांच्या लक्षात आले. ज्या खेड्यातील मुलींचे नातेवाईक मुंबईत आहेत अशाच मुलींना त्यांच्याकडे राहून शिक्षण घेता येत असे बाकीच्या मुलींना शिक्षणाची इच्छा असूनही महाविद्यालयीन शिक्षण घेता येत नाही ही गोष्ट डॉ.हिवाळेंनी सिनेटच्या सभेत मांडून तिचा पाठपुरावा केला. जर अशा मुलींच्या राहण्याची सोय झाली तर कॉलेजमध्ये मुलींची संख्याही वाढेल व ग्रामीण भागातील गरीब मुली शिक्षण घेऊ शकतील हा दुहेरी हेतू डॉ.हिवाळेंनी सिनेटला स्पष्ट करून सांगितला व मुलींसाठी वसतिगृह उभारण्यास भाग पाडले. "या स्त्रियांच्या नवीन वसतिगृहाला अगदी योग्य असे पंडिता रमाबाईंचे नाव देण्यात आले."[२३] सिनेटवर असताना सारखे नवनवीन उपक्रमांच्या कल्पना सिनेटसमोर मांडाव्यात व त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न करण्यात ते नेहमी मग्न असत त्यांच्या कल्पनांचा केंद्रबिंदू नेहमी ग्रामीण भागातील गरीब होतकरू विद्यार्थी हाच होता व त्यासाठीच ते झटत होते.

### ३.७ अहमदनगर कॉलेजच्या उभारणीत डॉ.हिवाळेंचे योगदान :

डॉ.हिवाळे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अहमदनगर येथील मराठी मिशनच्या शाळेत झाले होते. त्यामुळे बालवयातच त्यांच्यावर मिशनरी लोकांच्या सेवाभावी वृत्तीचे संस्कार झाले होते. आपण सुद्धा उच्च शिक्षण घेऊन मिशनरींप्रमाणे काहीतरी समाजोपयोगी कार्य करावे, असा विचार त्यांच्या मनात येत असे. पुढे उच्च

शिक्षण पूर्ण करून आल्यावर विल्सन कॉलेजात सिनेटचे सदस्य झाल्यानंतर त्यांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे बहुतेक अर्ज मुंबई, गुजराथ व इतर प्रमुख ठिकाणचे असत. उर्वरित महाराष्ट्राचे किंवा नगरसारख्या दुष्काळी व मागासलेल्यांचे नसत. कारण हे विद्यार्थी कॉलेज शिक्षणापर्यंत येऊच शकत नसत मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊन ते कारकूनाच्या नोकऱ्या मिळवत पुढील शिक्षणाची त्यांची आर्थिक परिस्थिती नसत. ही वस्तुस्थिती पाहून यांना खूप वाईट वाटते या विद्यार्थ्यांना शिकण्याच्या फी ची सवलत जरी मिळाली तरी दोन वेळच्या जेवणाचा खर्च नी इतर खर्च परवडण्यासारखा नसे. यासाठी अतिशय कमी दरात जेवणाची सोय करणे अत्यावश्यक आहे असे यांचे म्हणणे होते. असे झाल्याशिवाय गरिबांच्या मुलांना मुंबईत येऊन शिक्षण घेणे अशक्य आहे. त्यामुळे ते विद्यार्थी बौद्धिक क्षमता असूनही आर्थिक अडचणींमुळे उच्चशिक्षण घेण्यापासून वंचित राहत होते. यावेळी डॉ.हिवाळेंच्या मनात असा विचार येऊ लागला की, जर अशा विद्यार्थ्यांसाठी त्यांच्याच भागात उच्च शिक्षणाची सोय झाली तर त्या मुलांची समस्या सुटेल, ही कल्पना त्यांच्या मनात सतत घर करून राहिली.

कॉलेज काढण्याची कल्पना डॉ.हिवाळेंच्या मनात घोळत असली तरी खऱ्या अर्थाने या कल्पनेला साकार करण्यासाठी १९४४ नंतर त्यांनी जोमाने प्रयत्न सुरू केले. त्याला कारणही तसेच होते. १९४४ च्या ऑक्टोबर मध्ये 'युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' या संस्थेच्या जनरल असेंब्लीच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील १८ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये डॉ.हिवाळे हे एक होते. या संस्थेच्या सभा दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी भरत व प्रत्येक प्रांतातून ठराविक प्रतिनिधींना बोलावले जात या सभेचा विचारार्थी घेतलेला विषय होता "नवभारतात हिंदी ख्रिस्ती चर्चचे स्थान"[२४] या विषयावर मोठ्या प्रमाणात उहापोह झाला. परंतु या सभेत महाराष्ट्रीयन प्रतिनिधींना आपले म्हणणे प्रभावीपणे मांडता आले नाही. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याकडे कुणीही लक्ष दिले नाही. "असेंब्लीच्या सदस्यांनी हिंदी ख्रिस्ती लोकांविषयीचा अनेक बाजुंनी विचार

केला. महाराष्ट्रातील डॉ.हिवाळे, रे.साळवी व स्वतंत्र विचारवादी श्री.त्रिभूवन यांनी ज्यावेळी महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाज आणि इतर प्रांतातील ख्रिस्ती समाज यांची तुलना केली तेव्हा महाराष्ट्रातील समाज इतर प्रांतातील समाजाच्या फारच मागे आहे असे आढळून आले. याचे कारण उच्च शिक्षणाचा अभाव हे होते. इतर प्रांतातून ख्रिस्ती लोकांच्या शिक्षणाच्या सोयी आहेत. कितीतरी विद्यार्थ्यांचे कमी खर्चात कॉलेजचे शिक्षण होते. त्यामुळे तेथील विद्यार्थी फक्त हिंदी विश्वविद्यालयाच्या पदव्या घेण्यात समाधान न मानता परदेशातील विश्वविद्यालयात आपली बुद्धी कसास लावण्यास जातात आमच्याकडे तशा सोयी कुठे आहेत."[२५] अशी त्यांनी महाराष्ट्र व इतर प्रांतात असलेली शिक्षणाची दरी दाखवून दिली. याच कारणामुळे महाराष्ट्रीयन प्रतिनिधी आपले विचार सभेमध्ये प्रकर्षाने मांडू शकले नाही. इंग्रजीचे अल्पज्ञान हे त्याचे मुख्य कारण होते. इतरांचे म्हणणे सुद्धा जाणून घेणे महाराष्ट्रीय सदस्यांना शक्य झाले नव्हते.

असेंब्ली संपल्यानंतर मात्र सर्व महाराष्ट्रीयन प्रतिनिधी एकत्र जमले व आपले इंग्रजीच्या अल्पज्ञानाच्या जाणिवेने महाराष्ट्रात उच्चशिक्षणासाठी प्रयत्न करण्याचे ठरवून डॉ.हिवाळेंना सांगितले की, "अहमदनगरला कॉलेज काढलेच पाहिजे. कॉलेज काढल्याशिवाय आपल्या मुलाबाळांना नीट इंग्लिश बोलता येणार नाही. महाराष्ट्र असाच मागे राहील."[२६] अशी विनंती करून यातून मार्ग काढण्यास सांगितले. आपली पिढी उच्च शिक्षणापासून वंचित राहिली आहे. किमान पुढच्या पिढीला तरी उच्च शिक्षण मिळावे व उच्च विद्याविभूषित करावे, असे या प्रतिनिधींचे म्हणणे होते. डॉ.हिवाळे काही गर्भश्रीमंत व्यक्ती नव्हते की, एखाद्या प्रश्नावर लगेच होय म्हणून कॉलेज काढतील. त्यांनी या प्रश्नावर विचार करण्यास वेळ मागवून घेऊन विचारांती कॉलेज काढण्याचा प्रयत्न करण्यास होकार दिला. ही इतकी सोपी गोष्ट नाही, त्यासाठी मोठ्या दिव्यातून जावे लागणार होते, तरी डॉ.हिवाळेंनी एखाद्या कार्यास होकार दिल्यास त्यात ते मन लावून कार्य करत असत.

### ३.८ कॉलेज काढण्यातील अडचणी :

अहमदनगर सारख्या दुष्काळी व ग्रामीण भागात कॉलेज काढणे सोपी गोष्ट नव्हती. त्यापूर्वी अनेक प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक होते. अजमेरची ख्रिश्चन कौन्सिलची मिटिंग संपल्यानंतर डॉ.हिवाळेंनी या कामात स्वत:ला वाहून घेतले व अडचणींचा अभ्यास केला. सुरूवातीला अहमदनगर हे ठिकाण डोळ्यासमोर ठेवले. येथे मोठ्या प्रमाणात ख्रिस्ती समाज वस्ती करून राहात होता. त्यामुळे या शहराला महाराष्ट्राचे 'येरूसलेम' म्हणून ओळखले जाते. ख्रिस्ती समाजाच्या उच्च शिक्षणाची सोय नसल्याने डॉ.हिवाळेंनी ठरविले, "अहमदनगर परिसरातील अमेरिकन मराठी मिशनच्या कार्यास प्रत्यक्ष सुरूवात २० डिसें.१८३१ मध्ये झाली."[२७] मिशनच्या कार्याचा विस्तार उत्तरोत्तर वाढत गेला. मिशनरींचा उद्देश फक्त धर्मप्रसाराचा नसून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचाही होता. त्यावेळी मिशनऱ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षणसंस्था स्थापन केल्या. तत्कालिन समाजव्यवस्थेत ज्ञानाची कवाडे समाजासाठी बंद होती. त्यामुळे समाजात अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी परंपरांचा सुकाळ होऊन अनेक भाकड समजुतींना समाजव्यवहारात मानाचे स्थान मिळाले होते. त्याचा परिणाम केवळ ज्ञानापुरता मर्यादित नव्हता, तर आर्थिक प्रगतीवरही झाला होता. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन राहिला नव्हता. आरोग्याचे प्रश्न भयंकर रूप धारण करत होते. या समाजाला कित्येक शतकांच्या निद्रेतून उठविण्याचे कार्य मिशनरींनी केले. व ज्ञानाची दरवाजे बहुजन समाजासाठी उघडवले त्यामुळे त्यांना नवी विज्ञाननिष्ठ दृष्टी प्राप्त झाली.

अहमदनगर भागात मिशनरींनी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या त्यासाठी शाळा काढल्या त्यामुळे या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणारांची संख्या वाढू लागली. काही दशके ही प्रक्रिया चालली परंतु याकाळात फक्त मॅट्रिक पर्यंतचेच शिक्षण दिले जात होते. महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची इच्छा असूनही अनेकांना ते घेता येत

नव्हते. तेव्हा त्यांना फक्त कारकूनी नोकऱ्या स्वीकारून समाधान मानावे लागत होते. अहमदनगर सारख्या भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी 'अहमदनगर मराठी मिशनने' एक आर्टस् कॉलेज सुरू केले होते. "तेव्हाच्या कॉलेजची सुरूवात १ जाने.१८८७ रोजी अवघे १३ विद्यार्थी घेऊन झाली"[२८] परंतु विद्यार्थी संख्येअभावी हे कॉलेज लवकरच बंद पडले. हा अनुभव जमेस धरून पुन्हा कॉलेज सुरू करण्यास कोणीही पुढाकार घेतला नाही. परंतु डॉ.हिवाळेंनी आपल्या प्रयत्नांनी अहमदनगर येथे महाविद्यालय काढण्यात पुढाकार घेऊन हा प्रयत्न यशस्वी करून दाखवला.

अहमदनगर येथे कॉलेज सुरू करण्यात अनेक अडचणींचा सामना डॉ.हिवाळेंना करावा लागला. १८८७ चा अनुभव जमेस धरला, तर कॉलेज सुरू केल्यानंतर विद्यार्थी मिळतील का ? हा मोठा प्रश्न होता. कारण उच्च शिक्षणाविषयी अजूनही ग्रामीण भागात पाहिजे तेवढी अनुकूल परिस्थिती नव्हती. याच बरोबर अहमदनगर शहरात ख्रिस्तेतर संस्था व लोकनायक लवकरच एक महाविद्यालय काढणार, असा बोलबाला होता. त्यामुळे आपण कॉलेज काढले, तर विद्यार्थी संख्येचा प्रश्न भेडसावणार होता. तसेच ख्रिश्चन मिशनरींमधून काहींना वाटत होते की, अहमदनगरला हिवाळेंनी कॉलेज काढले, तर ते विल्सन कॉलेजशी चढाओढ करतील या सर्व प्रश्नांचा विचार करून डॉ.हिवाळेंनी आपल्या प्रास्ताविक निवेदनात स्पष्ट सांगून टाकले की, "१.आम्ही कोणत्याही ख्रिस्ती किंवा ख्रिस्तेतर कॉलेजशी प्रतिस्पर्धा करणार नाही. २. मिशनपासून त्यांच्या नियमित अर्थसंचयातून छदाम सुद्धा घेणार नाही. ३.विल्सनशी चढाओढ तर नाहीच नाही, परंतु त्यांच्याने जे करवत नाही ते आम्ही नगरात करण्याची परमेश्वराच्या साह्याने शिकस्त करू."[२९] असे डॉ.हिवाळेंनी सांगितले व अहमदनगरातील सर्व समाजाचा महाविद्यालयाला पाठिंबा मिळविण्यासाठी अहमदनगरला आले. "२-३ नोव्हेंबर १९४४ रोजी नगरला भेट दिली व हिंदू समाजातील निरनिराळे पुढारी, मुसलमान, वकील व व्यापारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात त्यांचा सर्वांचा

हार्दिक पाठिंबा मिळाला."[३०] आता कॉलेज काढण्यासाठी नगर परिसरातील जनतेने पाठिंबा तर दिला परंतु आणखी बऱ्याच अडचणी सोडवायच्या होत्या.

अहमदनगर जिल्हा व त्याला जोडून असणारा बीड जिल्हा या ठिकाणी शिक्षणाच्या सोयी नसल्याने अहमदनगरला कॉलेज काढण्याचे ठरले. परंतु अडचणींचा डोंगर डॉ.हिवाळेंसमोर होता त्यामध्ये सर्वात मोठी धोंड म्हणजे आर्थिक अडचण होय. ही समस्या सुटल्याशिवाय कॉलेजचे स्वप्न साकार होणार नव्हते याची कल्पना त्यांना होती. कारण कॉलेज काढण्यासाठी त्यावेळच्या नियमानुसार युनिव्हर्सिटी डिपॉझीट म्हणून एक लाख रुपये ठेवणे आवश्यक होते. तरच पुढच्या गोष्टी करता येण्याजोग्या होत्या अर्थात एक लाख रुपये जमा करणे त्याकाळी सोपी गोष्ट नव्हती. यावर उपाय असा होता की, "शतायुषी अशा विल्सन कॉलेजनेच आपली शाखा म्हणून नगरला कॉलेज काढावे पण ते शक्य झाले नाही."[३१] विल्सन कॉलेजला स्थापन होऊन शंभर वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे शंभर वर्षाचा शैक्षणिक क्षेत्राचा अनुभव कॉलेजच्या पाठीशी होता. त्यामुळे विल्सन कॉलेजनेच आपली एक शाखा अहमदनगरला काढावी असे त्यांना वाटत होते. पण ते शक्य झाले नाही. तेव्हा डॉ.हिवाळेंनी पुढाकार घेऊन कॉलेज काढण्यासाठी स्वत: पैसा उभा करण्याचे ठरविले. स्वत:ला या कार्यात वाहून घेतले.

अहमदनगरला कॉलेज काढण्यासाठी प्रथमत: अमेरिकन मराठी मिशनच्या कौन्सिलची परवानगी घेणे आवश्यक होते. सरला बार्नबस म्हणतात, "१९४५ मध्ये जनरल कौन्सिलची सभा सोलापूरात भरली पप्पांना त्यांचा प्रकल्प मांडण्यासाठी वेळ देण्यात आला तासाभराच्या भाषणात त्यांनी आपले सारे वक्तृत्व पणाला लावून संकल्प मांडला."[३२] परंतु त्यांचे म्हणणे कोणीही मनावर घेतले नाही व कॉलेज काढण्याची त्यांची कल्पना इतर सभासदांनी हसण्यावारी घेतली. डॉ.हिवाळेंकडे कॉलेज काढण्यासाठी पैसा नाही जागा नाही, ते कॉलेज कसे काढतात ते पाहू, अशी

आडमुठेपणाची भूमिका घेतली. तरीही त्यांच्या आग्रहामुळे कॉलेज काढण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे की नाही, यासाठी एक तज्ज्ञाची समिती नेमण्याचे ठरविले. डॉ.हिवाळेंनी या समितीच्या निर्णयावर विसंबून न राहता अमेरिकेला जाऊन अमेरिकन मिशन समोर आपली बाजू मांडण्याचे ठरविले. "१९४५ साली डॉ.हिवाळेंनी एक वर्षा ची प्रदीर्घ मुदतीची रजा घेतली व अमेरिकेला जाऊन कॉलेज निधी उभारण्याचे ठरविले."[३३] तो काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता. परदेशी जाणे अतिशय धोक्याचे होते व अमेरिकेला जाण्यासाठी बोटीमध्ये जागा मिळणे अतिशय अवघड होते. त्यातच प्रवासाचे तिकीट भरमसाठ वाढले होते. त्यांच्याजवळ प्रवासासाठी आवश्यक पैसेही नव्हते. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी पैसे मिळवले. "प्रथम मोटार विकली, ब्रदर जॉर्जने ५०० रू. उसने दिले."[३४] इतकी वाईट आर्थिक परिस्थिती असताना डॉ.हिवाळेंनी आपले प्रयत्न सोडले नाहीत व पैसे जमा करून अमेरिकेला गेले.

आर्थिक परिस्थितीवर मात करून आपले ध्येय साध्य करण्यात डॉ.हिवाळेंचा हात कोणीही धरू शकत नाही. यावेळी ह्यूम हायस्कूलची जबाबदारी सुद्धा त्यांच्याकडे होती. ती पत्नी रूथबाई यांच्याकडे देऊन डॉ.हिवाळे अमेरिकेला जाण्याच्या तयारीला लागले. परंतु यावेळी अमेरिकेला जाणाऱ्यांची भली मोठी वेटिंग लिस्ट होती. त्यामुळे डॉ.हिवाळेंचे अमेरिकेला जाणे अनिश्चित दिसू लागले. परंतु म्हणतात ना ज्याचे दैव बलवत्तर त्याला कोणीही अडवू शकत नाही. तसेच झाले जहाजावरचा कप्तान हा हॉर्वर्ड विद्यापीठाचा पदवीधर होता व डॉ.हिवाळेंची पीएच्.डी. सुद्धा याच विद्यापीठाची होती. कप्तानाने हिवाळेंच्या नावासमोरील एम.ए.पीएच्.डी.(हॉर्वर्ड) पदवी बघीतली व एकाच विद्यापीठातील पदवीधर म्हणून डॉ.हिवाळेंच्या नावाला पसंती दिली. त्यामुळे डॉ.हिवाळे हे अमेरिकेला जाऊ शकले व आपले महत्त्वाचे कार्य करू शकले.

डॉ.हिवाळेंची कॉलेज काढण्याची कल्पना काही प्रतिष्ठित गृहस्थ व त्यांचे सहकारी यांना मान्य नव्हती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या प्रयत्नात आडकाठी घालण्याचा अयशस्वी प्रयत्न करून पाहिला. त्यासाठी अमेरिकेला तार पाठवून डॉ.हिवाळेंची कॉलेज कल्पना कशी चुकीची आहे, याविषयी अमेरिकन मराठी मिशनला कळवले व त्याचाच एक भाग म्हणून बोस्टन वरून एक तार आली. त्यात डॉ.हिवाळेंना अमेरिकेत येण्यापासून परावृत्त केले होते. परंतु तार येण्याच्या अगोदरच डॉ.हिवाळे बोटीतून भारताचा किनारा सोडून अमेरिकेला रवाना झाले होते. त्यामुळे डॉ.हिवाळेंच्या विरोधकांचा मोठा हिरमोड झाला.

## ३.९ अमेरिकेतील प्रयत्न :

डॉ.हिवाळेंच्या कल्पनेच्या विरोधकांनी ते अमेरिकेला पोहोचण्यापूर्वीच या कल्पनेतील फोलपणा अमेरिकेतील मिशनला पटवून दिला होता. तसेच कॉलेज काढण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे का नाही हे पाहण्यासाठी नेमलेल्या कमिटीने सुद्धा नकारात्मक अहवाल दिला होता. त्यामुळे अमेरिकेतील मिशनने व फर्लोवर (सुट्टीवर) असलेल्या मिशनरींनी चर्चेअंती कॉलेज काढण्यास नकार दिला. सरला बार्नबस म्हणतात, “इंडिया सेक्रेटरी व फर्लोवर असलेल्या मिशनरींनी एक मिटिंग घेऊन कॉलेज उघडायला संमती नाही, असा निर्णय अगोदरच घेतला होता.”[३५] त्यामुळे डॉ.हिवाळे अमेरिकेत बोर्ड ऑफिसात पोहोचले तेव्हा तेथील वातावरण त्यांच्या विषयी उदासीन असलेले जाणवले. यापूर्वी डॉ.हिवाळे जेव्हा सुट्टी घेऊन अमेरिकेला जात तेव्हा त्यांचे स्वागत उत्साहाने व आनंदाने होत. त्यांचे बोर्डाशी असलेले संबध सुरूवातीपासून मैत्रीचे होते. “यावेळी मात्र वातावरण अनाकलनीय व काळजी करण्याजोगे होते. कॉलेज सुरू करण्यासाठी परवानगी द्यायची नाही, असा धक्कादायक निर्णय त्यांना कळविण्यात आला.”[३६] यावेळी त्यांच्या मनाची काय स्थिती झाली असेल, याची कल्पना न केलेली

बरी. या निर्णयाने त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होणार होता. इतके दिवस उराशी बाळगलेले स्वप्न अपूर्ण राहणार होते व त्यांच्या विरोधकांचा विजय होणार होता. यापेक्षाही धक्कादायक म्हणजे ग्रामीण भागातील गोरगरीब होतकरू तरुण उच्च शिक्षणापासून वंचित राहणार होता. शिक्षण क्षेत्रात शहरी व उच्चभ्रूंचीच मालकी राहणार होती. हा विचार त्यांच्या मनाला पटेना तर इकडे त्यांचे म्हणणे कोणीही ऐकून घेईना. त्यामुळे डॉ.हिवाळे खिन्न मनाने आपल्या निवासस्थानी निघून गेले व रात्रभर विचार करून आपण आपल्या स्वबळावर कॉलेज काढायचे मिशनचा आधार घ्यायचा नाही, असा निर्णय घेतला. तसेच मिशन बरोबर असलेले संबध तोडून टाकायचे व त्या दिवसापासून मिशनच्या नियंत्रणातून मुक्त होण्याचे ठरविले व लगेचच "राजीनामा लिहून त्यांनी अमेरिकन मराठी मिशनचे संबध तोडून त्यांच्या नियंत्रणाखालून त्या दिवसापासून स्वतंत्र होण्याचा निश्चय केला. राजीनामा सोमवारी सकाळी बोर्डरूम मध्ये दिला."[३७] त्यांच्या राजीनाम्याने मिशनमध्ये गोंधळ उडाला व मिशनने त्यांच्यासमोर अनेक प्रश्न उपस्थित केले. परंतु डॉ.हिवाळेंनी यावर शांतपणे उत्तर देऊन सांगितले मी पूर्ण विचारांती राजीनामा दिला आहे.

डॉ.हिवाळेंच्या राजीनामा प्रकरणावरून त्यांची निर्णयक्षमता व समोर येणाऱ्या अडचणीवर मात करण्याची वृत्ती दिसून येते. या राजीनामा प्रकरणामुळे कदाचित त्यांची विल्सन कॉलेजातील नोकरी जाणार होती म्हणजेच त्यांच्या उपजीविकेचे साधन जाणार होते.मिशनमध्ये त्यांना जो मान होता तो राहणार नव्हता. कदाचित कॉलेज कल्पना प्रत्यक्षात येण्याऐवजी आणखी दूर जाणार होती. तरी ह्या सर्व गोष्टींचा विचार करून त्यानी आपला राजीनामा बोर्डाला दिला परंतु याचा एक अनुकूल परिणाम झाला. बोर्डाने त्यांचा राजीनामा न स्वीकारता आपली बाजू मांडण्यास वेळ दिला व बराचसा वादविवाद आणि चर्चा करून डॉ.हिवाळेंनी, "आपली योजना सुरू करावी व जर त्यात अपयश आले तर प्रश्न आपोआपच मिटेल, जर त्यात यश आले तर त्यातून चांगले

होईल. इंडिया कमिटीने त्यांचा राजीनामा परत घ्यावयास लावला."[३८] या निर्णयाने डॉ. हिवाळे मनातून खूप खुष झाले. आपण कॉलेज सुरू केल्यानंतर ते सुरळीत चालवण्याची आपणात क्षमता आहे ते बंद पडू शकत नाही, याची त्यांना खात्री होती. आता स्वप्न त्यांना समीप दिसू लागले व साकारण्यासाठी पुन्हा नव्या जोमाने काम सुरू झाले.

### ३.१० कॉलेज काढण्याची पूर्वतयारी :

अमेरिकन बोर्डाने डॉ. हिवाळेंना स्वत:च्या हिमतीवर कॉलेज काढण्यास परवानगी दिली. आता प्रमुख प्रश्न होता तो कॉलेजसाठी पैसा उभा करण्याचा. यासाठी त्यांनी प्रथम कॉलेजची माहिती पुस्तिका छापून घेतली व अमेरिकेतील आपल्या मित्राकडे पाठवून दिली. तेथे जाऊन आपल्या मित्रांच्या भेटी घेऊन त्यांना कॉलेज कल्पना पटवून दिली. कॉलेजसाठी पैसा उभा करताना त्यांना सतत पैसा उभा करावा लागला. लोकांच्या भेटी घ्याव्या लागल्या कधी कधी लोकांच्या उपरोधी टीका ऐकाव्या लागल्या. काही कारण दाखवत तर काही उद्धटपणे अधिक तपशिल मागत. काही मूळ हेतूबद्दल शंका घेत. हेतुपूर्तीसाठी ही द्यावी लागणारी किंमत आहे या भावनेने डॉ. हिवाळे हे सहन करत. हे करताना काही अमेरिकेतील लोकांचा उपरोधिक सूर असा होता की, हिंदूस्थान भुकेने मरत असताना त्यांना अन्नाची गरज आहे, शिक्षणाची नाही. तेव्हा डॉ. हिवाळे म्हणत शिक्षणाअभावीच भारतीय लोक भुकेने मरत आहेत. ते मरू नये म्हणूनच भारतात उच्च शिक्षणाची गरज आहे. अशा सर्व प्रश्नांना ते आपल्या बुद्धिचातुर्याने उत्तरे देत व कॉलेज कल्पना त्या लोकांच्या गळी उतरवत.

डॉ. हिवाळे सतत कार्यमग्न असत. यामुळे त्यांनी ज्ञानोदयाचे संपादक असताना मि. डॅनफोर्थ यांच्या 'आय डेअर यू' या पुस्तकाचे मराठी भाषांतर केले होते. अमेरिकेतील "मिसरी राज्यातील सेंट लुईस येथील राल्स्टन प्यूरिमा कंपनीचे मि. विल्यम

डॅनफोर्थ हे सुप्रसिद्ध लोकोपयोगी कार्य करणारे होते. योग्य कार्यासाठी उदारपणे देणग्या देण्यासाठी ते प्रसिद्ध होते."[३९] हे डॉ.हिवाळेंना माहीत होते. आपल्या मित्रांमार्फत त्यांनी आपल्या या शुभकार्यात त्यांच्याकडून मदत मिळविण्याबाबत प्रयत्न केला. परंतु डॉ.हिवाळेंविषयी डॅनफोर्थ यांना कोणतीही कल्पना नसल्यामुळे त्यांनी भेट घेण्याचे नाकारले. परंतु जेव्हा त्यांना समजले की, आपल्या पुस्तकाचे मराठी भाषांतर डॉ.हिवाळेंनी केले आहे व ते आपल्याला भेटण्यासाठी उत्सुक आहेत तेव्हा मात्र त्यांनी स्वत: डॉ.हिवाळेंची भेट घेतली व विचारणा केली. "तुमचे नाव माझ्या फाईलमध्ये आहे. चला आपण थोडी सहल करण्यास जाऊ. मजबरोबर चला तुम्ही का भेटण्यास आलात ते सांगा"[४०] मि.डॅनफोर्थ यांनी डॉ.हिवाळेंची आपुलकीने चौकशी केली तेव्हा त्यांना कॉलेज काढण्यातील अडचण सांगून मदत करण्याबद्दल विनंती केली. तेव्हा मि.डॅनफोर्थ या उदार गृहस्थाने कॉलेजसाठी भरण्याचे एक लाख रुपयांचे डिपॉझीट देण्याचे मान्य केले. ज्याने सुरूवातीला आपली भेट नाकारली, तिच व्यक्ती आपल्याला भेटून एक लाख रूपये देते, हा चमत्कार डॉ.हिवाळेंच्या ज्ञानलालसेने व सतत कार्यमग्नतेने झालेला होता. मोकळ्या वेळेत वाचन व लेखन हा त्यांच छंद होता. असाच मोकळ्या वेळेत त्यांनी 'आय डेअर यू' या पुस्तकाचे भाषांतर मराठीत केले होते. या छोट्याशा गोष्टीचा इतका मोठा प्रभाव पडेल, अशी त्यांनी कधी कल्पना देखील केली नव्हती. त्यांनी मंजूर केलेला पैसा कॉलेज कार्यासाठीच वापरला जाईल याची खात्री देताना डॉ.हिवाळे डॅनफोर्थ यांना म्हणाले, "ही रक्कम तीन वर्षासाठी मंजुर करा नी कॉलेज काही कारणाने बंद पडले तर हे पैसे तुम्हाला परत मिळतील हे पैसे मला न देता बोस्टन बोर्डात पाठवा आणि जेव्हा गरज लागेल तेव्हा त्यांचा खजिनदार ते मि.टॉमस यांच्याकडे पाठवतील."[४१] या पैशाच्या नियोजनामुळे डॅनफोर्थ यांच्या देणगीतील एकही पैसा इतरत्र न वापरता सर्व कॉलेज कार्यासाठी वापरला जाणार होता याची मि.डॅनफोर्थ यांना खात्री पटली व दुर्दैवाने कॉलेज चालले नाही तर पैसे परत

करण्याची तयारी डॉ.हिवाळेंनी दाखवली. त्यामुळे मि.डॅनफोर्थ यांना समाधान वाटले.

१९४५-४६ या काळात डॉ.हिवाळे १४ महिने अमेरिकेत राहून आपल्या ध्येयपूर्तीतील अडथळा दूर करून जून १९४६ मध्ये भारतात परतले. आता आर्थिक अडचण काहीशी कमी झाली होती. परंतु पुढे आणखी समस्या आ वासून उभ्या होत्या. त्यात प्रामुख्याने कॉलेजसाठी पाहिजे असलेली जागा डॉ.हिवाळेंची स्वत:ची जागा नव्हती. मिशनकडून जागा मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व अहमदनगरला जागा पाहण्यासाठी त्यांची मुंबईवरून ये-जा सुरू झाली. याकाळात सुद्धा ते विल्सन कॉलेजात ज्ञानदानाचे कार्य करत होते. सुट्टीच्या दिवशी ते शालाबाह्य कामाला वेळ देत असत व आपल्या ज्ञानदानाच्या कार्याला प्राधान्य देत. कॉलेज काढणे निश्चित झाल्याने त्यांनी विल्सन कॉलेजच्या प्रशासनाचा व इतर छोट्या-छोट्या गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला. त्याचा फायदा अहमदनगरला महाविद्यालय सुरू झाल्यानंतर होणार होता. त्यासाठी कर्मचारी वर्गाकडून माहिती मिळवली. सुट्टीच्या दिवशी पुण्याच्या कॉलेजला भेटी दिल्या व त्यांचा सर्वांगिण अभ्यास केला. डॉ.हिवाळेंना आर्ट्स शाखेबद्दल पूर्ण माहिती होती, परंतु सायन्स शाखेबद्दल पुरेशी माहिती नव्हती. यासाठी त्यांनी "डॉ.टेलर नी इतर चार सायन्सच्या प्रोफेसरांची भेट घेऊन लागणाऱ्या वस्तूंची यादी करण्यास लावली. गॅस प्लॅन्टची इंग्लंडला एक वर्ष अगोदर ऑर्डर पाठविली."[४२] यावरून आर्ट्स शाखेबरोबरच सायन्स शाखा सुद्धा अहमदनगर महाविद्यालयात सुरू करण्याची डॉ.हिवाळे यांची योजना होती. त्यासाठी लागणाऱ्या साधनांची ऑर्डर त्यांनी देऊन ठेवली होती.

कॉलेजसाठी जागा मिळवून देण्याची जबाबदारी बोर्डाने भारतातील मिशनवरच सोपविली होती. "त्यावेळी अहमदनगरमध्ये वरिष्ठ मिशनरी जोजेफ व फलोरेन्स मोल्टन होते."[४३] त्यांनी डॉ.हिवाळेंना जागा पाहण्यासाठी आमंत्रण दिले. त्याप्रमाणे त्यांनी

अहमदनगरला जाऊन जागा पाहून सीना नदीच्या कडेला "पिवळी माडी म्हणून ओळखली जाणारी जागा दरमहा दोनशे रु.भाड्याने घेतली."[४४] ही जागा कॉलेजसाठी अतिशय सोयीस्कर होती. कारण जवळच मुख्य रस्ता होता. तसेच नदीच्या कडेला म्हणजे निसर्गरम्य ठिकाण यामुळे ही जागा कॉलेजसाठी आकर्षक ठरणार होती. आता जागेचा प्रश्न सुटला, कॉलेज प्रत्यक्षात येण्यासाठी त्यांनी हालचाली सुरू केल्या.

### ३.११ अहमदनगर कॉलेज प्रत्यक्षात उभे करण्याचा ऐतिहासीक क्षण :

अहमदनगर महाविद्यालय प्रत्यक्षात अस्तित्वात येईपर्यंत डॉ.हिवाळेंनी विल्सन कॉलेजातील अध्यापन कार्य व ह्यूम हायस्कूलची जबाबदारी याकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. आता मात्र कॉलेज सुरू होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. त्यामुळे त्यांना मुंबई सोडून अहमदनगरला स्थायिक व्हावे लागणार होते. त्याचबरोबर नवीन कॉलेजचा भरपूर व्याप वाढला होता. त्यामुळे त्यांनी विल्सन कॉलेजच्या व ह्यूम हायस्कूलच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचे ठरवून त्याप्रमाणे "नगरला कॉलेज काढायचे म्हणून यांनी विल्सन कॉलेजच्या आपल्या कामाचा राजीनामा दिला."[४५] त्यावेळी विल्सन कॉलेजच्या व ह्यूम हायस्कूलच्या सहकाऱ्यांनी त्यांना निरोप देण्यासाठी मोठा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी वर्गणी जमा केली. परंतु डॉ.हिवाळेंना असे स्मृतीचे प्रसंग कधी आवडले नाही. त्यांना त्यासाठी वेळही नव्हता. तेव्हा त्यांनी असा कार्यक्रम होऊ नये व आता माझ्याकडे अशा कार्यक्रमासाठी वेळही नाही, असे कळवले. तेव्हा जमा केलेली वर्गणी पुन्हा परत करण्यात आली.

कॉलेज प्रत्यक्षात सुरू होण्याची तारीख निश्चित झाली होती. जून १९४७ मध्ये कॉलेज सुरू होणार होते. या काळात सुद्धा त्यांना नाउमेद करण्याचा काही लोकांनी प्रयत्न केला. ते म्हणत की, "कॉलेजला निदान पंधरा तरी मुले आली, तरी नशीब म्हणायचे."[४६] तरीही डॉ.हिवाळेंनी ही टीका सहन केली. ते आपले कार्य शांतपणे

करत होते. त्यांना मुंबई सोडून अहमदनगरला स्थायिक होणे भाग होते. यावेळी मात्र कुटुंबाची मोठी हेळसांड झाली. यावेळी त्यांच्या मुली मुंबईला शिकत होत्या. त्यामुळे कुटुंबासह अहमदनगरला स्थायीक होणे शक्य नव्हते. तेव्हा ते काही दिवस एकटेच राहिले. रात्रंदिवस महाविद्यालय उभारणीचे कार्य चालू होते. त्यामुळे त्यांना या कामावर देखरेख करणे गरजेचे होते. या कामामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊ लागला. वेळेवर जेवण नाही जेवणासाठी वेळ नाही. रूथबाई हिवाळे म्हणतात की, "यांना इतके काम असे, की दुपारच्या जेवणास कधी कधी दोन अडीच वाजत. जेवणही थंड होऊन जात असत. तीच गोष्ट संध्याकाळच्या जेवणाची अस. त्यामुळे दोनच महिन्यात यांच्या प्रकृतीवर थोडा परिणाम झाला."[४७] मुलींच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून रूथबाईंना मुंबई सोडणे शक्य नसे. तरीही त्या नगरला येऊन डॉ.हिवाळेंना त्यांच्या कामात मदत करत असत.

कॉलेजची तयारी पूर्ण झाली होती. परंतु आर्थिक समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत होती. अद्यापही अमेरिकन मित्रांकडून देणग्या येण्यास सुरूवात झाली नव्हती. कारण प्रत्यक्षात कॉलेज काढल्याशिवाय कुणाला खरेपणा येणार नव्हता. कॉलेजच्या डिपॉझीटचा प्रश्न मिटला होता व इतर मित्रांकडून मिळालेली रक्कम आतापर्यंत फर्निचर वगैरे कामात खर्च झाली होती. आता इतर खर्चासाठी पैसा उरलेला नव्हता तसेच बरोबरच्या इतरांकडून सहकार्याची अपेक्षाच नव्हती. कारण जे लोक आपल्याला शाब्दिक सहानुभूती सुद्धा दाखवत नाहीत, त्या लोकांकडून पैशाची अपेक्षा करणे योग्य होणार नव्हते. म्हणून त्यांनी "त्यांच्या विल्सन कॉलेजचा प्रॉव्हिडंट फंड मागावून घेतला. त्याशिवाय घरातले पैसे नि सोने सर्व खर्ची घालणे भाग पडले."[४८] कॉलेज उभारणीच्या कामात त्यांनी आपल्याजवळ असणारी सर्व पुंजी खर्ची घातली व कॉलेजची सर्व कामे पूर्ण करून घेतली.

कॉलेज सुरू करण्यापूर्वी सर्व तयारी पूर्ण झाली की नाही याची पाहणी करण्यासाठी "मुंबई विद्यापीठाने प्रा.शहा आणि प्रा.वाडेकर यांची द्विसदस्यीय समिती नेमली होती. प्रा.वाडेकर यांनी मानव्य विभागाच्या सोयी पाहून आर्ट्स विभागाला परवानगी दिली. परंतु गॅस प्लॅन्ट आले नसल्यामुळे डॉ.शहा शास्त्र विभागाची परवानगी देईनात."[४९] आर्ट्स विभागाची तयारी पूर्ण झाली होती. पण सायन्स शाखेची तयारी अपूर्ण वाटत असल्याने त्यांनी शास्त्र शाखेला परवानगी दिली नाही व स्पष्टपणे सांगितले की, "गॅस प्लॅन्ट अजूनही आलेला नाही. त्याच्या शिवाय विज्ञान शाखा सुरू करण्याची मी परवानगी देऊ शकत नाही."[५०] तेव्हा डॉ.हिवाळेंनी गॅस प्लॅन्ट खरेदी केल्याचे व तो इंग्लंडहून पाठविल्याचे पत्र शहांना दाखविले. त्यामध्ये लिहिले होते, की एक महिन्यापूर्वी गॅस प्लॅन्ट पाठविला आहे. आता तो मुंबईत आला असेल व अजून कॉलेज सुरू होण्यास बारा दिवस बाकी होते तो पर्यंत तो अहमदनगरमध्ये येऊन पोहोचेल. असे डॉ.हिवाळेंनी सांगितले. तसेच शास्त्र शाखेस विद्यार्थ्यांची नावनोंदणी केलेली आहे. त्यामुळे शास्त्र शाखेस परवानगी द्यावी, अशी हिवाळेंची इच्छा होती. तरीही प्रा.शहांनी शास्त्र शाखेस परवानगी दिली नाही. तेव्हा डॉ.हिवाळेंना अतिशय दु:ख झाले.

डॉ.शहा चारच्या सुमारास मुंबईला जाण्यास निघाले तेव्हा डॉ.हिवाळेंनी त्याच गाडीत गॅस प्लॅन्टची चौकशी करण्यास एका प्राध्यापकास पाठविले. त्या शिक्षकाने मुंबईस जाऊन कंपनीच्या ऑफिसमध्ये जाऊन चौकशी केली असता त्यांच्या हातात एक पत्र देण्यात आले. त्यात म्हटले होते की, "गॅस प्लॅन्ट मुंबईच्या गोदीत आला आहे व तो अहमदनगरला पाठविण्याच्या बेतात आहे."[५१] ते पत्र शहांना दाखविले तेव्हा त्यांनी तिथेच महाविद्यालयाची सर्व तयारी पूर्ण झालेली आहे, अशा विद्यापीठाला जाणाऱ्या पत्रावर सही केली. ही गोष्ट डॉ.हिवाळेंना समजली तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. आता फक्त कॉलेज सुरू होण्याच्या दिवसाची ओढ लागली होती. तो

दिवस उजाडला. २० जून १९४७ हा दिवस सोनियाचा दिवस ठरला. डॉ.हिवाळेंच्या भगीरथ प्रयत्नांना यश आले व पहिल्याच दिवशी "पटावर विद्यार्थी संख्या होती २४० आणि विद्यार्थिनींची संख्या होती ३७."[५२] पंधरा सुद्धा विद्यार्थी मिळणार नाहीत असे कुचेष्टेने बोलणाऱ्या लोकांना डॉ.हिवाळेंनी आपल्या कृतीने उत्तर दिले होते. त्यांनी जे स्वप्न वर्षानुवर्षे पाहिले होते ते सत्यात उतरविण्यासाठी जिवाचे रान केले होते त्यांना आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

### ३.१२ डॉ.हिवाळे यांचे प्राचार्य म्हणून कार्य :

अहमदनगर जिल्ह्यात महाविद्यालय स्थापनेचे श्रेय डॉ.हिवाळेंना दिले जाते. त्यांनी अथक परिश्रम घेऊन अहमदनगरच नव्हे, तर आजूबाजूच्या जिल्ह्यात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अमुलाग्र क्रांतीच घडवून आणली. आपल्या असामान्य बुद्धी कर्तृत्वाचा ठसा उमटविला. जेव्हा शिक्षण क्षेत्रात केवळ शिक्षण तज्ज्ञ सेवाभावी वृत्तीने कार्य करीत कोणतेही प्रलोभन नसे. तेव्हा १९४७ मध्ये डॉ.हिवाळेंनी अहमदनगर कॉलेज सुरू केले आणि बहुजन समाजासाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी स्वत: अहमदनगर कॉलेजच्या प्राचार्य पदाची धुरा १९४७ ते १९५१ पर्यंत सांभाळली व कॉलेजचा पाया मजबूत केला. या कॉलेजचा बी.पी.एच.ई.सोसायटीच्या रूपाने जो विस्तार झालेला दिसतो त्याचा पाया डॉ.हिवाळेंनी भक्कमपणे रोवला आहे.

२० जून १९४७ रोजी कॉलेजची सुरूवात झाली. त्यानंतर थोड्याच दिवसात पारतंत्र्य भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे स्वतंत्र भारताचे नवभारतात रूपांतर करावयाचे होते. या कामी डॉ.हिवाळेंनी मोलाची मदत केली. अहमदनगर मध्ये फक्त कला शाखा उघडून चालणार नाही, तर शास्त्र शाखा सुद्धा तात्काळ उघडण्यासाठी त्यांनी जीवापाड प्रयत्न केले. स्वतंत्र भारतास प्राध्यापक, वकील, डॉक्टर, शास्त्रज्ञ यांची नितांत गरज आहे, हे त्यांनी ओळखले होते. उत्तम विद्यार्थी घडवायचे असतील,

तर उत्तम शिक्षक असणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटत. त्यासाठी त्यांनी विल्सन कॉलेज सारख्या संस्थेतून आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वामुळे "प्रा.मुंडक (प्राणीशास्त्र) आणि दोन बार्नबस बंधू (रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र) यांना नगरला आणले."[५३] तसेच इतर प्राध्यापक वर्गही अनुभवी व निष्णात असाच नेमला होता. त्यात "प्रा.बंडेलू (मराठी) अब्दुल करीम (उर्दू) घासकडवी (इंग्रजी) गांधी व वैद्य (रसायनशास्त्र) एक स्त्री प्राध्यापिका होती ती म्हणजे मिसेस सिंघल (इंग्रजी)"[५४] या प्राध्यापकांच्या नेमणुका डॉ.हिवाळेंनी स्वत: पारखून केल्या होत्या. डॉ.हिवाळे स्वत: तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, तर्कशास्त्र हे तीन विषय शिकवायचे.

१९४७ चा काळ हा कॉलेजचा बाल्यावस्थेचा काळ होता. या काळात त्यांनी कॉलेजची चांगली काळजी घेऊन वाढ केली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आकर्षित केले. त्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सुविधा देण्यास सुरूवात केली. जे लोक कारकुनी वगैरे नोकरी करत होते त्यांना पुढील शिक्षणासाठी उत्तेजन दिले. नोकरी करणाऱ्या लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून कॉलेजची वेळ सकाळचीच ठेवली.कारण कॉलेज सुटल्यानंतर त्यांना आपल्या कामावर जाता यावे हा त्यामागचा उद्देश होता. "अगोदरच्या अनेक विद्यार्थ्यांना कॉलेजचे शिक्षण घेता आले नाही. आणि मुलांना पुण्या मुंबईला कॉलेज शिक्षण घेण्यासाठी जाण्याची ऐपत नव्हती. म्हणून बहुतेकांनी मॅट्रिक नंतर कारकून वगैरे सारख्या नोकऱ्या धरल्या होत्या. ज्यावेळी अहमदनगर कॉलेज सुरू झाले त्यावेळी बरेच विद्यार्थी लग्न होऊन मुलाबाळांचे धनी झाले होते. त्यामुळे ते इतर विद्यार्थ्यांपेक्षा वयाने जास्त होते व अभ्यासाच्या बाबतीत परिपक्व व विचारपूर्वक होते. त्यांनी नोकरी सुरू ठेवली. कला शाखा सकाळी साडेसात वाजता सुरू होई म्हणून नोकरी करणाऱ्यांना ती करता येई."[५५] डॉ.हिवाळे स्वत: कॉलेजच्या गेटसमोर उभे राहून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत.

कॉलेज सुरू झाले परंतु विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी सर्वच पुस्तके सुरूवातीला ग्रंथालयात नव्हती. अशा आवश्यक व उपयुक्त पुस्तकांची यादी करून त्यांनी ती स्वत: मागवून घेतली. तसेच घरातील त्यांच्याजवळ असणारा ग्रंथसंग्रह विद्यार्थ्यांच्या वापरासाठी ग्रंथालयात ठेवला. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी पुस्तके मिळू लागली. कॉलेजमध्ये मुलांबरोबर मुलींनासुद्धा शिकता यावे, तसेच बाहेरून येणाऱ्या मुलींची सोय झाली पाहिजे यासाठी मुलींच्या वसतिगृहाची सोय केली. मुलांच्या वसतिगृहाची जबाबदारी स्वत: सांभाळली तर मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारी त्यांच्या पत्नी रूथबाई हिवाळे यांनी सांभाळली.

कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी नवनवीन योजना राबवण्यात व त्या विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात डॉ.हिवाळेंचा बराच वेळ जात असे. महाविद्यालयातील "बहुतेक मुलांनी फ्री शीप मिळावी म्हणून अर्ज केले होते. प्रोफेसरांच्या पगारांच्या रकमेची भरपाई मग कोठून करायची ? शेवटी ज्यांना या मुलांची चांगली माहिती आहे अशांची एक समिती नेमली त्यांनी अर्जाचा बारकाईने विचार केला."[५६] त्यात असे आढळून आले, की बऱ्याच विद्यार्थ्यांची फी भरण्याची आर्थिक स्थिती असूनही त्यांनी फ्री शीपसाठी अर्ज केले होते. तेव्हा त्यांचे अर्ज नाकारून ज्यांना खरोखरच अशक्य होते अशांना सवलती दिल्या. डॉ.हिवाळे हे विद्यार्थी प्रिय प्राचार्य होते. त्याच्या सभोवताली नेहमी विद्यार्थ्यांचा घोळका असे व ते त्यांना नेहमी वेगवेगळ्या बाबींविषयी मार्गदर्शन करत. युरोपात अमेरिका आदी देशातील स्वत:चे अनुभव सांगत व ते विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी त्यांना भविष्याच्या योजना बनवण्यास सांगत प्रत्येक रविवारी विद्यार्थ्यांना चॅपल मध्ये धार्मिक उपदेश करत असत. तेथे येणे कुणावरही बंधनकारक नसे.

गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याच्या योजनेमुळे तसेच प्राध्यापकांचे पगार भागवायचे त्यामुळे पैशाची मोठी निकड जाणवू लागली. अशा परिस्थितीतून मार्ग

काढण्यासाठी डॉ. हिवाळेंनी अमेरिकेला जाऊन आपल्या मित्राकडून आर्थिक मदत मिळवण्याचे ठरवले. त्यातच कॉलेजच्या प्राचार्य पदाचा भार त्यांच्यावर होता. त्यामुळे अल्पावधीत अमेरिकेला जाऊन पैसा जमवून पुन्हा अहमदनगरला येणे जरूरीचे होते. बोटीने अमेरिकेला जाण्यास महिनेच्या महिने लागत. त्यामुळे ऑक्टो.१९४७ ला डॉ.हिवाळे "रेव्ह मोल्टनला तीन महिन्याकरता हंगामी प्रिन्सिपल नेमून हे विमानाने अमेरिकेला रवाना झाले."[५७] व अमेरिकेतील वेगवेगळ्या धार्मिक व सामाजिक संस्था मित्र यांच्याकडून मदत मिळवून डिसें.१९४७ मध्ये अहमदनगरला आले. त्यावेळी अहमदनगर कॉलेज आपला पहिला वार्षिक दिवस साजरा करत होते. त्यात सहभागी होऊन त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ.हिवाळेंना वेगवेगळ्या सभा व चर्चासत्रात सहभागी होण्यास आनंद वाटत असे. यापूर्वीही त्यांनी वेगवेगळ्या चर्चासत्रात भाग घेतला होता. १९४७ च्या डिसेंबर मध्ये मद्रास राज्यात तांबरम येथे स्टुडंट्स ख्रिश्चन मूव्हमेंटचे मोठे अधिवेशन भरले होते. यासाठी डॉ हिवाळेंनी २५ विद्यार्थ्यांना पाठविले. त्यांची सर्व व्यवस्था केली, अशा चर्चासत्रात भाग घेतल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते व त्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळते याची जाणीव त्यांना होती.

डॉ.हिवाळे फक्त विद्यार्थ्यातच प्रिय होते असे नव्हे, तर शिक्षकांमध्येही प्रिय होते ते नेहमी शिक्षकांना प्रोत्साहन देत असत. वेगवेगळ्या वेळी त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य करीत, तसेच शिक्षकांनी आपल्या विषयात परिपूर्ण व्हावे म्हणून त्यांना संशोधन करण्यास प्रेरणा देत.

अहमदनगर कॉलेज स्थापनेच्या वेळी ते मुंबई विद्यापीठाशी संलग्न होते पुढे १९४८ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर अहमदनगर कॉलेज पुणे विद्यापीठाशी संलग्न झाले. पुणे-अहमदनगर पासून जवळच असल्याने कॉलेजचे काम अधिक सोयीचे झाले. "१९५१ साली विद्यापीठाने प्रिन्सिपलने आपल्या वयाच्या

साठाव्या वर्षी सेवानिवृत्त झालेच पाहिजे, असा नियम केला."[५८] त्याप्रमाणे डॉ.हिवाळे वयाच्या ६0व्या वर्षी सेवानिवृत्त झाले व श्री.थॉमस बार्नबस प्राचार्यपदी आले.

### ३.१३ अहमदनगर कॉलेजचे सचिव असतानाचे कार्य :

डॉ.हिवाळे विद्यापीठाने काढलेल्या साठ वर्षानंतर निवृत्तीच्या निर्णयावर काहीसे नाराज होते. त्यांच्या मते, शिक्षकांचा शिकवण्याचा व शिक्षणक्षेत्रातील अनुभव जसा वाढत जातो तसतशी त्यांची बुद्धिमत्ता प्रगल्भ होत जाते, असे त्यांना वाटे. त्यामुळे शिक्षक साठ वर्षांचा झाला तरी त्याच्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा, म्हणून शिक्षकाच्या निवृत्तीची अट ६0 पेक्षा अधिक असावी. सेवानिवृत्ती नंतर सुद्धा त्यांनी महाविद्यालयाचे सचिव म्हणून काम पाहिले. तेव्हा महाविद्यालय विस्तार व शिक्षण प्रसार यासारख्या गोष्टीबरोबर सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांनी योगदान दिले. १९५२ मध्ये कॉलेजच्या बोर्ड ऑफ कंट्रोलची बैठक भरली त्यात डॉ.हिवाळे "सेवानिवृत्त झाले असले तरी हरकत नाही. परंतु त्यांनी अहमदनगर कॉलेजचे प्रेसिडेंट म्हणून अमेरिकेला जाऊन कॉलेजच्या अमेरिकन मित्रांशी संबध वाढवावे आणि कॉलेजच्या मित्रमंडळाचे वर्तुळ वृद्धिंगत करावे, असे ठरले."[५९] त्याप्रमाणे डॉ.हिवाळेंनी अमेरिकेतील आपल्या मित्रांना अहमदनगर कॉलेजच्या ध्येयाची व कार्याची ओळख व्हावी तसेच कॉलेजसाठी परदेशातही हितचिंतकांची वाढ व्हावी, या उद्देशाने अमेरिकन प्रचार पद्धतीने कॉलेजची माहिती पुस्तिका आकर्षक पद्धतीने तयार करून घेऊन अहमदनगर कॉलेजचा प्रचार केला व त्यासाठी मदत मिळविली. "अहमदनगर कॉलेज एका अपादग्रस्त भागात जात-धर्मातील भावनेने उच्च शिक्षणाचे जे कार्य आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या परंतु ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांकरीता करीत आहे हे ऐकून आणि मानव्याच्या मूल्यांच्या जपवणुकीच्या कार्याला हातभार लावण्याच्या भावनेने प्रभावित होऊन न्यूयॉर्क मधील एका मोठ्या चर्चच्या निग्रो धर्मोपदेशकाने पाचशे डॉलर्सचा चेक आपली अल्पशी देणगी

म्हणून अहमदनगर कॉलेजला दिली."[६०] आर्थिक गरज भागविण्यासाठी डॉ.हिवाळेंनी अमेरिकेत चित्रांची प्रदर्शने भरविली, व्याख्याने दिली, चित्रपट दाखविले, यामुळे अहमदनगर कॉलेजची माहिती जगातील वेगवेगळ्या देशांतील लोकांपर्यंत जाऊन पोहोचली व त्यांनी या विधायक कार्यास आपल्या परीने मोलाची मदत केली.

कॉलेजचा प्रचार करण्याचा एकमात्र उद्देश होता आणि तो म्हणजे कॉलेजची आर्थिक परिस्थिती डबघाईची होती. कदाचित आर्थिक परिस्थिती सुदृढ नसल्याने कॉलेज बंद पडू शकत होते. त्यामुळे पैसा उभा करणे आवश्यक होते. ग्रामीण भागातील निम्म्यापेक्षा जास्त मुलांना शैक्षणिक सुविधा मोफत द्याव्या लागत होत्या, त्यामुळे महाविद्यालयावर आर्थिक बोजा पडत होता. याचा अभ्यास केल्यानंतर जाणवते की प्रचार करण्यामागे प्रसिद्धी मिळविण्याचा अगर इतर कोणताही हेतू नव्हता.

### ३.१४ डॉ.हिवाळे यांचे विद्यार्थी प्रेम :

डॉ.हिवाळे यांना आपल्या विद्यार्थ्यांविषयी अतिशय आपुलकी होती, याची प्रचिती आपल्याला ते विल्सन कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले तेव्हा पासून येते. वेगवेगळ्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, शैक्षणिक प्रगतीस उत्तेजन देणे, त्यांच्या समस्या सोडविणे यातच त्यांचा बराचसा वेळ जात असे. शिक्षकाने फक्त चार भिंतीच्या आतच शिकवणे एवढ्यापुरते ते शिक्षक नव्हते, तर आपल्या विद्यार्थ्यांसाठी कधीही उपलब्ध होणारे शिक्षक होते. विल्सन कॉलेजमध्ये असताना त्यांनी वेगवेगळे सामाजिक उपक्रम हाती घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे विद्यार्थी वर्गात ते आवडते शिक्षक झाले होते. विद्यार्थ्यांचा वसतिगृहाचा प्रश्न असो की स्कॉलरशिपचा किंवा विद्यार्थ्यांचा येण्याजाण्याचा प्रश्न असो त्यातून हिवाळेंचे विद्यार्थी प्रेमच दिसून येते. स्वतःच्या घरी विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचे आमंत्रण आठवड्यातून एकदा तरी असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या समस्या समजण्यास मदत होत असे. विद्यार्थी

आपल्या समस्या मनमोकळेपणाने त्यांच्या समोर मांडत. "डॉ.हिवाळे यांचे विल्सन कॉलेजमधील जीवन हे नेहमीच अध्यापनाचे नव्हते विद्यार्थी विकसित व्हावेत यादृष्टीने ते नवनवीन योजना आखत गरिबांना मदत करून अभ्यासासाठी मार्गदर्शन करून ते त्यांना जीवनात उभे राहण्यास मदत करीत."[६१] यामुळे अनेक विद्यार्थी भावी जीवनात यशाच्या शिखरावर पोहोचले. त्यांनी आपल्या प्रेमळ व कर्तव्य परायण शिक्षकाचे नाव आपल्या मनावर कोरून ठेवले. डॉ.हिवाळेंना विद्यार्थ्यांशिवाय करमत नसे मोकळ्या वेळेत ते विद्यार्थ्यांच्या घोळक्यात दिसत असत.

डॉ.हिवाळे यांनी ह्यूम हायस्कूल चालवायला घेतले ते केवळ विद्यार्थी प्रेमामुळेच. असे गरिबांच्या मुलांना मदत करणारे हायस्कूल बंद पडले, तर गरिबांना शिक्षण दुर्मिळ होऊन जाईल असे त्यांना वाटे. आपल्या दयाळु स्वभावाने त्यांनी अनेक गरीब विद्यार्थ्यांना शाळेत आणून राहण्यापासून ते पोषण आहार देण्यापर्यंत काळजी घेतली. त्यांना शाळा सुटल्यानंतर मैदानावर खेळण्यास परवानगी दिली. मुलांचा खेळण्याचा आवाज ऐकून काहींना त्रास वाटायचा तोच आवाज ऐकून डॉ.हिवाळे मनातून आनंदून जात असत. ही त्यांची विद्यार्थी प्रेमाची अत्युच्च सीमाच होती. त्यांनी मुलांच्या खऱ्या पालकाची भूमिका पार पाडली.

अहमदनगर कॉलेजची स्थापना केल्यानंतर पहिल्याच दिवशी ३00 पेक्षा जास्त विद्यार्थी कॉलेजमध्ये दाखल झाले होते. ही संख्या म्हणजे त्यांच्या आजपर्यंतच्या विद्यार्थी प्रेमाची पावतीच म्हणावी लागेल. "डॉ.हिवाळे सकाळीच उठून आपली सर्व कामे उरकून कॉलेजच्या फाटकापाशी उभे राहात व कॉलेजला येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे 'गुडमॉर्निंग गर्ल्स', 'गुडमॉर्निंग बॉईज' असे हासून स्वागत करीत."[६२] स्वत: प्राचार्य आपली विचारपूस करतात, यामुळे ते आनंदून सुखाऊन जात असत. "घरच्या गरिबीमुळे अनेक विद्यार्थी फी मध्ये सवलती मागत असत. एकूण संख्येपैकी निम्मे विद्यार्थी मोफत शिकत होते. कित्येकांनी डॉक्टरांच्या मायाळू स्वभावाचा फायदा घेतला

व फी भरण्याजोगी सुस्थिती असूनही सवलती मिळवल्या, परंतु डॉक्टरांनी न रागावता विद्यार्थ्यांना सवलती दिल्या."[६३] यातून त्यांच्या विद्यार्थी प्रेमाची कल्पना येते. डिसेंबर १९४७ मध्ये ते अमेरिकेतून परतले तेव्हा कॉलेजचा वार्षिक दिवस होता ते आलेले पाहताच मुलांनी त्यांच्या सभोवताली घोळका केला व मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

१९४८ साली कॉलेजमधील स्वयंसेवक मुलांनी सत्याग्रहात भाग घेतला. विद्यार्थ्यांनी समाजकारण की राजकारण करावे या वितंडवाद न करता त्यांनी विसापूर येथे प्रयाण करून सरकारचा रोष पत्करून त्यांना सोडून आणले व त्यांच्या अभ्यासाची सोय केली. वसतिगृहाची वाढ सरकारी नियमाला धरून होती त्यामुळे विद्यार्थ्यांना ती फी भरणे शक्य नव्हते ही अडचण लक्षात घेऊन त्यांच्या "बंगल्या शेजारी एक जागा विकाऊ होती ती यांनी खरेदी केली. तेथे काही खोल्या वगैरे बांधल्या आणि ही जागा विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिली यातील गरीब विद्यार्थ्यांना बाजारातील अन्न धान्याचे दर कितीही असले तरी नाममात्र किमतीत भोजनाची सोय उपलब्ध करून दिली. फाटलेल्या आकाशाला ठिगळ जोडण्याचा हा त्यांचा प्रयत्न पण त्यामुळे त्यांच्या मनाला खरे समाधान मिळत होते. अनेकांना परीक्षा फी भरता आली नाही की यांच्याकडे धाव घ्यायची आणि यांनी नकळत फी चे दान करायचे हा त्यांचा परिस्थिती विरुद्ध चाललेला अखंड झगडा होता."[६४] या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आपले सर्व जीवन वाहून घेतले होते. अनवाण्याला चप्पल, फाटके कपडेवाल्याला कपडे घेऊन देणे असे कार्य डॉ.हिवाळेंचे सतत चालू असे यातून त्यांचे विद्यार्थी प्रेम कसे होते व त्यापोटी एखादी व्यक्ती काय करू शकते याची प्रचिती येते.

डॉ.हिवाळे सदा या नव्या दमाच्या विद्यार्थ्यांच्या घोळक्यात असत विद्यार्थ्यांना त्यांचा सहवास अतिशय मौल्यवान वाटत तरूण विद्यार्थ्यांमध्ये राहून आपले वृद्धत्व कधी

आले याचे भान सुद्धा त्यांना कधी राहिले नाही. त्यांची विद्यार्थ्यांच्या प्रेमासाठी व विकासासाठी वाटेल तो त्याग करण्याची तयारी होती.

### ३.१५ डॉ.हिवाळे यांचा जीवनातील त्याग :

डॉ.हिवाळेंचे बालपण ख्रिश्चन मिशनच्या सहवासात गेले होते. हे मिशनरीवाले आपल्या जन्मभूमीपासून इतक्या लांबच्या प्रदेशात राहतात व तेथील लोकांच्या कल्याणासाठी झटतात. सर्व आयुष्य जनसेवेतच घालवतात हा त्यांच्या जीवनातील किती मोठा त्याग आहे असे डॉ.हिवाळेंना वाटे. त्याचाच परिणाम त्यांच्यावर झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांना बालपणापासून दुसऱ्यासाठी झिजण्याची सवय लागली. शाळेत असल्यापासून आपल्या भावंडांच्या पालन पोषणासाठी झटले. नोकरी करून बी.ए पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले तो काळ १९१७ – १८ चा होता. त्यांना सहजासहजी एखादी चांगली नोकरी मिळाली असती व आपले आयुष्य चांगल्या सुखवस्तू कुटुंबासारखे घालवू शकले असते पण ते त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी उच्च शिक्षसाठी अमेरिकेला प्रयाण केले. तेथे एम.ए.पीएच्.डी.पूर्ण करून भारतात आल्यानंतर समाजसेवेसाठी स्वत:ला वाहून घेतले. "डॉ.हिवाळे यांचे आयुष्य म्हणजे धगधगणारा यज्ञ होता. स्वत: विझणे आणि इतरांना उजेड देणे हेच त्यांच्या आयुष्यातील सत्य होतं."[६५] हेच त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे.

विल्सन कॉलेजात ज्ञानदान करत असताना वेगवेगळ्या योजना आखून शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. स्वत: आर्थिक झळ सोसून इतरांच्या शिक्षणात मदत केली. विनावेतन काम करून ह्यूम हायस्कूल ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी स्वत:चा पगार हायस्कूलसाठी खर्च केला मुलांच्या पोषण आहारासाठी स्वत: जातीने लक्ष दिले.

१९२१ पासून डॉ.हिवाळेंनी वेगवेगळ्या कालखंडात ज्ञानोदयाचे विनावेतन संपादन केले. कोणत्याही आर्थिक मोबदल्याची अपेक्षा ठेवली नाही. १९४७ मध्य ज्ञानोदयाची आर्थिक स्थिती चांगली नव्हती, तेव्हा सर्व आर्थिक भार उचलून ते चालवण्यासाठी घेतले. यातूनच त्यांची सामाजिक कार्य करण्याची वृत्ती दिसून येते. त्यातून त्यांनी निर्भिडपणे लेखन करून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

धार्मिक कार्यात सुद्धा त्यांनी मोलाचे योगदान दिले. ख्रिश्चन धर्म प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच ख्रिश्चन धर्माची शिकवण आपल्या चर्च संदेशातून वेगवेगळ्या व्याख्यानातून समाजाला दिली. निरपेक्ष सेवा हा ख्रिश्चन धर्माचा गाभा आहे हे समाजाला पटवून देण्यासाठी स्वत: त्यासाठी कार्य केले.

१९४७ मध्ये अनेक हालअपेष्टा व अडचणींना सामोरे जाऊन अहमदनगरला उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून अहमदनगर कॉलेजची स्थापना केली. कॉलेज स्थापन करताना अनेक अडचणींना विशेषत: आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. पैसा उभा करण्यासाठी जगातील वेगवेगळ्या देशात भ्रमंती करावी लागली त्यावेळी अनेक मनस्तापाच्या व मानहानीच्या घटनांना सामोरे जावे लागले. आपल्या सत्कार्यासाठी सर्व गोष्टी त्यांनी सहन केल्या व कॉलेजसाठी पैसा उभा केला. ज्यावेळी पैशाची कमतरता भासू लागली त्यावेळी स्वत:चा प्रॉव्हिडंट फंड व पत्नीचे दागिने विकून मिळालेले पैसे याच कार्यासाठी वापरले. स्वत:च्या आर्थिक हालाखिचा विचार न करता विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृह, कमी किमतीत भोजनाची सोय, फी मध्ये सवलती दिल्या.

डॉ. हिवाळेंचे जीवन खरोखरच दुसऱ्यासाठी जळणे व स्वत: अंधारात राहण्यासारखे होते. हे सर्व करत असताना स्वत:च्या घराकडे वेळोवेळी दुर्लक्ष झाले, परंतु त्यांना वाईट वाटत नसे. समाजातील गरीब लोक हालाखिचे जीवन जगत असताना आपण सुखात दिवस घालवणे त्यांना कधी आवडले नाही. घरातील पाच

व्यक्तींकडे दुर्लक्ष करून पाच लाख लोकांचे जीवन जर सुखात ठेवत असलो, तर त्यात काहीच त्यांना गैर वाटत नव्हते. हा त्यांच्या जीवनातील सर्वात मोठा त्याग मानला पाहिजे.

# संदर्भ


१. कीर धनंजय : म. जोतिबा फुले, मुंबई १९१३ पृ.२७

२. प्रधान.ग.प्र. : संपा. आगरकर लेखसंग्रह, नवी दिल्ली, १९७१ पृ.१८0

३. हिवाळे भा.पां. : उषा, ७ जुलै १९५९ अंक २७ पृ.१

४. हिवाळे भा.पां. : उषा, २२ सप्टे. १९५९ अंक ३७ पृ.२

५. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १७ नोव्हें. १९२१ अंक ४६ पृ.६१

६. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, २ जून. १९२१ अंक २२ पृ.४

७. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, २२ ऑक्टो. १९२१ अंक ४२ पृ.४

८. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १ सप्टें. १९२१ अंक ३५ पृ.४

९. हिवाळे भा.पां. : उषा, १९ ऑगस्ट. १९५८ अंक ३२ पृ.३

१0. कित्ता, पृ.३

११. कित्ता, पृ.३

१२. कित्ता, पृ.३

१३. कित्ता, पृ.३

१४. कित्ता, पृ.३

१५. कित्ता, पृ.१

१६. वार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७ पृ.६२

१७. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१२५

१८. वार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७, पृ.१२७

१९. कित्ता, पृ.११७

२०. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१६२

२१. कित्ता, पृ.१७४

२२. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१२०

२३. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.६४

२४. साळवी शा.ल. : ज्ञानोदय, २९ मे. १९४७ अंक २२ पृ.१

२५. भालेराव व.मा. : ज्ञानोदय, १२ जुलै. १९४५ अंक २८ पृ.४

२६. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१६५

२७. शर्मा सुधीर : महाराष्ट्राचे येरूशलेम, दै.लोकमत पुरवणी १५ ऑगस्ट २००७ , पृ.८

२८. धर्माधिकारी शशी : कवडसे, लोकसत्ता, ९ सप्टें.२००६ पृ.२

२९. साळवी शा.ल. : ज्ञानोदय, १८ जुलै. १९४६ अंक २९ पृ.१

३०. कित्ता, पृ.१

३१. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.१४

३२. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.१५१

३३. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १५

३४. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७, पृ.१५१

३५. कित्ता, पृ.१५३

३६. कित्ता, पृ.१५४

३७. कित्ता, पृ.१५४

३८. कित्ता, पृ.१५४

३९. कित्ता, पृ.१६0

४0. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१७२

४१. कित्ता, पृ.१७२

४२. कित्ता, पृ.१७३

४३. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७, पृ.१६३

४४. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १७

४५. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१७४

४६. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १७

४७. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१७५

४८. कित्ता, पृ.१७६

४९. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १८

५०. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७, पृ.१६९

५१. कित्ता, पृ.१७०

५२. बंडेलू शांताराम : उषा, १५ जाने. १९५८ अंक १ पृ.१

५३. कित्ता, पृ.१६३

५४. कित्ता, पृ.१६९

५५. कित्ता, पृ.१७२

५६. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.१७९

५७. कित्ता, पृ.१७९

५८. कित्ता, पृ.१८७

५९. कित्ता, पृ.१८७

६०. कित्ता, पृ.१९४

६१. कित्ता, पृ.१९४

६२. बार्नबस सरला : मर्मबंधातील ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७ पृ.१७०

६३. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १८

६४. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८, पृ.२३६

६५. हुद्देदार माधुरी : भास्करायण, ऋतु प्रकाशन, अहमदनगर २००८ पृ.६

# प्रकरण चौथे

## डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिक कार्य

४.१ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिक कार्य

४.२ विल्सन कॉलेजमध्ये कार्यरत असतानाचा सामाजिक उपक्रम

४.३ विल्सन कॉलेजात असताना गरीब विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य

४.४ १९३६ मध्ये ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिलचे अध्यक्ष असतानाचे कार्य

४.५ युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया अधिवेशनातील कार्य

४.६ तांबरम अधिवेशन व डॉ.हिवाळे

४.७ ख्रिस्ती लोकशिक्षण मासिक व डॉ.हिवाळे

४.८ उषा साप्ताहिक व डॉ.हिवाळे

४.९ सेवा नियतकालिकेतून साक्षरतेचे काम

४.१0 ग्रामसुधारणा पथकाची स्थापना

४.११ डॉ.हिवाळेंनी दीनदुबळ्यांसाठी केलेले कार्य

४.१२ ज्ञानोदय व डॉ.हिवाळे

४.१३ डॉ.हिवाळेंचे प्रौढशिक्षण क्षेत्रातील कार्य

४.१४ डॉ.हिवाळेंचे देशप्रेम

❖❖❖❖❖

# प्रकरण चौथे

## डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे सामाजिक कार्य

१८ वे शतक भारतातील अंधारयुग म्हणून ओळखले जाते. या काळात सवर्च क्षेत्रात भारत पिछाडीवर होता. तसेच सामाजिक स्थितीही अतिशय खालावलेली होती. प्राचीन काळापासून भारतातील वेगवेगळ्या रूढी-परंपरा अंधविश्वास चालीरीती यांची पाळेमुळे खोलवर रूजली होती. अस्पृश्यता तर समाजाला लागलेली कीड होती अनेक भाषा, जाती, धर्म आणि पंथ यामुळे एक जातीची उतरंड निर्माण झाली होती या भारतीय समाजाला यातून वर काढण्यासाठी वेगवेगळ्या समाज सुधारकांनी प्रयत्न केले त्यात डॉ. हिवाळेंचे कार्य विचारात घ्यावे लागते.

ब्रिटिशसत्ता भारतात प्रस्थापित झाली त्यावेळी तर भारतीय समाज अतिशय वाईट स्थितीतून जात होता त्यातच ब्रिटिशांनी आपल्या व्यापारी धोरणाने भारतीयांच्या हालाखित भर घातली, परंतु भारतीयांना सुरूवातीला ब्रिटिशांच्या कावेबाजपणाविषयी माहिती नसल्याने आपण आपल्या स्वकीय सत्तेस मुकलो आहोत ही भावना भारतीय सर्व सामान्यांच्या मनात कधीच आली नाही. किंबहुना त्यांना स्वकीयांपेक्षाही परकीय सत्ता आपलीशी वाटली. त्याला कारणेही तशीच होती. भारतीय सत्ताधिश सर्वसामान्य जनतेकडे पाहिजे तेवढे लक्ष देऊ शकले नव्हते. त्यांच्या हालअपेष्टा कमी करण्यास ते अपयशी ठरले. त्यांना दारिद्रयाच्या खाईतून बाहेर काढू शकले नाही अन्न धान्याची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली होती. भूकेने जनता मृत्यूमुखी पडत होती. सत्ताधिश आपल्या लढायात मश्गूल होते. जातिव्यवस्थेची चौकट त्यांना आहे त्या स्थितीत मरण्यास भाग पाडत होती. त्यामुळे राज्य व्यवस्थेचा जो एतद्देशियांकडून झालेला बदल सर्वसामान्य जनतेने कोणताही प्रतिकार न करता स्वीकारला होता.

ब्रिटिशसत्ता स्थिर व निर्धोक झाल्यानंतर भारतीयांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक चालू केली तसेच ती करण्यासाठी एक प्रकारची नवी राज्य कारभाराची चौकट निर्माण केली ही तयार करत असताना त्यांनी भारतात वेगवेगळ्या सुधारणा सुद्धा केल्या त्यात विधवा पुनर्विवाह, सतीप्रथा, जातीप्रथा यासारख्या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला तसेच भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला याचा एक अनपेक्षित फायदा भारतियांना झाला इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्यांच्या आधुनिक ज्ञान विज्ञानाचा व स्वातंज्य, समता, बंधुता या उदारमतवादी तत्त्वांची जाणीव झाली.

आधुनिक शिक्षण घेतलेली नवी पिढी भारतीय समाजव्यवस्थेचे व दारिद्रयाचे आपल्या चिकित्सक बुद्धिमत्तेने विश्लेषण करू लागली व या दारिद्रयाचे उत्तर इंग्रज राजवटीत व पर्यायाने भारतीय सामाजिक परिस्थितीत शोधू लागले सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय भारतीय समाज दारिद्रयाच्या गर्तेतून वर निघू शकत नाही. अशी त्यांची ठाम समजूत झाली. त्यांनी या सामाजिक सुधारणा करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला. त्यात शिक्षणप्रसार व वृत्तपत्रातून सामाजिक जागृती यांना प्राधान्य दिले. तसेच वेगवेगळ्या रूढी परंपरा नष्ट करण्यास व जातिभेद निर्मुलनाचा प्रयत्न केला. यात राजाराम मोहन रॉय, म.फुले, लो.टिळक, आगरकर, रानडे, लोकहितवादी, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, आंबेडकर यासारख्या समाजसुधारकांचा सुधारणा करण्यात व समाज जागृती करण्यात पुढाकार होता. त्यांनी बहुजन समाजाला जातिव्यवस्था व अंधश्रद्धा यांच्या खोल गर्तेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

भारतात काही ठराविक समाजसुधारक व धर्म सुधारकांची नावे आपल्याला माहीत असली तरी असे अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या समाजसुधारकांचे कार्य करीत होते. ते मात्र काळाच्या पडद्याआड दडून राहिलेले आहेत परंतु त्यांच्या कार्याने ते चिरंजीव ठरले आहेत. त्यांनी आपले उभे आयुष्य देशसेवेसाठी वेचले त्यामुळे आपल्याला

आजचा समर्थ भारत पहावयास मिळतो. त्याचे श्रेय या समाजसुधारकांना द्यावे लागते इतिहासकाराचे कार्य हे घडलेल्या इतिहासा सत्य असलेले व समाजासमोर न आलेले सत्य शोधून काढणे असते. अशाच एका घडलेल्या इतिहासात दडून राहिलेल्या थोर पुरूषाच्या सामाजिक कार्याचा व देशसेवचा उलगडा येथे करावयाचा आहे. ती व्यक्ती म्हणजे डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे होय. त्यांना पहिल्या पिढीतील थोर समाजसुधारक म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हे त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या विचार व कार्यातून दिसून येते.

## ४.१ डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे समाजसुधारणा विषयक विचार :

डॉ.हिवाळेंचा जन्म सोलापूर सारख्या दुष्काळी व मागासलेल्या भागात झाला होता. त्यांचे बालपण तेथेच गेले त्यामुळे त्यांना बालपणीच तेथील म्हणजे खेड्यापाड्यातील सामाजिक परिस्थितीची जाणीव होऊ लागली होती. पुढे अहमदनगर येथे डॉ.हिवाळे शिक्षणासाठी आल्यानंतर त्यांना खऱ्या अर्थाने आधनिकतेची जाणीव होवू लागली मिशनरी लोकांचे आधुनिक विचार डॉ.हिवाळेंच्या मनावर कायमस्वरूपी बिंबले त्यामुळे त्यांनी पाश्चात्य लोकांची सामाजिक परिस्थिती व भारतीय समाजाची परिस्थिती यांची तुलना करण्यास सुरूवात केली. त्यामुळे ते अस्वस्थ होऊ लागले उच्च शिक्षण घेऊन आपण भारतीयांच्या सामाजिक परिस्थिती सुधारणा घडवून आणू शकतो. असा विश्वास त्यांना त्यांना वाटू लागला पुढे अमेरिकेतून उच्च शिक्षण पूर्ण करून झाल्यानंतर तर त्यांच्या विचारांना आधुनिक धार चढली व त्यांनी आपले विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी 'ज्ञानोदय' या वृत्तपत्राचे संपादकपद स्वीकारले किंबहुना त्याच्या आधुनिक विचारामुळे त्यांच्याकडे चालून आले. 'ज्ञानोदया'मधून त्यांनी भारतीयांच्या सामाजिक परिस्थितीवर निर्भिडपणे टीका करून ती बदलण्याची गरज प्रतिपादली.

भारतात १९२० – २१ या काळात असहकार चळवळ चालू होती. त्याचवेळी डॉ.हिवाळे अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात गुंतलेले होते. ते म्हणतात "अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी सामान्यत: तात्त्वीक कबुली देण्यास पुष्कळ लोक तयार असले, तरी प्रत्यक्ष कृतीने तसे करण्यास फार थोडे गृहस्थ तयार होतात. असा यापूर्वीचा अनुभव आहे. यापुढे अशा शाब्दिक व पोकळ सहानुभूतीने असे कार्य व्हायचे नाही. त्यासाठी काहीतरी जालीम उपाय शोधून काढले पाहिजेत."[१] अस्पृश्यता निवारणाच्या गप्पा अनेकजण करतात परंतु प्रत्यक्षात संबध आल्यास त्यातून हळूच अंग काढून घेतात असा डॉ.हिवाळेंना अनुभव होता. म्हणून काहीतरी नवीन उपाय शोधून काढण्यास ते सांगतात. तसेच त्यादृष्टीने फायदेशीर असणारा उपाय म्हणजे "१. अस्पृश्यांबरोबर जाहीर रीतीने भोजन करणे २. अस्पृश्यांना हिंदूच्या सर्व देवालयात प्रवेश करू देणे ३.सर्व सामाजिक विहिरी रस्ते, शाळा, इतर संस्था यामध्ये अस्पृश्यांना मुक्तद्वार ठेवणे"[२] असे डॉ.हिवाळेंनी अस्पृश्यता निवारणासाठी शोधलेले उपाय होते.

डॉ.हिवाळे आपले विचार बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी व त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी मांडलेले दिसून येतात ते म्हणतात, "ज्या राष्ट्रात बहुतेक लोक देवभोळे व अज्ञानी आहेत ते स्वतंत्र असून काय फायदा आहे. बहुजन समाजाच्या हाती तेथे सत्ता असणे शक्य नाही उच्च जातीचे लोक सुसंस्कृत असून बाकीचे अज्ञानात लोळत पडलेले, अशी स्थिती असली तरी खरी सत्ता थोड्या लोकांच्या हाती असणे शक्य आहे तेथे लोकशाही असली तरी ती खरी लोकशाही कशी असु शकेल ? म्हणून खरे स्वातंत्र्य अनुभवण्याकरता बहुजन समाजाची उन्नती प्रथम घडवून आणली पाहिजे."[३] ती घडवून आणायची असेल तर त्यांच्यात शिक्षण प्रसार झाला पाहिजे त्यामुळे त्यांच्यात असलेल्या रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यांचा नायनाट होईल तसे झाले नाही तर ते कायमस्वरूपी अज्ञानात राहतील. "देवभोळेपणामुळे लोक भुताखेतांवर विश्वास ठेवतात व कसलाही आजार आला तर तो देवदेवतांच्या अवकृपेमुळे आला असे समजून

आपले जीणे भीतीत घालवतात अज्ञानामुळे ते दास्यत्वात आपले दिवस घालवत आहेत"[४] त्यासाठी या लोकांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे आज जगातील विज्ञान खूप पुढे गेले आहे तरी भारतीय समाज या दारिद्रयाच्या व अंधश्रद्धेच्या गर्तेत वावरत आहे. जोपर्यंत आपण त्यांना या गर्तेतून बाहेर काढत नाही तो पर्यंत भारताची उन्नती होणे शक्य नाही असे त्यांना वाटत होते. "राष्ट्राची खरी संपत्ती शेतमळे इमारती व कारखाने नसून नागरिक हे आहेत. त्यांची बुद्धिमत्ता त्यांची शील त्यांची धार्मिकता त्यांची सेवा करण्याची इच्छा यामुळे राष्ट्राची किंमत ठरते."[५] म्हणून फक्त उच्च वर्गातील लोकांनीच शिक्षण न घेता ते बहुजन समाजातील लोकांना सुद्धा घेण्यास प्रेरित करावे, असे त्यांना वाटत होते.

डॉ.हिवाळेंचे सामाजिक विचार अतिशय उच्च दर्जाचे होते. त्यांनी आपल्या विचारातून सतीप्रथा, विधवा विवाह, जातिभेद, अंधश्रद्धा, बालविवाह, आंतरजातीय विवाह, देवभोळेपणा, अस्पृश्यता यासारख्या विषयावर लेखन करून त्यावर कडाडून हल्ला केला.

## ४.२ विल्सन कॉलेजमध्ये कार्यरत असतानाचा सामाजिक उपक्रम :

डॉ.हिवाळेंचा जन्म एका गरीब कुटुंबात झालेला असल्याने बालपणापासूनच त्यांना गरिबीचे चटके बसले होते. त्यांचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण खेड्यातच झाले असल्यामुळे खेड्यापाड्यातील सामाजिकता जवळून पाहता आली. म्हणतात ना शिक्षणाने माणूस शहाणा होतो. त्याचप्रकारे त्यांना झाले जसजसे त्यांचे शिक्षण वाढत गेले तसतशी त्यांना आपल्या वाईट परिस्थितीची जाणीव होऊ लागली ती बदलण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली व त्या बदलाचे मूळ त्यांनी शिक्षणप्रसारात शोधले त्यामुळे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण होताच त्यांनी ज्ञानदान व ज्ञानप्रसारात स्वत:ला वाहून घेतले.

डॉ.हिवाळेंना प्रथम पासूनच समाजोपयोगी कार्य करण्यात रस होता. त्यांनी त्याची सुरूवात शालेय शिक्षणापासून केली होती विद्यार्थीदशेतच ते शिक्षित आणि अशिक्षित यांची तुलना करू लागले शिक्षणामुळे समाजात अमूलाग्र असा बदल घडून येतो याची त्यांना जाणीव झाली. शिक्षणाने माणूस बुरसटलेल्या रूढी परंपरापासून बाहेर पडून आपली प्रगती करतो. व नकळत तो आपल्या देशाच्या विकासास हातभार लावतो. "डॉ.हिवाळे यांच्या सामाजिक कार्याची त्यांच्या लोकसंग्रहाची त्यांच्या सेवेची, त्यांच्या व्यक्तिमत्वाची आणि त्यांच्या एकूण जीवनातील कर्तृत्वाची गोष्ट पाहिली म्हणजे आपण आश्चर्यचकीत होऊन जातो. ध्येयवाद आणि जिद्द असली म्हणजे माणूस किती प्रचंड कार्य करू शकतो याचे उदाहरण म्हणजे डॉ.हिवाळे होय."[६] यावरून त्यांनी स्वकर्तृत्वाने आपल्या कार्याचा ठसा समाजमनावर कसा उमटवला याची कल्पना येते.

### ४.३ विल्सन कॉलेजात असताना गरीब विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य :

डॉ.हिवाळे विल्सन कॉलेजात विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून ओळखले जात त्यामुळे मुले कोणतीही भीती न बाळगता त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलत. डॉ.हिवाळे त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी झोकून देऊन प्रयत्न करत असत. विद्यार्थ्यांच्या प्रामुख्याने राहण्याच्या व जेवणाच्या समस्या होत्या. विल्सन कॉलेजातील बरेचसे विद्यार्थी दूरच्या खेड्यातून आलेले असल्याने राहण्याची सोय कॉलेजच्या वसतिगृहात झाली, तरी त्यांना दोन वेळचे पोटभर जेवण मिळत नसे त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीवर याचा परिणाम होत असे. जास्त पैसे घेणारी मेस विद्यार्थ्यांना परवडत नसल्याने डॉ.हिवाळेंनी स्वत: मेस सुरू करण्याचे ठरविले. त्यावेळी विल्सन कॉलेजचे प्राचार्य डॉ.मॅकन्झी यांच्यासमोर मेस सुरू करण्याची आपली इच्छा बोलून दाखविली. व यासाठी कॉलेजने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती केली मेस सुरु करून त्यांनी अत्यल्प किमतीत गरीब विद्यार्थ्यांच्या दोनवेळच्या जेवणाची सोय केली सुरूवातीला सर्वच विद्यार्थी या

मेसकडे आकर्षित झाले त्यामुळे डॉ.हिवाळेंची मोठी पंचाईत झाली. अशावेळी त्यांनी स्वत: सर्व विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करून जे विद्यार्थी गरीब आहेत त्यांनाच प्रवेश दिला येथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते की, त्यांनी व्यवसाय म्हणून मेस चालविली नव्हती तर गरीब विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय व्हावी हाच त्यांचा उद्देश होता.

डॉ.हिवाळेंना मेस चालविण्याच्या कामी त्यांच्या पत्नीने मोलाची मदत केली. मेस सर्व भार त्या सांभाळत त्यामुळे त्यांच्या कामाचा व्याप खूपच वाढला. त्या तो हिवाळेंना बोलून दाखवत "तुला जास्त काम पडत असेल, तर एक जेवण मी कमी घेण्यास तयार आहे."[७] परंतु तू मेस व्यवस्थित चालव व यांना दोनवेळचे पोटभर जेवण देत जा.

कॉलेज सांभाळून मेस चालविणे सोपी गोष्ट नव्हती यासाठी त्यांना मोठा आर्थिक भार सोसावा लागला काही विद्यार्थ्यांना कोणताही मोबदला न घेता जेवण दिले व तो खर्च स्वत: सोसला. "या खानावळीचा दर कमी असूनही मुले नियमित पैसे देत नव्हती त्यामुळे ती चालविणे कधी कधी त्रासाचे वाटे महिना पुरा करण्यासाठी घरातून पैसे घालावे लागत."[८] यावरून विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मेस चालविली होती पैसा कमावण्यासाठी नाही हे सिद्ध होते. त्यांची आर्थिक परिस्थीती सुद्धा काही खास नव्हती पगार सुद्धा आजच्या सारखा नसून वेळच्या वेळी मिळत नसे या जेमतेम उत्पन्नातून त्यांनी हा उपक्रम चालू करून यशस्वीपणे पार पाडला होता. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने दूरच्या खेड्यातील गरीब विद्यार्थी हाच होता. आपण एखाद्याला अर्थिक मदत देऊ शकत नाही, तर किमान गरीब लोकांची मुले घडविण्याचे मोलाचे कार्य करू शकतो हेच शिक्षणाने आपल्या परिस्थितीत सुधारणा घडून आणतील. त्यांना घडवणे म्हणजेच समाज सुधारणा व समाजसेवा करणे होय. हाच त्यांचा दृष्टिकोन होता.

मुंबईतील ह्यूम हायस्कूल हे मिशनरींनी चालविलेले नावाजलेले हायस्कूल होते. विद्यार्थी संख्ये अभावी ते बंद पडण्याच्या मार्गावर असताना डॉ.हिवाळेंनी स्वत: चालविण्यास घेतले वाड्या वस्त्यावर हिंडून गरीब मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त केले. त्यांची सर्व व्यवस्था केली. ते गरीब परिस्थितीतील असल्याने कुपोषित असून शाळेत येताना बरोबर जेवणाचा डबा सुद्धा आणता येत नसे. "या शाळेत गरीब मुले हा त्यांच्या दृष्टीने अतिशय चिंतेचा विषय होता ही मुले सकाळी थोडे खाऊन शाळेत येत पण दुपारी जेवणाच्या सुट्टीत घरच्या परिस्थितीमुळे बरोबर काहीही आणता न आल्याने तशीच बाहेर खेळण्यासाठी जात नी सुट्टी संपल्यावर वर्गात परत येत असत"[९] ही गोष्ट हिवाळेंच्या डोळ्यातून सुटत नसे तेव्हा त्यांनी याबाबतीत विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी काहीतरी उपाय योजना करण्याचे ठरविले "या मुलांच्या दुपारच्या आहारासंबधी आम्ही बराच विचार केला या विद्यार्थ्यांना दोन पैशात कप भरून दूध द्यावे शेवटी ठरले. ज्या विद्यार्थ्यांना असे दोन पैसेही घरून मिळणे शक्य नाही त्यांनी ऑफिसात जाऊन दोन पैसे घेऊन यावेत नी दुध घ्यावे पैसे देणाऱ्या मुलांसमोर ओशाळल्या सारखे वाटू नये म्हणून ही काळजी घेतली."[१०] आपल्या विद्यार्थ्यात रास्त अभिमान असणे ही मानवी मूल्यांच्या दृष्टीने आवश्यकबाब आहे यानुसार ही कल्पना त्यांना आवश्यक वाटत होती. त्यांनी फक्त बौद्धिक दृष्ट्या परिपूर्ण न होता त्याला शारीरिक सुदृढतेची जोड द्यावी, ही त्यामगची त्यांची कल्पना होती. आज महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना राबवत आहे त्या योजनेची छोट्या प्रमाणात का होईना डॉ.हिवाळेंनी १९४३ मध्येच सुरूवात केली होती. शालेय पोषण आहाराची किती गरज आहे हे त्यांनी त्याचवेळी ओळखले होते. व स्वखर्चाने अशी योजना राबवली होती. गरीब विद्यार्थ्यांचा स्वाभिमान जागृत रहावा यासाठी स्वत:च्या खिशातून कुणालाही न समजता असे पैसे देण्याची व्यवस्था ऑफिस मध्ये केली. यातून आपल्याला जाणवते की, त्यांनी खरोखरच स्वाभिमानी भारत घडविण्यास महत्त्वपूर्ण

हातभार लावला. कॉलेजमध्ये ज्या विद्यार्थ्यांना वाहतूक साधनाच्या अभावी दूरच्या खेड्यातून वेळेवर येणे शक्य नसे अशा विद्यार्थ्यांना स्वखर्चाने सायकली विकत घेऊन दिल्या व कॉलेजात येण्यास प्रोत्साहन दिले यातून त्यांची ग्रामीण गरीब विद्यार्थ्यांसाठी झटण्याची वृत्ती दिसून येते.

**४.४ १९३६ मध्ये ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिलचे अध्यक्ष असतानाचे कार्य :**

डॉ.हिवाळे अमेरिकेतून आपले शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर लगेच ते मराठी मिशनच्या कार्यात सक्रिय झाले. ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिल ही एक धार्मिक संघटना होती. तिचे डॉ.हिवाळे क्रियाशील सदस्य होते. या संघटनेचे दरवर्षी वेगवेगळ्या प्रांतात अधिवेशने भरत यातून देशातील सामाजिक व धार्मिक प्रश्नांवर चर्चा होत असे १९३६ मध्ये त्यांच्या कर्तृत्त्वाने या संघटनेचे अध्यक्षपद त्यांच्याकडे चालून आले. या अधिवेशनापूर्वी अध्यक्षाने सर्व भारतभर हिंडून लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या अधिवेशनात मांडाव्यात अशी प्रथा होती. "कॉलेज मार्च मध्ये बंद झाल्यावर एक दौरा काढला दक्षिण भारत उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश इ.ठिकाणी भेटी दिल्या लोक म्हणू लागले की, यापूर्वीच्या कोणत्याही प्रेसिडेंटने अशा भेटी घेतल्या नाही अशा भेटी घेणारे हेच पहिले प्रेसिडेंट होते. असा अभिप्राय लोकांनी स्पष्टपणे व्यक्त केला."[११] यापूर्वी सुद्धा अशी अधिवेशने भरत परंतु कोणत्याही प्रांताची पाहणी करण्यास अध्यक्ष जात नसत परंतु डॉ.हिवाळेंनी स्वखर्चाने अशा अधिवेशनापूर्वी वेगवेगळ्या प्रांताचा दौरा करून तेथील सामाजिक व धार्मिक जीवनाची तसेच त्यांच्या समस्यांची माहिती करून घेतली. व त्या अधिवेशानात मांडल्या त्या सोडविण्यासाठी उपाययोजना केली यातून त्यांना सर्वसामान्य जनतेविषयी किती कळवळा होता याची माहिती मिळते.

## ४.५ युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया अधिवेशनातील कार्य :

ब्रिटिशकालीन भारतात काळा गोरा भेदभाव मोठ्या प्रमाणावर होता. भारतीय लोक इतर गोऱ्या लोकांपेक्षा बुद्धिचातुर्य हुशारी यामध्ये कमी दर्जाचे आहेत, अशी भावना भारतीयांच्या मनावर त्यांनी वर्षानुवर्ष बिंबवली हिच स्थीती अमेरिकन मराठी मिशनमध्ये सुद्धा होती मात्र हिवाळेंना ही गोष्ट मान्य नव्हती भारतीय लोकसुद्धा इतर गोऱ्या लोकांप्रमाणे कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, हे त्यांनी स्वत:चे बुद्धिचातुर्य व कार्याने दाखवून दिले होते. युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया ही सुद्धा एक मोठी ख्रिश्चन संघटना होती तिचे दर तीन वर्षांनी एखाद्या मोठ्या शहरात अधिवेशन भरत मुंबईत २० वर्षानंतर अधिवेशन भरत होते त्यावेळी यु.सी.एन. आयचे मॉडरेटर डॉ.मॅकन्झी होते. हे अधिवेशन भरविण्याची जबाबदारी डॉ.हिवाळेंनी घेतली यापूर्वी जी अधिवेशने भरत याची सर्व जबाबदारी व नियोजन गोऱ्या लोकांकडे असे व तेथे राहण्यासाठी फक्त गोऱ्या लोकांची व्यवस्था केली जात असे. भारतीयांना त्यांच्या बरोबरीने एकत्र राहता येत नसे "मला गोरे नी काळे लोक हा भेद नाहिसा व्हावयास पाहिजे आणि हा एक उत्तम प्रसंग आलेला आहे."[१२] त्यांनी स्वत: या अधिवेशनात झोकून देऊन काम केले. यावेळी मात्र काळा व गोरा भेदभाव न करता सर्वांना एकत्र राहण्याची व्यवस्था केली व एकाच पंगतीत काळे व गोरे लोक यांना भोजनास बसविले. अधिवेशन यशस्वीपणे पार पडले, यातून डॉ.हिवाळेंना एकच संदेश द्यायचा होता की, काळा व गोरा हा फक्त रंगाचा भेद आहे. काळे व गोरे कोणत्याही बाबतीत वेगळे नाही काळे लोक सुद्धा गोऱ्यांच्या बरोबरीने कार्य करू शकतात. हे त्यांनी दाखवून दिले व हा भेद कमी करण्यास हातभार लावला.

## ४.६ तांबरम अधिवेशन व डॉ.हिवाळे :

डॉ.हिवाळे सतत सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय असत ते नेहमी भारतभर भरणाऱ्या ख्रिश्चन मिशनच्या सभा, अधिवेशने चर्चासत्रे यांना उपस्थित राहात भारतातील ख्रिश्चन समाजाच्या समस्यांची जाणीव असलेले व त्याच्यासाठी अहोरात्र झटणारे डॉ.हिवाळे एकमेव पुढारी होते. १९३८ मध्ये 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस'चे मोठे अधिवेशन मद्रास जवळील तांबरम येथे भरणार होते. यासाठी जगातील पंडित व सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्यांनाच आमंत्रणे होती यासाठी भारतातील प्रत्येक राज्यातून एकेक प्रतिनिधी निवडला होता. महाराष्ट्रातील एतद्देशीय नी पुरूष वर्गाचे प्रतिनिधी म्हणून यांचीच निवड झाली."[१३] यावरून आपल्याला असे जाणवते की, डॉ.हिवाळे फक्त महाराष्ट्रीयन ख्रिश्चनांचे प्रतिनिधी नव्हते, तर महाराष्ट्रातील ख्रिश्चनांच्या प्रतिनिधीची भूमिका सुद्धा पार पाडली व इतर युरोपियनांवर आपला वरचष्मा निर्माण केला. अधिवेशनात जगातील इतर प्रतिनिधींच्या बरोबरीने भाग घेऊन महाराष्ट्रीयन ख्रिश्चन लोकांच्या समस्या मांडल्या. तसेच जागतिक स्तरावरच्या ख्रिश्चन लोकांच्या संदर्भातील समस्यांच्या चर्चेत भाग घेऊन युरोपियन व अमेरिकन लोकांना आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविली.

## ४.७ ख्रिस्ती लोकशिक्षण मासिक व डॉ.हिवाळे :

डॉ.हिवाळेंना सुरूवातीपासूनच ग्रामीण भागातील लोकांविषयी कळवळा होता. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या योजना आखल्या होत्या. प्रौढांच्या शिक्षणासाठी उत्तेजन दिले होते. भारत हा शिक्षण क्षेत्रात मागासलेला होता. पालकांमध्ये शिक्षणाबद्दल उदासिनता होती. त्यामुळे आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लोकांचे दुर्लक्ष होत होते. यासाठी डॉ.हिवाळे अशा पालकांनाच शिक्षित करावे त्यांच्यात शिक्षणाविषयी जाणीव व जागृती करावी तसे झाले तर ते आपोआपच आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न

करतील असे डॉ.हिवाळेंना वाटत होते. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या योजना आखल्या आपल्या पुस्तकातून, नियतकालिकातून लेख लिहिले. तसेच आपल्या भाषणातून लोकजागृती केली. "खेड्यापाड्यातील लोकांना वाचनाची गोडी लागावी म्हणून त्यांनी 'ख्रिस्ती लोकशिक्षण' नावाचे मासिक काढले"[१४] ग्रामीण भागातील जे लोक नवीनच वाचायला शिकले आहेत; साक्षर झाले आहेत अशांना वाचनाची गोडी लागावी व त्यातून त्यांची करमणुक व्हावी तसेच ज्ञानवृद्धी व्हावी हा त्यामागचा हेतू होता. वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके ही समाज परिवर्तन करणारी साधने आहेत त्यामुळे "लहान स्वस्त मनोरंजक पुस्तके तयार केली पाहिजेत. एवढेच नव्हेतर त्याचे वर्तमानपत्र काढले पाहिजे 'सुलभ लोकशिक्षण' नावाचे एक मासिक आम्ही काढले व त्याची किंमत एक पैसा ठेवली. सुमारे २७00 प्रती खपत असत."[१५] असे डॉ.हिवाळे म्हणतात. या वृत्तपत्रातून, मासिकातून आपण समाज जागृती करू शकतो अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे या साधनास त्यांनी जास्त महत्त्व दिले. या मासिकातून डॉ.हिवाळेंनी महत्त्वपूर्ण लिखान करून समाजातील अंधश्रद्धा, चालिरिती, रूढी-परंपरा यांच्यावर प्रहार करून शिक्षणाने नवसमाज निर्मिती होऊ शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साक्षरतेचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले त्यामुळे अनेक खेडूत लोक साक्षर होण्यासाठी प्रयत्न करू लागले हे या मासिकाचे महत्त्वाचे योगदान होते.

### ४.८ उषा साप्ताहिक व डॉ.हिवाळे :

डॉ.हिवाळे १९५१ मध्ये कॉलेजच्या प्राचार्य पदावरून निवृत्त झाले तरीही ते आपल्या समाजसेवेच्या कार्यापासून दूर गेले नाहीत तर आता ते पूर्णवेळ समाजसुधारक बनले होते. त्यांनी १९५२ मध्ये उषा नावाचे साप्ताहिक सुरू केले. हे सुरू करताना त्याचा उद्देश प्रामुख्याने "आपल्या विचारांचा प्रसार जनतेत व्हावा इतर येणाऱ्या माहितीचे संपादन करून महत्त्वाची माहिती थोडक्या किमतीत नि परीश्रमाने लोकांच्या

हाती पडावी.”[१६] हाच होता. यातून त्यांनी सामाजिक शैक्षणिक, राजकीय, धार्मिक व इतर लेखन करून समाजाला एक ज्ञानाचा श्रोत उपलब्ध करून दिला.

या साप्ताहिकातून त्यांनी अतिशय उपयुक्त लेखन केले. तसेच शासनाच्या चुकीच्या धोरणावर कडाडून टीका केली. उदा.खेर मंत्रिमंडळाच्या इंग्रजी विषयक धोरणाने इंग्रजीच्या अध्ययनावर जो विपरीत परिणाम झाला, तो अंशत: दूर व्हावा यासाठी त्यांनी ‘उषा’मधुन आवाज उठवून सरकारी धोरणावर ताशेरे ओढले व आपली बाजू मांडताना इंग्रजी ही जागतिक भाषा असून तिचे अध्ययन पहिल्या इयत्तेपासून व्हावे त्यामुळे इंग्रजीचा पाया भक्कम होईल, असे विचार यातून मांडले. यावरून त्यांची दूरदृष्टी आपणास दिसते. आज महाराष्ट्र शासनाने पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी शिकवण्यास सुरूवात केली आहे. डॉ.हिवाळेंनी हा विचार स्वातंत्र्योत्तर पहिल्या दशकात मांडला होता. तो निश्चितच क्रांतिकारक असल्याचे आज आपणास जाणवते.

‘उषा’ साप्ताहिकाने स्वातंत्र्योत्तर काळात अहमदनगर जिल्ह्यात लोकजागृतीत महत्त्वाचे योगदान दिले. हे साप्ताहिक चालवत असताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. “ ‘उषा’ साप्ताहिकाचा खर्च भागत नाही. दर आठवड्याला बराच तोटा येतो.तरी हे साप्ताहिक सेवा करीत आहे.”[१७] ग्रामीण भागातील लोकांना स्वस्तात हे साप्ताहिक मिळावे, यासाठी त्याची किंमत अत्यल्प ठेवली होती. स्वत: सर्व तोटा सहन करून फक्त त्यांची समाजसेवा करण्याची वृत्ती होती हे जाणवते. डॉ.हिवाळेंना हे साप्ताहिक चालविण्याच्या कामी पत्नी रूथबाईंनी मोलाची मदत केली. त्यांच्या गैरहजेरीत सर्व कामे त्या पाहात असत.

### ४.९ सेवा नियतकालिकेतून साक्षरतेचे काम :

अहमदनगरच्या प्राचार्य पदावरून निवृत्त झाल्यावर वेगवेगळ्या कल्पना राबविण्यात डॉ.हिवाळेंचा बराचसा वेळ जात असे. शिक्षणप्रसाराच्या कार्यात त्यांनी

स्वत:ला वाहून घेतले होते. महाविद्यालयाच्या स्थापनेत नगर जिल्ह्यात शिक्षित लोकांची संख्या वाढू लागली. तरीही अजून बराच समाज शिक्षण व आधुनिक विचारांपासून दूर होता. त्यांच्या विकासासाठी या नवशिक्षित तरुणांनी पुढे यावे, असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांनी आपल्या कॉलेजच्या प्राध्यापकांशी विचार विनिमय करून, "काही प्राध्यापकांच्या संपादकत्वाखाली वेगवेगळ्या पातळीवर साक्षरांची साक्षरता टिकवण्यासाठी सेवा नावाचे नियतकालिक नगर कॉलेज तर्फे प्रकाशित केले."[१८] व त्यातून सातत्याने लेखन करून समाजाला मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. तसेच महाविद्यालयातील या शिक्षकांच्या ज्ञानाचा फायदा समाजाला व्हावा यासाठी शिक्षकांचे 'लेख' या नियतकालिकातून दिले जात असत. एकाच विषयावर दिलेली वेगवेगळ्या शिक्षकांची मते रोचक व ज्ञानात भर घालणारी असत. त्यातून एखाद्या विषयाची सर्वांगीण माहिती मिळत असे. आपण ज्या समाजातून आलो त्याचे काहीतरी देणे लागतो म्हणून, समाजसेवा करावी म्हणजे त्या ऋणातुन मुक्त झाल्यासारखे होईल, असे त्यांना वाटे. शांताराम बंडेलू आपल्या लेखात म्हणतात, "शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयपूर्तीसाठी महाविद्यालयाच्या ग्रामसेवा पथकाचा जन्म झाला असून त्यामुळे सामाजिक कर्तव्याची जाणीव ठळकपणे महाविद्यालयीन युवकांच्या मनावर बिंबविली जात आहे. सारोळा बद्दी येथील मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता, पुलाची बांधणी, साक्षरतेच्या प्रसारासाठी निघालेले 'सेवा' नियतकालिक या गोष्टी सामाजिक ऋणफेडीच्या दर्शक आहेत."[१९] सेवा नियतकालिकाबरोबरच त्यांनी वेगवेगळ्या योजना राबविल्या. हे नियतकालिक सुरू करून डॉ.हिवाळेंनी अहमदनगर जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. या नियतकालिकाने साक्षरतेच्या प्रसारात महत्त्वपूर्ण योगदान दिले. नवीनच वाचायला शिकलेल्या लोकांना वाचता येईल, असे मार्गदर्शन करणारे लेखन या नियतकालिकातून केले जात असे.

## ४.१० ग्रामसुधारणा पथकाची स्थापना :

डॉ.हिवाळेंना सुरूवातीपासूनच ग्रामीण भागाविषयी आकर्षण होते. प्रत्यक्ष त्या समाजात जाऊन त्या लोकांसाठी कार्य करण्यात त्यांना आनंद वाटत असे. त्यासाठी त्यांनी कॉलेजच्या नवयुवकांची मदत घेतली. त्यांना युवकांच्या शक्तीची कल्पना होती. मुलांना जर विधायक कामात गुंतवले तर त्यातून मोठे समाजोपयोगी कार्य घडून येईल, असे त्यांना वाटत असे. त्या दृष्टीने "नगर कॉलेजच्या विद्यार्थ्यात 'ग्रामसुधारणा पथक त्यांनी उभारले नगर जवळील नागर देवळे हे नगर कॉलेजने दत्तक घेतलेले पहिले गाव"[२०] होते. कॉलेजला येणारे सर्व तरूण हे ग्रामीण भागातील होते. ज्या समाजातून आपण आलो त्या प्रती आपले काही कर्तव्य आहे, असे हिवाळेंना वाटत असे. त्या समाजासाठी काही उपयोगी कार्य करण्यास तरूणांनी पुढे यावे. यासाठी हे पथक उभारले. या पथकास प्रत्यक्ष ग्रामीण भागात कार्य करण्याची संधी दिली. त्यासाठी नगर जवळील नागरदेवळे हे खेडे दत्तक घेतले व या गावचा अल्पावधीतच या खेड्याचा विकास घडवून आणला. ग्रामसफाई, रस्ते बांधणी, पूल बांधणी, वृक्ष लागवड यासारख्या कामांमुळे तसेच जनजागृती करून शिक्षण व पर्यावरणाचे महत्त्व तेथील जनतेला पटवून दिले. त्यामुळे या गावचा अल्पावधीत विकास घडून आला. जेव्हा हे विद्यार्थी त्या गावात जाऊन कार्य करू लागले, तेव्हा तेथील गावकरी सुद्धा त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्वत: या विधायक कार्यात सहभागी झाले. यामुळे या गावचा विकास तर झालाच शिवाय शहरी विद्यार्थी व ग्रामीण भाग यांची नाळ जोडली गेली. या भागातील समस्या व जीवनमानाची त्यांना जाणीव झाली. डॉ.हिवाळेंच्या या कार्यामुळे तेथून पुढे दर वर्षी अशा पथकामार्फत वेगवेगळ्या खेड्यात समाजसेवा केली जाऊ लागली. त्यांनी सुरू केलेले हे ग्रामसुधारणा पथक पुढे विस्तारून त्याचे रूपांतर सेंटर फॉर स्टडिज इन रूरल डेव्हलपमेंट मध्ये झाले. तेथून पुढे समाजात जाऊन कार्य करणारे समाजसेवक बाहेर पडू लागले. डॉ.हिवाळेंनी त्यावेळी सुरू केलेली ही योजना

मोठी अभिनव होती. आज सुद्धा महाराष्ट्र शासनाला या नवयुवकांच्या शक्तीची जाणीव झाल्याने विद्यापीठामार्फत कॉलेज युवकांना ग्रामीण भागात जाऊन कार्य करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. डॉ.नरेंद्र जाधव यांनी तर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाल्यानंतर प्रत्येक कॉलेजने एक खेडे दत्तक घेऊन त्यांचा विकास विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घडून आणावा, अशी योजना आखली आहे. ही खरोखरच अभिनंदनीय आहे. परंतु ती प्रत्यक्षात १९५६मध्ये राबविली होती. त्यातून डॉ.हिवाळेंची दूरदृष्टी दिसून येते.

डॉ.हिवाळेंच्या प्रेरणेनेच पुढे अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य थॉमस बार्नबस यांच्या प्रोत्साहनाने व मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ.एस.के.हळवे यांनी 'ग्रामीण जीवन विकास प्रकल्प' सुरू केला. "जीवनाचे वास्तव स्वरूप विद्यार्थ्यांनी समजावून घ्यावे, तसेच ग्रामीण समाजात काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी, काही समस्या सोडविण्यासाठी महाविद्यालयीन तरूणांकडून मदत झाली, असा उद्देश या प्रकल्पामागे होता."[२१] हाच प्रकल्प पुढे राष्ट्रीय सेवा योजना म्हणून नावारूपास आला याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येऊन आज भारतातील प्रत्येक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तरूण वर्गात सामाजिक जाणीव निर्माण केली जात आहे. "सुरूवातीपासूनच या संस्थेने उच्च शिक्षणाशी महाविद्यालयीन शिक्षणाशी संबधित युवकवर्गाच्या विकासासाठी अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग, उपक्रम व योजनांवर भर दिला आहे. अशाच या उपक्रमामुळे राष्ट्राला दिलेली देणगी म्हणजे 'राष्ट्रीय सेवा योजना' होय."[२२] यातून त्यांची शिक्षण क्षेत्रात नवनव्या योजना राबविण्याची धडाडी व दूरदृष्टी दिसून येते. एन.एस.एस.मार्फत आज लाखो विद्यार्थी समाजसेवेच्या कार्यात आपले योगदान देत आहेत. त्याचे श्रेय डॉ.हिवाळेंनाच द्यावे लागते.

## ४.११ डॉ.हिवाळेंनी दीनदुबळ्यांसाठी केलेले कार्य :

आपले जीवन हे समर्पित जीवन आहे. समाजसेवा व तळागाळातील दीन–दुबळ्या बहुजन समाजात विधायक कार्य करण्यासाठी आपली नेमणूक झाली आहे, अशी डॉ.हिवाळेंची धारणा होती. त्यासाठी त्यांनी सुरूवातीपासूनच समाजसुधारणेचे व्रत अंगीकारले होते. अहमदनगर कॉलेजची स्थापना हा त्यांच्या समाजसेवेच्या कार्याचा एक भाग होता. महाविद्यालयात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलेजची फी भरणे शक्य नसे, अशा विद्यार्थ्यांना फी मध्ये पूर्ण सवलती दिल्या म्हणूनच या विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पूर्ण करता आले. विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलती दिल्या तरी त्यांची राहण्याची व जेवणाची सोय करता येण्यापुरता सुद्धा पैसा नव्हता. त्यांच्यासाठी स्वत:च्या पैशाने जागा विकत घेऊन त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय केली "ग्रामीण भागातून येणाऱ्या काही विद्यार्थ्यांना मुलांच्या वसतिगृहात जागा देणे कठीण आहे. कारण त्यातील जागा मोजक्याच असत घराशेजारची मोकळी जागा पप्पांनी विकत घेतली व त्यावर अशा मुलांसाठी होस्टेल बांधले. त्याला 'ॲनेक्स' हे नाव दिले. त्यात स्वस्त जेवणाची सोय केली."[२३] त्यांची ही योजना केवळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रेमापोटी केली होती. त्यांना शिक्षण घेता यावे हा एकमेव उद्देश त्यामागे होता.

डॉ.हिवाळे एक दानशूर गृहस्थ म्हणून यांची ओळख होती त्यांच्याकडे कुणीही मदत मागायला आला तरी त्याला रिकाम्या हाताने माघारी पाठवत नसत त्यातील काही लोक त्यांच्या दानशूरपणाचा गैरफायदा घेत. "त्यांच्याकडून मदत घेण्यासाठी थेट फाटकापासून ते घरापर्यंत लागलेली रांग काही फाटक्या साडीतील स्त्रियांची मुले उपाशी होती तर काही फुकट पैसे उकळण्यासाठी आलेले बदमाश असायचे काही दारूडे असायचे पैसे हातात पडल्याबरोबर गुत्यात जाऊन दारू ढोसायचे पप्पा प्रत्येकाला भेटायचे व दुधाची पावडर, कपडे, ब्लॅकेट, खान्याचे पदार्थ व पैसे द्यायचे"[२४] मदत

मागणाऱ्याला मदत करणे आपले कर्तव्य आहे ते आपणच केले पाहिजे अशी त्यामागची त्यांची भूमिका होती. दुष्काळी परिस्थिती असो, अतिवृष्टी असो अशावेळी ते आपल्या परीने लोकांना मदत करत. १९५३ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात दुष्काळ पडला होता. "नगर जिल्हयातील जनतेवर दुष्काळाची भीषण छाया पसरली होती या भयंकर संकटाच्या जबड्यातून गोरगरिबांना सोडविण्यासाठी डॉ.हिवाळे आल्या दिवसापासून घराघरास मदत पोहोचवित आहेत."[२५] यावरून त्यांच्या समाजसेवेची आपल्याला कल्पना येते.

डॉ.हिवाळेंना सुरूवातीपासूनच ग्रामीण भागातील लोकांविषयी कळवळा होता. खेड्यापाड्यात हिंडून तेथील लोकांचे प्रश्न समाजावून घेऊन ते सोडविण्यात त्यांना धन्यता वाटत असे एके दिवशी नेवासे तालुक्यातील वडाळा येथे ते गेले असता तेथील पाटलाबरोबर गावच्या सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीची चर्चा केली असता शैक्षणिक परिस्थिती समाधानकारक नसल्याचे त्यांना जाणवले. "खेड्यातील गरीब मुलांना राहायला जागा नसते म्हणून अभ्यास करायला देखील जमत नाही, जर अशांसाठी होस्टेल बांधून विजेची व इतर सोय केली तर ते परीक्षेत चांगल्यारीतीने पास होऊ शकतील व नगर कॉलेजचे शिक्षणही घेऊ शकतील."[२६] डॉ.हिवाळेंच्या ग्रामीण भागातील लोक, तरूण, शिक्षण, गरज या शब्दांनी अंत:करणात कालवाकालव झाली. त्यांनी लगेच हा प्रश्न सोडविण्याचे ठरवून पाटलास मुलांसाठी वसतिगृह बांधण्याचे आश्वासन दिले स्वत: पैसे खर्च करून वडाळा येथे एका वाड्यासह जमीन विकत घेतली व तेथे वसतिगृह सुरू केले. "यात आर्थिकदृष्ट्या असमर्थ असलेल्या परंतु शिकण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला विनामूल्य प्रवेश दिला जात होता. गावकऱ्यांनी धान्य गोळा करून या विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय करायची होती."[२७] ही एक अभिनव योजना होती. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली सर्व नगर जिल्ह्यातील खेड्यापाड्यातील अशा समस्या आहेत. त्यामुळे ते

अहमदनगरला उच्च शिक्षणासाठी येऊ शकत नाहीत. त्यांच्या प्राथमिक समस्यांमुळेच ते आपले शिक्षण अर्धवट सोडतात, हे लक्षात घेऊन डॉ.हिवाळेंनी "नगर जिल्ह्यात प्रत्येक माध्यमिक शाळा असलेल्या ठिकाणी अशा मोफत वसतिगृहाची शृंखला निर्माण करून तिचे शेवटचे टोक उच्च शिक्षणाच्या नगर मधील केंद्राशी जोडून निदान शिक्षणाच्या दृष्टीने नगर जिल्हा स्वावलंबी करण्याचे त्यांचे भव्योदात्त स्वप्न होते. या जिल्ह्यातील शिक्षणाची इच्छा नि बौद्धिक पात्रता असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याची सोय झाली पाहिजे. पैशावाचून त्यांचे अडू नये आणि जातिधर्माचा अडसरही त्यांच्या मार्गात उभा राहू नये ही त्यांची इच्छा होती."[२८] त्याच दृष्टीने त्यांनी मोफत वसतिगृहाचा प्रयोग करून पाहिला होता. तो खरोखरच क्रांतिकारक होता. परंतु त्यांच्या वृद्धापकाळातील आजारपणामुळे ही योजना प्रत्यक्षात उतरवणे त्यांना शक्य झाले नाही परंतु जर ती योजना प्रत्यक्षात उतरविण्यात यशस्वी झाले असते तर आज अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागाची स्थिती वेगळी दिसली असती.

प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्या मुलांना पुस्तके विकत घेता येत नसत, तरीही काही मुलांची जिद्द असल्याने ते चांगले मार्क मिळवतात. त्यांना पुस्तके दिली तर ते आणखी प्रगती करू शकतील, असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी या मुलांसाठी शाळेत पुस्तकांची व्यवस्था केली. "हा पुस्तकांचा खर्च एकाच व्यक्तिला सोसणार नाही म्हणून सामुदायिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. आम्ही पुस्तकाचा एक सेट स्कूल ऑफ थिऑलॉजी व एक सेट मुलींच्या हायस्कूलमध्ये ठेवणार आहोत. ९वी, १० वी व ११ वी या इयत्तेतील सर्व पुस्तके यात सापडतील. इतर ठिकाणी जर जबाबदार समित्या नेमण्यात आल्या, तर तेथेही काही अटींवर क्रमिक पुस्तकांचे सेट ठेवण्याची आमची इच्छा आहे याविषयी पत्रव्यवहार करावा."[२९] शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर कोणत्याही कारणाने परिणाम होऊ नये, असे त्यांना वाटत असे. म्हणून त्यांनी ही योजना आखली होती. प्राथमिक

व माध्यमिक शिक्षण हाच उच्च शिक्षणाचा पाया असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पायाच भक्कम व्हावा, अशी त्यांची इच्छा होती हे यातून दिसते. आज महाराष्ट्र शासनाने सुद्धा १ ते ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके पुरविण्याची योजना राबविली आहे. मात्र डॉ. हिवाळेंनी हे कार्य १९५८ मध्येच केले होते.

डॉ. हिवाळे फक्त शैक्षणिक कार्यातच आग्रही होते असे समजणे चूक होईल तर त्यांनी सर्वच क्षेत्रात आपले कार्य केलेले दिसून येईल. वृद्ध स्त्री–पुरूषांसाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय होते. समाजात अनेक ठिकाणी अशी परिस्थिती दिसून येते की, वृद्ध आई-वडिलांना त्यांची मुले सांभाळत नाहीत त्यामुळे त्यांची स्थिती फारच वाईट होते अशांना त्यांनी रेशनिंग पुरविले, वस्त्रे दिली. तसेच त्यांची राहण्याची सोय व्हावी, म्हणून वृद्धाश्रम काढावेत यासाठी उषा साप्ताहिकातून त्यांची कैफियत मांडली व त्यांना मदत करण्याचे अवाहन केले समाजसेवा करताना फक्त बोलून चालत नाही, तर त्याला कर्तृत्त्वाची जोड द्यावी लागते, हे त्यांना माहीत होते. त्याच बरोबर बेरोजगार लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी काही उद्योग करावा, असा विचार त्यांच्या मनात घोळत होता. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्नही केला होता. "जपानमध्ये ख्रिस्ती मंडळ्या केवळ आध्यात्मिक गोष्टींकडे लक्ष देत नाहीत, तर आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून पालक व वडील खटपट करतात, असे आम्हास दिसून आले. इकडेही याबाबतील लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. प्रयोग म्हणून आम्ही 'उषा सोप फॅक्टरी' काढली आहे. घेणाऱ्यास विकणाऱ्यास व करणाऱ्यास सर्व फायदा वाटून टाकण्यात येतो. 'भांडवल आमचे' पण एक कवडी फायदा आम्ही घेत नाही."[३०] यातून डॉ. हिवाळेंनी फक्त लोकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी ही फॅक्टरी काढली होती व स्वत: एक पैसाही घेतला नाही यातून त्यांनी जनहितासाठी किती निस्वार्थपणे कार्य केले याची जाणीव होते. "जनसेवा हीच खरी प्रभूसेवा हे पवित्र ध्येय पाठीशी बांधून स्वबांधवांसाठी व स्वदेशासाठी निस्पृ:ह बुद्धीने आहोरात्र झटणारा हा सेवक ईश्वराने आमच्या समाजात जन्माला घातला

त्याबद्दल आमचा आखिल भारतीय ख्रिस्ती समाज किती धन्य समजावा"[३१] यातून डॉ.हिवाळेंनी केलेले कार्य किती उच्च दर्जाचे होते याची कल्पना येते. ख्रिस्ती समाजाबरोबरच इतर भारतीय बांधवांना अज्ञानाच्या खोल गर्तेतून बाहेर काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते. समाजसेवेलाच त्यांनी ईश्वरी सेवा माणून आहोरात्र समाजासाठी झटणारा समाजसेवक म्हणून नावलौकिक मिळवला.

## ४.१२ ज्ञानोदय व डॉ.हिवाळे :

भारतात युरोपियनांच्या आगमनाने भारतीयांना पाश्चात्य संस्कृती ज्ञान विज्ञान याची जाणीव झाली. त्याचबरोबर स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वाचीही जाणीव होऊ लागली. परंतु ही प्रक्रिया काही एकाएकी घडून आली नाही. त्यासाठी एक शतकाचा अवधी जावा लागला याकार्यात सर्वात मोठी भूमिका वृत्तपत्रांनी पार पाडली. या काळात युरोपियनांच्या आगमनाने भारतात छपाईची कला अस्तित्त्वात आली. "सर्व प्रथम पोर्तुगीजांनी भारतात छापखाना आणला आणि १५५७ मध्ये गोव्याच्या ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी पहिले पुस्तक छापले. १९६४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने मुंबईत छापखाना सुरू केला."[३२] परंतु जवळ जवळ शंभर वर्षापर्यंत कोणतेही वृत्तपत्र छापले नाही. कारण त्यामार्फत आपला खासगी व्यापार व भ्रष्टाचार लंडनपर्यंत पोहोचेल अशी भीती कंपनीच्या कर्मचाऱ्यांना वाटत होती. काळाच्या ओघात देश परदेशातील माहिती देण्यासाठी सरकारचे धोरण जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच जनतेच्या प्रतिक्रिया सरकार पर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्र विकासास सुरूवात झाली.

भारतात सर्वात "पहिले वृत्तपत्र काढण्याचा मान जेम ऑगस्टस हिकी ह्याला प्राप्त झाला. ह्याने १७८0 मध्ये 'द बेंगाल गॅझेट' नावाचे वृत्तपत्र प्रकाशित केले."[३३] त्यानंतर वेगवेगळी वृत्तपत्रे निघू लागली. "१८१८ मध्ये 'समाचार दर्पण' हे देशी भाषेतील पहिले बंगाली वृत्तपत्र तर १८३२ मध्ये 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र

सुरू झाले."[३४] ही वर्तमानपत्रे मनोरंजन व प्रबोधन अशी कार्य करू लागली. वर्तमानपत्रे हे समाजाचा आरसा असतो. समाजाच्या प्रतिक्रिया वृत्तपत्रातून मांडल्या जाऊ लागल्या नंतरच्या काळात महाराष्ट्रात ज्ञानोदय, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदूप्रकाश, दीनबंधू, केसरी, मराठा, काळ इ. वृत्तपत्रे समाजसुधारणा राष्ट्रीय जागृती करू लागले. महाराष्ट्रात समाजसुधारणा व लोकजागृती करणाऱ्या वृत्तपत्रात ज्ञानोदयचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. १९४२ मध्ये ज्ञानोदय हे वृत्तपत्र निघू लागले. "ज्ञानोदय अहमदनगर येथील मिशनऱ्यांनी काढले. पहिला अंक जून १९४२ मध्ये निघाला बहुत करून महिन्याच्या अखेर निघाला असावा कारण २० तारखेस बराच पाऊस पडल्याचे वर्तमान पहिल्या अंकात आहे. पहिले सहा अंक नगरास निघाले अंक सोळा पृष्टांचा असे व शिळा पृष्ठावर छापलेला असे."[३५] 'ज्ञानोदया'चा उद्देश प्रामुख्याने मनोरंजन करणे चालत्या काळाचे वर्तमान कळविणे तसेच ज्ञानवृद्धी करणे असा होता.

डॉ.हिवाळेंनी 'ज्ञानोदय' मधून लिखान केले होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी – परंपरा यावर त्यांनी आपल्या लेखातून हल्ला केला होता. वैचारिक लेखन केले. 'ज्ञानोदय' बोर्डाला त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखन व विचारामुळे त्यांची दखल घ्यावी लागली. त्यांच्या क्रांतिकारक विचारांमुळे १९२१ मध्ये त्यांच्याकडे ज्ञानोदयचे संपादकपद चालून आले. १० मार्च १९२१ ते ८ डिसें.१९२१ पर्यंत त्यांनी ज्ञानोदयाचे संपादन केले. पुढे आपल्या पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेले तेव्हा त्यांना संपादकपद सोडावे लागले. याकाळात त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन करून समाजजागृती करण्याचे कार्य केले. पुढे १ जाने.१९३९ ते ३१ डिसें.१९४०, १ जाने.१९४२ ते ३० जून १९४४, ५ जाने. ते २९ मार्च १९४५, १९४७ साली काही काळ व १९५१ अखेर पर्यंत त्यांनी ज्ञानोदयाचे संपादन केले. याकाळात ज्ञानोदया मधून महत्त्वपूर्ण पण पथ्यकारक लेखन केले व समाजजागृती घडून आणली. त्यांच्या या लेखाचा अभ्यास करायचा म्हटल्यास अभ्यासाचा एक विषय होईल इतक्या मोठ्या प्रमाणात त्यांनी

वेगवेगळ्या विषयावर लेखन केले. त्यांनी दिलेले योगदान म्हणजे १९४८ मध्ये ज्ञानोदयाची स्थिती अतिशय खालावलेली होती. यावेळी ज्ञानोदय बंद पडण्याच्या मार्गा वर होते. परंतु इतक्या वर्षापासून सेवा करणारे हे वर्तमानपत्र बंद पडणे "डॉ.बी.पी.हिवाळे यांच्या विनंती वरून ता.१ ऑगस्ट १९४८ पासून ३१ डिसें.१९४८ पर्यंत ज्ञानोदय बोर्ड त्यांना इंग्रजी ज्ञानोदयाची सर्व जबाबदारी देत आहे. त्याकाळात या ज्ञानोदयाची सर्व आर्थिक जबाबदारी डॉक्टरसाहेब आपणावरच घेणार आहेत."[३६] हे वृत्तपत्र बंद पडू नये म्हणून त्याचा सर्व आर्थिक भार घेतला व १९५१ पर्यंत व्यवस्थितपणे पार पाडला. यातून त्यांची समाजसेवा करण्याची वृत्ती व जिद्द दिसून येते. "ज्ञानोदय बंद पडण्याच्या ऐनवेळेला डॉ.हिवाळे यांनी पुढे येऊन त्याची सर्व जबाबदारी आपणावर घेऊन ते पत्रक मृत्यूच्या जबड्यातून वाचविले आहे. जर ज्ञानोदयाच्या इंग्रजी विभागाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली तर मराठी विभागाची जबाबदारी सुद्धा १९४९ पासून त्यांच्याकडे देण्यात येणार होती. पहिला प्रयोग त्यांनी यशस्वीपणे केला. त्यामुळे १९४८ पासून मराठी विभागाची जबाबदारी सुद्धा डॉ.हिवाळेंनी १९५१ पर्यंत सांभाळली व ज्ञानोदयाला पुनर्जिवित करण्याचे कार्य केले.

### ४.१३ डॉ.हिवाळेंचे प्रौढशिक्षण क्षेत्रातील कार्य :

डॉ.हिवाळेंना प्रथमपासून प्रौढ शिक्षणाच्या महत्त्वाविषयी जाणीव होती. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी ज्ञानोदयातून लेखन केले. शिक्षणामुळे भारतीय समाज मागासलेला आहे. म्हणून त्यांनी प्रौढशिक्षण मंडळे स्थापली "या मंडळातील सभासदांनी निदान एक तरी व्यक्ती साक्षर करण्याची प्रतिज्ञा करावी म्हणजे १९४१ पर्यंत सर्व ख्रिस्ती स्त्री-पुरूषास साक्षर करणे शक्य होईल."[३८] प्रथम ख्रिस्तींना साक्षर करून ज्ञानी करणे त्यामुळे इतर लोक त्यांचे अनुकरण करून शिक्षित बनतील व भारताला स्वातंत्र्य

मिळेपर्यंत सर्व भारतात शिक्षणाचा प्रसार होऊन लवकरच भारतातील निरक्षरता निर्मुलन होईल हा उद्देश त्यामागे होता.

डॉ.हिवाळेंनी नवसाक्षरांसाठी ज्ञानोदयाच्या सहाव्या पृष्ठावर एक लेखमाला सुरू केली होती. तेव्हा त्याची बाराशे पुनर्रमुद्रीत पाने दर आठवड्याला खपत असत यातून मुलामुलींसाठी तसेच नुकतेच वाचायला शिकलेल्यांसाठी लेखन केले जात असत "सुमारे पाऊने दोनशे लेख आतापर्यंत आम्ही लिहिलेले आहे. तरी प्रत्येक वेळेस आम्हाला एक अडचण भासते. खेड्यातील लोकांना अमूक शब्द समजतील किंवा नाही हा प्रश्न उद्‌भवतो व त्याचे उत्तर मिळणे कठीण पडते."[३९] खेड्यातील लोकांचा शब्दसंग्रह कमी असतो त्यांना ज्या शब्दाविषयी माहिती आहे असे यात यावेत असे त्यांना वाटत असे. त्यासाठी त्यांनी खेड्यातील शिक्षक व पालक यांच्या सहाय्याने त्यांना माहित असलेल्या शब्दाविषयी प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळवली व त्या शब्दात लेख लिहिण्यास सुरूवात केली. एकदा अवघड शब्द आल्यास त्याचा अर्थ कंसात देण्यास सुरूवात केली. "आपल्या देशात लोकसत्तेची कल्पना आता रूढ झाली आहे. कायदेमंडळाची निवड करण्याची सत्ता आता लोकांकडे आली आहे. देशापुढे कोणते प्रश्न आहेत व ते सोडविण्यासाठी कोण काय योजना पुढे आणीत आहे. मतदारास समजले पाहिजे नाहीतर कोणास मत द्यावे, हे त्यांना कसे कळणार"[४०] यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे व ही गरज साक्षरता प्रसारानेच भरून निघेल. शिक्षण नसलेल्या शेतकऱ्यांची सावकारांकडून पिळवणूक होते. त्या शोषणाविषयी शेतकऱ्यांना जागृत केले पाहिजे. आपल्या देशाची उन्नती घडून आणण्यासाठी समाजाने एकत्र कार्य करावे. धर्माच्या कारणास्तव कोणीही समाजकार्यापासून राहू नये. साक्षरताप्रसाराचे कार्य सर्वसमाजाला किंवा या कामात भाग घेता येईल आपल्या देशाची उन्नती घडवून आणता येईल.

## ४.१४ डॉ.हिवाळेंचे देशप्रेम :

डॉ.हिवाळेंना आपल्या देशाविषयी नितांत आदर होता. त्यांची देशभक्ती कोणत्याही देशभक्त स्वातंत्र्य सैनिकांपेक्षा कमी नव्हती. हे त्यांच्या कार्यातून दिसून येते. ते प्रत्यक्ष स्वातंत्र्यचळवळीत सामिल झाले नसले तरी त्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या विधायक कार्यास नेहमी पाठिंबा दिला हे त्यांच्या लेखनावरून दिसून येते. त्यांच्या देशप्रेमाची चुनूक विद्यार्थी दशेतच पाहावयास मिळते. "त्यावेळच्या भारत ब्रहमदेश व सिलोन ह्या देशातील स्टुडंटस ख्रिश्चन मुव्हमेंट ह्या चळवळीची त्रैवार्षिक सभा होती. ती रंगून पासून कॅडीपर्यंत कोठेही भरत असे. वर्ष १९१२ सभा भरणार होती बंगालमधील सेरामपूरमध्ये प्रसिद्ध ख्रिस्ती पुढारी जॉन आर मॉट यांनी तरूणांच्या एका चमुला प्रश्न विचारला येथे बसलेल्या तुमच्यापैकी कितीजण आपले जीवन देशसेवेसाठी द्यायला तयार आहात ? विचार करा. हाच प्रश्न मी तुम्हाला उद्या विचारेन विद्यार्थ्यांमध्ये ह्यावर खूप उत्साहाने ऊहापोह झाला. उद्या सायंकाळी काय होणार याची त्यांना उत्कंठा लागली ठरल्यावेळी सहाशे प्रतिनिधींनी हॉल भरून गेला. मॉटने तोच प्रश्न पुन्हा विचारला हॉलमधील कुतुहल मिस्त्रीत शांततेत सहा हात वर झाले त्यात भास्करचा हात होता."[४१] डॉ.मॉटला दिलेले वचन डॉ.हिवाळे कधीही विसरले नाहीत व जीवनभर आपले देशसेवेचे कार्य सुरू ठेवले.

डॉ.हिवाळे विल्सन कॉलेजात ज्ञानदानाचे कार्य करीत होते. तो काळ पारतंज्याचा होता. कॉलेजातील काही विद्यार्थी स्वातंत्र्य लढ्याशी संबधित होते. ते कॉंग्रेसच्या असहकार सविनय कायदेभंगासारख्या चळवळीत भाग घेत असत. अशा विद्यार्थ्यांविषयी इतर प्राध्यापक ताठर भूमिका घेत असत पण हिवाळे आपण या देशाचे नागरिक आहोत या दृष्टिकोनातून या विद्यार्थ्यांविषयी सहानुभूती दाखवत. एखाद्या विद्यार्थ्याने राजकीय सभेत भाग घेतल्यामुळे तुरूंगात गेल्यास त्याला सोडवून

आणण्याच्या कामी डॉ.हिवाळे नेहमी आघाडीवर असत तसेच अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत लक्ष घालण्यास सांगत.

१९४२ च्या भारत छोडो चळवळीत म.गांधींनी स्वदेशीचा पुकारा दिला त्यावेळी त्यांनी स्वत: परदेशी कपड्यांचा त्याग केला व स्वदेशीचा अवलंब केला. त्यावेळी विल्सन कॉलेजातील प्राध्यापकात खादी वापरणारे ते एकमेव प्राध्यापक होते. त्यामुळे हा त्यांच्यात झालेला बदल इतर शिक्षक वर्गाच्या ताबडतोब लक्षात आला व ते त्यांच्याकडे संशयाने पाहू लागले. त्याची डॉ.हिवाळेंना कधीही पर्वा वाटली नाही. "विल्सन कॉलेजच्या काही प्राध्यापकांना राज्यपालांच्या बंगल्यावर नियमितपणे चहाचे आमंत्रण असायचे पप्पांनी नवीन सुट घालणे सुरू केल्यावर मात्र ही आमंत्रणे येणे बंद झाले. पप्पांना त्याची पर्वा वाटली नाही."[४२] याप्रकारे त्यांनी आपली देशभक्ती जागृत ठेवली. त्यामुळे कधी कधी त्यांची मोठी पंचाईत होत असे पण त्याचे त्यांना कधी वाईट वाटत नसे.

डॉ.हिवाळे यांचे स्वदेशी बहिष्कारासंबधी काही वैयक्तिक मते होती. परकीय मालावर बहिष्कार घालण्यापेक्षा जर प्रत्येकाने स्वत:हून देशी माल वापरायचे ठरवले तर आपोआपच परकीय मालाला उठाव नसल्याने त्याची आयात बंद होईल व देशी मालाला उठाव मिळेल. म्हणून परकीय मालाच्या होळ्या करणे गरजेचे नाही. कारण दुकाने तर भारतीयांचीच आहेत. परिणामी भारतीयांचेच आर्थिक नुकसान होते. त्यापेक्षा आहे तेवढा माल वापरावा नवीन खरेदी करू नये असा त्यांचा स्वदेशी बहिष्कारासंबधी विचार होता.

डॉ.हिवाळेंचे भाऊ शामराव हिवाळे हे गांधीजींचे सच्चे अनुयायी होते. ते दोघेही देशसेवेचे कार्य करीत असले तरी दोघांचे मार्ग वेगळे होते. परंतु अंतस्थ हेतू एकच होता. एकाने ख्रिश्चन मिशनबरोबर राहून समाजसेवा व देशसेवेत महत्त्वाचे योगदान दिले तर दुसऱ्याने गांधीबरोबर राहून त्यांचे अनुयायीत्त्व पत्करले व आदिवासी

भागात समाजसवेचे व्रत अंगिकारले होते. डॉ.हिवाळेंनी सुद्धा आपल्या बंधुच्या कार्यास सदा प्रोत्साहन दिले होते. त्यामुळेच ते गांधीजीबरोबर राहून जन्मभर त्यांनी समाजसेवा केली.

डॉ.हिवाळेंचा विवाहानंतरचा जवळजवळ १0 वर्षांचा काळ अमेरिकेत गेला होता. याकाळात त्यांच्या पहिल्या तीन अपत्यांचा जन्म झाला. या मुलींचा जन्म अमेरिकेत झाला असला, त्यांचे शिक्षण अमेरिकेत झाले असले तरी त्यांच्यावर हिवाळे दांपत्याने भारतीय संस्कार केले. त्यांना आपल्या मातृभाषा शिकविल्या व भावी काळात आपल्या संस्कृतीची जोपासना करण्याची शिकवण दिली. डॉ.हिवाळे अमेरिकेत जात तेव्हा ते भारतातील लोक, संस्कृती भारतातील इतर गोष्टीसंबधी आपली बाजू आपल्या मित्रांसमोर मांडत असत व अभिमानाने कधी त्यांना भारतीय पद्धतीचे जेवण देत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे वारे जसजसे वाहू लागले तसतसे डॉ.हिवाळेंचे मन अस्वस्थ होत. सर्व सोडून आपण स्वातंत्र्यलढ्यात झोकून द्यावे असा विचार त्यांच्या मनात कधी कधी येत त्याच क्षणी त्यांना असेही वाटे की, आपल्याला स्वातंत्र्यलढ्याच्या बाहेर राहून देखील चांगली देशसेवा करता येईल व तसे त्यांनी केलेही. भारत इंग्रजांच्या वर्चस्वातून मुक्त झाल्यानंतर देशाला कुशल व शिक्षित मनुष्यबळाची गरज होती. ती डॉ.हिवाळेंनी महाविद्यालय स्थापून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. यातून आपल्याला त्यांच्या देशप्रेमाची कल्पना येते.

# संदर्भ


१. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १४ जुलै. १९२१ अंक २८ पृ.४

२. कित्ता, पृ.४

३. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १३ ऑगस्ट. १९४२ अंक ३३ पृ.३

४. कित्ता, पृ.३

५. हिवाळे भा.पां. : उषा, ११ फेब्रुवारी १९५८ अंक ०५ पृ.१

६. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३ पृ.२१

७. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१२१

८. कित्ता, पृ.१२३

९. कित्ता, पृ.१६३

१०. कित्ता, पृ.१६३

११. कित्ता, पृ.१५३

१२. कित्ता, पृ.१५५

१३. कित्ता, पृ.१६०

१४. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. २३

१५. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १० फेब्रु. १९३८ अंक ०६ पृ.३

१६. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.२३५

१७. हिवाळे भा.पां. : उषा, २६ ऑगस्ट १९५८ अंक ३३ पृ.१

१८. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१३५

१९. हिवाळे भा.पां. : उषा, १५ जाने. १९५८ अंक १ पृ.५

२0. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७ पृ.४

२१. शेख मेहबुब आदम : दै.समाचार, २७ सप्टेंबर २000, पृ.३

२२. कित्ता, पृ.३

२३. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७, पृ.२४५

२४. कित्ता, पृ.२४६

२५. कित्ता, पृ.२४७

२६. कित्ता, पृ.२४५

२७. कित्ता, पृ.२४५

२८. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२0 शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.२३८

२९. हिवाळे भा.पां. : उषा, १ जुलै १९५८ अंक २५ पृ.१

३0. हिवाळे भा.पां. : उषा, १५ जाने. १९५८ अंक १ पृ.२

३१. कित्ता, पृ.३

३२. ग्रोवर बी.एल / बेलेकर एन.के : आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद प्रकाशन नवी दिल्ली, २00३ पृ.३१५

३३. कित्ता, पृ.३१५

३४. दीक्षित राजा : आधुनिक भारताचा व चीनचा इतिहास, प्रगती बुक्स, १0 वी आवृत्ती पुणे २00४ पृ.९३

३५. हिवाळे भा. पां. : ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे, ज्ञानोदय सोसा. मुंबई पृ. १
३६. भोसले प्र. शि. : ज्ञानोदय, ५ ऑगस्ट १९४८ अंक ३२ पृ. ५
३७. कित्ता, पृ. ५
३८. हिवाळे भा. पां. : ज्ञानोदय, १0 फेब्रु. १९३८ अंक ६ पृ. २
३९. हिवाळे भा. पां. : ज्ञानोदय, ३0 जुलै. १९४२ अंक १३ पृ. ४
४0. हिवाळे भा. पां. : ज्ञानोदय, ३फेब्रु. १९३८ अंक 0५ पृ. ४
४१. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा. पा. हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २00७ पृ. ७८
४२. कित्ता, पृ. ६५

❖❖❖❖❖❖

# प्रकरण पाचवे

# डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक आणि वाङ्मयीन कार्य

५.१ डॉ.हिवाळे यांचा धार्मिक विचार

५.२ डॉ.हिवाळे यांचे वाङ्मयीन कार्य

५.३ डॉ.हिवाळे व शब्दकोश

❖❖❖❖❖

# प्रकरण पाचवे

## डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे यांचे धार्मिक आणि वाङ्मयीन कार्य

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, कोणत्याही धर्माला राज्य घटनेत अधिमान्यता दिलेली नाही. भारतात विविध जातिधर्माचे लोकसमूह राहतात. त्यामुळे कोणत्याही व्यक्तिला आपल्या धर्माच्या कारणामुळे राजव्यवस्थेकडून भेदभाव होऊ नये हा दृष्टिकोन आहे. त्याबरोबर राज्य घटनेने प्रत्येक व्यक्तिला आपल्या धर्माचा प्रचार, प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. धर्म ही प्रत्येक व्यक्तिची वैयक्तिक बाब मानली तर प्रत्येक धर्मात ईश्वराची पुजापाठाची पद्धत वेगळी असली तरी व नाव वेगळे असले तरी ईश्वर एकच आहे. धर्म हे परमेश्वरापर्यंत जाण्याचे साधन आहे हे जगन्मान्य झाले आहे. साधने वेगळी असली तरी साध्य मात्र एकच आहे. भारतात हिंदू, मस्लिम, शीख, इसाई, ख्रिश्चन, बौद्ध इ. धर्माचे लोक राहतात व आपल्या धर्मानुसार आचरण करताना दिसतात. भारतात अनेक धर्माचे लोक का आहेत ? याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा वेध घ्यावा लागतो. व इतर धर्मियांना भारतात येऊन आपल्या धर्माचा प्रसार कसा केला हे जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारतीयांनी परकीयांची आगमने झेलली. त्यामध्ये प्रामुख्याने इराणी, ग्रीक, बॅक्ट्रीयन, पर्शियन या आक्रमकांनी भारतात आल्यानंतर भारतीय संस्कृतीशी सामावून घेतले व ते भारतीय संस्कृतीचा एक भाग बनले. त्यांनी भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी धर्माचे अनुयायीत्व पत्करले. पुढे मुस्लिम आक्रमक भारतात स्थिरावले. त्यांनी भारतीय संस्कृतीचा अंगिकार करून

आपल्या धर्माचे अस्तित्व कायम ठेवले. पुढे व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ब्रिटिशांनी कालांतराने संपूर्ण भारतीय उपखंडावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. धर्म व संस्कृतीच्या बाबतीत सुद्धा पूर्वीच्या आक्रमकांपेक्षा वेगळे धोरण अवलंबले. ख्रिश्चन धर्म व पाश्चात्य संस्कृती यांचा प्रचार, प्रसार सुरू केला व आपल्या धर्म व संस्कृतीची छाप भारतावर उमटवली.

भारतात ख्रिश्चन धर्माच्या प्रचार प्रसाराच्या कामी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला भारतात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यास अधिकृतपणे १८१३ च्या चार्टर ॲक्ट पासून सुरूवात झाली. भारतात वेगवेगळ्या भागात त्यांनी आपली केंद्रे स्थापन केली. अहमदनगर याठिकाणी अमेरिकन मराठी मिशनने आपल्या कार्यास १८३१ मध्ये सुरूवात केली. समाजोपयोगी कार्यात रस घेणारे मिशनरी पुढे धर्मांतरात रस घेऊ लागले. आर्थिक मदतीच्या बदल्यात भारतातील दीन दलित गोर गरीब मिशनऱ्यांच्या धर्मांतराला बळी पडले व आपला मूळ धर्म सोडून ख्रिश्चन धर्म स्वीकारला. जरी लोकांनी या धर्माचा स्वीकार केला तरी त्यांनी आपला हिंदीपणा सोडला नाही. त्यांनी हिंदू व पाश्चात्य संस्कृतीचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला भारतातील हिंदी लोक ख्रिस्ती झाले याचा एक अपेक्षित असा चांगला परिणाम झाला की त्यांनी पाश्चात्यांचे शिक्षण समाजसुधारणा विषयक विचार मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा अंगिकार करून आपल्या भारतीय बांधवांना दारिद्रय व अंधश्रद्धेच्या खोल गर्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केला. अशा समाजसुधारकांमध्ये ना.वा.टिळक, रमाबाई रानडे यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या बरोबर एक नाव आवर्जुन घ्यावे लागते ते म्हणजे डॉ.भा.पां.हिवाळे हे होय.

डॉ.भा.पां.हिवाळे हे तिसऱ्या पिढीचे खिस्ती होते. त्यामुळे त्यांच्यावर ख्रिश्चन धर्माचा व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याचा प्रभाव पडला होता. त्यांचे सुरूवातीपासूनचे वातावरण धार्मिक होते. त्यांचे वडील पांडुरंग हिवाळे धर्मोपदेशकाचे

काम करीत, त्यामुळे घरातील वातावरण धार्मिक राहणे स्वाभाविक होते. तसेच त्यांचा बालपणीचा शिक्षण व संस्काराचा काळ अमेरिकन मराठी मिशनच्या अहमदनगर येथील शाळेत गेला त्यामुळे मिशनच्या सुधारणेच्या व धर्मप्रसाराच्या कार्याचा वसा त्यांना तेथून मिळाला. ख्रिश्चन धर्म हा जगातील काही प्रमुख धर्मापैकी एक आहे. व त्याचा प्रसार मोठ्याप्रमाणावर जगभर झालेला आहे.बालपणापासूनच ख्रिश्चन धर्माची तत्त्वे डॉ.हिवाळे यांच्या मनात घर करून राहिली.

### ५.१ डॉ.हिवाळे यांचा धार्मिक विचार :

डॉ.हिवाळे आपल्या लेखनातून तसेच आपल्या भाषणातून धार्मिक उपदेशातून विचार मांडताना दिसून येतात. त्यांनी आपले धार्मिक विचार ज्ञानोदय आणि उषा साप्ताहिकामध्ये प्रामुख्याने मांडलेले दिसून येते. त्यातून त्यांचे धार्मिक विचार अतिशय उच्च प्रतिचे असल्याचे दिसते. धर्म हा व्यक्तिच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे असे त्यांना वाटत असे सर्वच धर्माची तत्त्वे उदात्त असतात अशी त्यांची धारणा होती. कोणत्याही व्यक्तिला जो धर्म आवडेल त्याचा स्वीकार करता आला पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता. धर्माची व्याख्या अनेकजण वेगवेगळ्या प्रकारे करतात. 'मानवाचा इश्वराशी जो संबध येतो त्याला कुणी धर्म म्हणतात.' एखाद्या सिद्धांतावर विश्वास असणे आचार पाळणे किंवा विविध विधी पार पाडणे यालाच कुणी धर्म म्हणतात. धर्माला सामाजिक आणि अध्यात्मिक अंग असते त्यांचा धर्मविषयक दृष्टिकोन सर्व सामान्य लोकांच्या गरजानुसार असलेला दिसून येतो. "बहुजन समजाचे व्यवहारिक हित जो धर्म साधील व ईश्वरी प्रेमासारख्या मूलतत्त्वाचा आधार घेऊन ते साधण्याचा जो प्रयत्न करील तोच धर्म टिकणार आहे."[१] धर्म हा सर्वसामान्यांना अनुसरण्यासाठी योग्य असावा बहुजनसमाज त्याच्याकडे आकृष्ट झाला पाहिजे तरच तो धर्म चिरकाल टिकेल. असे त्यांना वाटत असे धर्माने बहुजन समाजाच्या प्रश्नांना समस्यांना बगल देता कामा

नये. तसे झाले तर लोक धर्मांतर करण्यास प्रवृत्त होतील व साध्या सोप्या आचरण असणाऱ्या धर्माकडे आकृष्ट होतील तेव्हा धर्मा-धर्मात तणाव निर्माण होईल तसे होऊ नये धर्मांतर ही व्यक्तिची वैयक्तिक बाब असल्याने त्याला धर्मांतराचे स्वातंत्र्य असावे. “धर्मांतराचा प्रश्न केव्हाही कोठेही नाजूक असणार कारण धर्म ही बहुजन समाजाची अत्यंत जिव्हाळ्याची बाब असते जेथे धर्माचे स्वरूप नुसते अध्यात्मिक नसून सामाजिक बनलेले आहे तेथे धर्मांतर म्हणजे भयंकर दुर्देवच वाटणार चीन व जपान देशात एकाच कुटुंबात एक बौद्ध दुसरा शींती तिसरा ख्रिस्ती व चौथा कन्फेशीयस अशी आज परिस्थिती आढळून येते.”[२] तसेच भारतात व्हावे प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार धार्मिक आचरण करण्याची परवानगी असावी भारतात त्यापेक्षा वेगळी परिस्थिती दिसते प्रत्येकजण आपल्या धर्माला चिकटून राहिलेला दिसून येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर धार्मिक तणाव भारतात निर्माण होतात असे त्यांना वाटते.

मिशनऱ्यांनी भारतात आपल्या कार्यास सुरूवात केल्यावर अनेक मोठ्या प्रमाणात धर्मांतरे घडून आणली त्यामुळे हिंदू धर्मिय सनातनी त्यांच्यावर नाराज झाले. “मिशनऱ्यांनी जे कार्य केले ते केवळ समाजसेवा म्हणून केले. एखाद्याला भूक लागल्यावर खायला दिले व त्याने नंतर धर्मांतर केले ते धर्मांतर होत नाही तसे जर इतर धर्मियांना वाटत असेल त्याने स्वत: पुढे येऊन आपल्या बांधवांना खायला दयावे व हिंदू धर्मात उच्च वर्णियांना जे हक्क आहेत ते सर्व अस्पृश्यांना द्या म्हणजे धर्मांतराचा प्रश्नच येणार नाही.”[३] असे मत मांडले. हिंदू धर्माने ज्या आपल्या बांधवांवर अन्याय केला आहे त्यांना मुख्य प्रवाहपासून दूर ठेवले आहे. त्यामुळे ते धर्मांतर करण्यास प्रवृत्त होतात. त्यासाठी त्यांचे हक्क त्यांना दिले तर हा प्रश्न आपोआपच सुटेल.

आपल्या धर्माची संख्या वाढावी म्हणून प्रत्येकजण प्रयत्न करीत असतो एखाद्याला आर्थिक किंवा राजकीय प्रलोभन दाखवून धर्मांतर घडवून आणणे डॉ.हिवाळेंना मान्य नव्हते. डॉ.आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह धर्मांतराची घोषणा

केली तेव्हा शीख, मुस्लिम या धर्मातील लोकांनी त्यांना आपल्या राजकीय फायद्यासाठी आपल्या धर्मात सामील होण्याचे आमंत्रण दिले होते. परंतु ते सुद्धा या प्रलोभनाला बळी पडले नाहीत. त्यांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला. "आध्यात्मिक बाब सोडून जर राजकीय सामाजिक व आर्थिक फायदे व्हावेत म्हणून धर्मांतर करत असला तर ख्रिस्ती महामंडळाने त्याचा विचार सुद्धा करू नये."[४] तसे झाले तर ते चिरकालीन धर्मांतर नसते ख्रिस्ती महामंडळाने फक्त अध्यात्मिक बाबीतच लक्ष द्यावे व ख्रिस्ती धर्माची तत्त्वे एखाद्याला आवडली व त्याने त्यात प्रवेश करण्याची इच्छा प्रकट केली तरच त्याला धर्माची दीक्षा द्यावी अन्यथा धर्मांतराचा विचार करू नये.

डॉ. हिवाळेंनी शालेय शिक्षणातुन धर्माच्या शिक्षणाचे जे उच्चाटन झाले त्यासंबधी आपले विचार मांडले. "आपल्या सर्व शिक्षणातून धार्मिक श्रद्धेचे उच्चाटन झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी अत्यंत स्वार्थी व उथळवृत्तीचे होत आहेत. म्हणून त्यास राष्ट्राची सेवा करण्याची स्फूर्ती मिळू शकत नाही. शिक्षकाने विद्यार्थ्यांवर श्रद्धेचा प्रभाव टाकला पाहिजे शाळांमधून धार्मिक उपासना करावी किंवा विशिष्ट धर्माचे शिक्षण घ्यावे असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही जगातील सर्व धर्माची तत्त्वे बहुतांशी एकच आहे. ती विद्यार्थ्यांवर ठसवली पाहिजेत."[५] धर्माचे शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांकडून नीतीमत्तेचे पालन होते अन्यथा हे विद्यार्थी पुढे जावून नास्तिक होतात. सर्व धर्मात काही चांगल्या गोष्टी असतात. त्या विद्यार्थ्यांवर बिंबवाव्यात त्यामुळे सर्वधर्मसमभावाचे तत्त्व विद्यार्थ्यांवर बिंबले जाइल त्यांचे हे विचार खरोखरच एका आदर्शापर्यंत जाऊन पोहोचलेले होते धर्म मानवनिर्मित असतो त्याचे रूप कालानुरूप बदलले जावू शकतात हे त्यांनी समाजासमोर मांडून एक आदर्श घालून देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. हिवाळे अमेरिकेतून पीएच. डी. पदवी पूर्ण करून आल्यानंतर विल्सन कॉलेजात ज्ञानदानाचे कार्य करू लागले. त्यानंतर त्यांना नागपाड्यातील ह्यूम मेमोरियल चर्चचे मॉडरेटर म्हणून निवडण्यात आले. त्यावेळी मुंबईत हे चर्च अतिशय लोकप्रिय

होते. या चर्चचे मॉडरेटर झाल्यावर डॉ.हिवाळेंनी वेगवेगळे उपक्रम सुरू केले. याचर्च मधून त्यांनी धर्मोपदेशकाचे कार्य केले. त्यांचे चर्च संदेश व प्रार्थना अतिशय लोकप्रिय होत्या. मॉडरेटर पदाच्या काळात त्यांनी वेगवेगळ्या कल्पना आमलात आणल्या. त्यात प्रामुख्याने चर्चमधील कार्यक्रम आटोपल्यानंतर काही सभासदांच्या घरी भेटी देत व त्यांच्या काही समस्या असतील तर त्या ऐकून घेऊन सोडविण्यासाठी प्रयत्न करत. प्रत्येक आठवड्याच्या कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका स्वत: तयार करत. व त्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करत. डॉ.हिवाळेंनी चर्चमधील संदेशाच्या वेळी फिल्म प्रोजेक्टर द्वारे काही फिल्म दाखविण्यास त्यांनी सुरूवात केली ही कल्पना त्यांना अमेरिकेत असतानाच सुचली होती. अमेरिकेत अशा फिल्म प्रोजेक्टरांचा मोठ्या प्रमाणात वापर होत होता. त्यामुळे श्रोत्यांवर त्याचा अपेक्षित परिणाम होत. अशा प्रकारचे कार्यक्रम आपण भारतात सुरू केले तर ते अधिक लोकप्रिय होतील याची त्यांना खात्री होती. म्हणून त्यांनी अमेरिकेतून येताना एक फिल्म प्रोजेक्टर बरोबर आणला. सरला बार्नबस म्हणतात, "प्रत्येक रविवारच्या उपासनेनंतर फिल्म दाखविण्यात येई पप्पांच्या जवळ त्यांचा प्रोजेक्टर व फिल्म होत्या टेलिव्हिजन येण्या अगोदर हा कार्यक्रम फार लोकप्रिय होता."[६] डॉ.हिवाळेंनी सुरू केलेला हा उपक्रम भारतीयांना नवीनच होता. या फिल्मच्या माध्यमातून वेगवेगळ्या चित्रफिती लोकांना दाखविण्यात आल्या त्यातील बऱ्याच अमेरिकेतील लोकांच्या प्रगती संदर्भात होत्या. त्यामुळे भारतीयांना तेथील प्रगतीविषयी जाणीव होत असे.

डॉ.हिवाळे वेळोवेळी अधिवेशने तसेच चर्चासत्रे भरवत असत. विविध धार्मिक विषयावर चर्चा घडवून आणत असत. आपले धार्मिक विचार त्यांच्यासमोर मांडत असत. 'युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' ही धार्मिक संस्था होती. या संस्थेच्या त्रैवार्षिक सभेच्या आयोजनाची जबाबदारी स्वत: घेऊन डॉ.हिवाळेंनी ते मुंबईला यशस्वीपणे पार पाडले. या अधिवेशनासाठी येणाऱ्या लोकांची राहण्याची व भोजनाची

व्यवस्था पार पाडली. अशा सभा भरविण्याने धार्मिक विचारांचे आदान – प्रदान होऊन त्या समस्या सुटण्यास मदत होते असे डॉ. हिवाळेंना वाटत होते.

डॉ. हिवाळेंना प्रथमपासून मिशनरीचा दर्जा होता. ख्रिश्चन धर्मप्रसाराच्या कार्यात त्यांनी मोलाचा हातभार लावला परंतु कोणालाही त्याच्या मर्जीविरूद्ध जावून धर्मांतराला भाग पाडणे डॉ. हिवाळेंना आवडत नसे. विल्सन कॉलेजात शिक्षण घेणारे जे ख्रिस्ती होते. त्यांच्यासाठी डॉ. हिवाळे धार्मिक व्याख्याने देत असत अशा विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी उन्हाळ्यात महाबळेश्वरला धार्मिक कॅम्प आयोजित करत, "ख्रिस्ती विद्यार्थ्यांसाठी अनेक वर्ष पप्पांनी महाबळेश्वर मध्ये धार्मिक कॅम्प घेतले. त्याचा खर्च उचलण्यात येई. पप्पा अनेक कोर्स शिकवत"[७] या विद्यार्थ्यांना महाबळेश्वर येथे घेवून गेल्यानंतर उन्हाळ्याच्या दिवसात थंड हवेच्या प्रदेशात काही राहता येत असे. तसेच त्यांना या काळात धार्मिक व नैतिक शिक्षण दिले जात त्याचबरोबर इतरही कोर्सचे शिक्षण दिले जात. या कॅम्पचा सर्व खर्च डॉ. हिवाळे स्वत: करत असत. अशा विद्यार्थ्यांकडून भावीकाळात नैतिक नियमांचे पालन व त्यांनी धर्म उपदेशक होण्याची अपेक्षा डॉ. हिवाळे करत असत. "ही मुले जेथे कोठे भविष्यकाळात जातील तेथे चर्चमध्ये अदिक्षित पुढारीपण करतील यासाठी या प्रशिक्षणाने त्यांचा पाया चांगला होईल."[८] असा त्यांचा विश्वास होता. यातून डॉ. हिवाळेंचा दूरदर्शीपणा दिसून येतो.

महाबळेश्वरमध्ये कधी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. कधी पालकवर्गासाठी प्रशिक्षण वर्ग भरवले जात. या प्रशिक्षणाच्या निमित्ताने वेगवेगळ्या खेडबबबाातील लोकांना येथे राहता येईल तसेच त्यांच्यावर धार्मिक संस्कार करता येतील हा त्यामागचा उद्देश दिसून येतो. फक्त पुरूषांनाच धार्मिक शिक्षण देऊन भागणार नाही तर स्त्रीयांनाही त्यात सहभागी करून घ्यावे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन स्त्रीपुरूषांचे मिळून वर्ग भरविले जात. स्त्रियांना धार्मिक शिक्षण दिल्यास त्या आपल्या कुटुंबावर चांगले संस्कार करू शकतील हा त्यामागचा उद्देश होता. "स्त्रियांसाठी वर्ग भरविले होते

अर्थात त्यांची राहण्याची सोय स्वतंत्रपणे केलेली होती. परंतु त्याचबरोबर कोणाची गैरसोय होणार नाही. याची काटेकोरपणे काळजी घेतली होती."[९] यामध्ये धार्मिक शिक्षणाबरोबर गायन वादन तसेच भजन कीर्तन होत असे. त्यामुळे हा उन्हाळ्याचा काळ अतिशय आनंदात जात असे. वेगवेगळ्या प्रख्यात व्यक्तींची व्याख्याने तेथे ठेवली जात असत. जेणे करून या लोकांच्या ज्ञानाचा फायदा प्रशिक्षणासाठी आलेल्या खेडूतांना मिळावा व त्यांनी आपल्या खेड्यात जावून ते विचार इतरांना सांगावेत व या ज्ञानाचा प्रसार व्हावा हा त्यामागचा हेतू होता. या शिबीराचा सर्व खर्च ते स्वत: उचलत असत व निस्वार्थपणे हे धार्मिक कार्य करत हे कार्य त्यांनी शेवटपर्यंत चालू ठेवले.

१९४३ मध्ये 'युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' या संघटनेची सभा अजमेर येथे भरली होती. या सभेसाठी महाराष्ट्रातून १८ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात हिवाळे हे सुद्धा एक होते. या सभेत त्यांनी प्रभावीपणे आपले विचार मांडले. व याच अधिवेशनात त्यांच्या असे निदर्शनास आले की, इतर महाराष्ट्रीयन प्रतिनिधींना मानहानीकारक वागणूक मिळाली आहे. त्यांचे म्हणणे कोणी ऐकून घेत नाही त्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणाचा अभाव होता. त्यांना इंग्रजी भाषा चांगल्या प्रकारे बोलता येत नसे. म्हणून त्यांनी महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या सोयी कराव्यात यासाठी प्रयत्न सुरू केले.

अहमदनगर कॉलेजची स्थापना केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या धार्मिक शिक्षणाकडे डॉ.हिवाळेंनी विशेष लक्ष दिले. "विद्यार्थ्यांना नैतिक मूल्याचे ज्ञान व्हावे नैतिक मूल्यांच्या पालनाची अपरिहार्यता उमगावी त्याच बरोबर धर्माची मूलतत्त्वे दुसऱ्याच्या धर्मा कडे नि आचरणाकडे सामंजस्याने पाहता यावे यासाठी कॉलेजातील अभ्यासोत्तर तास या विषयासाठी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी खास उपयोगात आणले."[१०] अशा विद्यार्थ्यांना या तासास उपस्थित राहण्याची सक्ती केली नाही. विद्यार्थ्यांच्या धार्मिक शिक्षणाची सोय करण्यासाठी अहमदनगर येथे 'अहमदनगर स्कूल ऑफ थिऑलॉजी ॲंड सोशल

सायन्सेस' या शाळेची स्थापना १९५८ मध्ये डॉ.हिवाळेंनी केली. या शाळेचा उद्देश स्पष्ट करताना हिवाळे म्हणतात की, "कॉलेजात सध्या ख्रिस्ती १४३ विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत त्यांच्या धार्मिक शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून ही शाळा काढण्यात आली आहे."[११] ह्या शाळेतर्फे दर रविवारी सकाळी व संध्याकाळी उपासना होत असे या शाळेत प्रामुख्याने श्रीरामपूर व बंगाल येथे असलेल्या ख्रिस्ती विद्यापिठांच्या परीक्षेकरता अभ्यास करून घेतला जात असे. या विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठाच्या परीक्षा झाल्यानंतर महाबळेश्वर येथे नेण्यात येत असे व त्यांच्या कडून ईश्वर विज्ञानाचा अभ्यास करून घेतला जात असे.

ख्रिस्ती लोकांना बायबलचे मूळ भाषेतून ज्ञान व्हावे म्हणून "बायबलचे वर्ग काढून ग्रीक भाषेत धडे देणे, बौद्धिक शिबीरे चालविणे, व्याख्याने देणे हा डॉक्टरांचा छंद होता."[१२] यासाठी त्यांनी स्वत:च्या खिशातून सर्व खर्च केला. धार्मिक शिक्षण देण्यासाठी व लोकांना ख्रिश्चन धर्माची माहिती देण्यासाठी डॉ.हिवाळेंनी उषा साप्ताहिक काढून त्यातून धार्मिक लेख लिहिले. त्यांनी आपला धार्मिक लेख लिहिण्याचा उद्देश स्पष्ट करताना, "हिंदू व मुस्लिम धर्माची माहिती ख्रिस्ती लोकांना असते तशी हिंदू व मुस्लिम लोकांना असावी ख्रिस्ती धर्मात काय आहे समजणे आवश्यक आहे. गुण्यागोविंदाने सर्व समाजाने नांदून आपल्या मातृभूमीची सेवा करावी ह्यात आपले सर्वांचे हित आहे. ख्रिस्ती धर्माची तत्त्वे काय आहेत. हे समाजाऊन सांगण्याचा आमचा उद्देश आहे."[१३] ख्रिस्ती धर्माची तत्त्वे इतर धर्मियांना समजली तर सर्व धर्मात सामंजस्य निर्माण होण्यास मदत होईल व सर्वधर्म गुण्यागोविंदाने नांदतील असे डॉ.हिवाळेंना वाटत असे.

### ५.२ डॉ.हिवाळे यांचे वाङ्मयीन कार्य :

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाज निर्माण झाला म्हणजे साहित्य निर्माण होते. समाजात घडणाऱ्या विविध घटना मनाला टोचणारे प्रसंग लेखक आपल्या

प्रतिभेच्या साह्याने मांडतो. एखाद्या कलाकृतीची निर्मिती समाजाच्या गरजेतून निर्माण होत असते. डॉ.हिवाळे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. बालपणापासूनच समाजोपयोगी कार्यात अग्रभागी राहून ते कार्य करत. वाचन, लेखन हे तर त्यांचे आवडते छंद होते. हे त्यांच्या लेखनावरून आपणास दिसून येते. त्यांनी वर्तमानपत्रातून लिहिलेले लेख, कथा, संपादकीय लेख यावरून त्यांच्या विचारांची प्रगल्भता जाणवते. अशा प्रकारचे लेखन करून त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर टाकली. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा वेध घ्यावा लागतो. त्याशिवाय त्यांचे कार्य पूर्ण होत नाही.

डॉ.हिवाळे यांच्या जीवनाचा कार्यकाल १९व्या शतकाचा उत्तरार्ध व २० व्या शतकाचा मध्यकाल होता. हा काळ पारतंत्र्याचा होता. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सर्वांची धडपड चालली होती. त्यासाठी समाजजागृती करणे आवश्यक बाब होती. साहित्यातून समाज जागृती होऊन लोक आपोआपच पारतंत्र्याचे जोखड फेकून देतील असे डॉ.हिवाळेंना वाटत होते. आधी समाजसुधारणा की राजकीय सुधारणा या वादात न पडता त्यांनी समाजसेवेला प्राधान्य दिले. १९२१मध्येच त्यांनी ज्ञानोदयचे संपादकपद स्विकारून समाजजागृतीचे कार्य हाती घेतले. संपादक असताना आपल्या बुद्धिचा कस लावून समाजसुधारणे विषयी त्यांनी अनेक लेख लिहिले. त्यांच्या सुधारकी लेखनामुळे सामाजिक सुधारणेबाबत ते महत्त्वपूर्ण कार्य करतील अशी जाणीव भारतीयांना झाली व लोकांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यात ते यशस्वी झाले. आपल्या ज्ञानपिपासू वृत्तीमुळे पुढे हे संपादकपद सोडून ते अमेरिकेत गेले. तेथेही अपार कष्ट सोसून 'Religious consciousness & the idea of God in contemporary occidental Philosophy' यासारख्या विषयात संशोधन करून पाश्चात्य राष्ट्रातील धार्मिकता व ईश्वराची संकल्पना यामागील त्यांचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले.

डॉ.हिवाळेंना समाजसुधारणेत रस होता. स्त्री सुधारणेची तर त्यांना आवड होती. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, विधवा विवाह, यासारख्या स्त्रीयांच्या प्रश्नासंबधी त्यांनी

लेखन केले होते. या विषयावर यापूर्वीही अनेक सुधारकांनी लेखन केले होते. लोकहितवादींनी शतपत्रातून विधवा विवाहाचा पुरस्कार केला होता व त्यास विरोध करणे शास्त्रास धरून नाही हे पटवून दिले होते. बाबा पदमनजींनी हाच विषय घेऊन १८५७ मध्ये 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली होती. आगरकर व इतर प्रभृतींनीही यावर झगझगीत प्रकाश टाकला होता. अशा पार्श्वभूमीवर असलेल्या "The stolen bridegroom from Indian Idylls ' या नावाच्या मिस ॲन्स्टीन ॲबट यांच्या पुस्तकावर आधारलेले 'हरवलेला बाबू' हे अनुवादात्मक पुस्तक डॉ.हिवाळे यांनी लिहिले. हे पुस्तक मुंबईच्या ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटीने १९१७ मध्ये प्रकाशित केले. यावेळी डॉ.हिवाळेंचे वय अवघे २८ वर्षाचे होते. तेव्हा पासूनच त्यांचे क्रातिकारक विचार लोकांसमोर येऊ लागले. 'हरवलेला बाबू' या कादंबरीचा विषय 'हिंदू विधवा विवाह व विधवांची दु:खे' असा आहे. थोडक्यात कादंबरीचा आशय पुढीलप्रमाणे सांगता येई ल. विवाह समारंभात अल्पवयीन नवरदेवास कोणीतरी पळवून नेतो. त्याचे खापर सांभाळायला बसलेल्या त्याच्या विधवा काकूवर फुटते. त्यामुळे सर्वजण त्या काकूवर म्हणजेच काशीवर रागावतात. तिला पांढ्या पायाची वगैरे दुषणे देतात. ती घरच्या त्रासाने घर सोडून जाऊन ख्रिश्चन मिशनरींच्या मदतीने शिक्षण घेऊन स्वावलंबी बनते. पळून नेलेला नवरदेव सुरूवातीला भीक मागण्याचे काम करतो. परंतु पुढे तो मिशनच्या संपर्कात येऊन शिक्षण घेऊन डॉक्टर बनतो. समाजसेवेचे व्रत अंगिकारतो. पुढे एका प्लेगच्या साथीत आपल्या गावाजवळच्या एका वैद्यकीय छावणीत काम करतो. त्यावेळी प्लेगची लागण झालेली एक विधवा उपचारासाठी तेथे येते. तिला आपला जीव नकोसा झालेला असतो. ती विधवा असल्यामुळे तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. डॉक्टर तिच्यावर उपचार करून तिला बरे करतात. तिची आपुलकीने चौकशी करतात सर्व हकीगत ऐकल्यावर ती आपली पत्नी आहे हे समजते तर त्याच्या हाताखाली काम करणारी त्याची काकू असल्याचे समजते. तेव्हा त्याची पुनर्भेट होते. घरी गेल्यानंतर

कुटुंबात व समाजात त्यांच्या धर्मांतर व इतर बाबींविषयी कुरबुर होते. परंतु नंतर सर्व ठिक होते. "या कादंबरीची भाषा ओघवती व प्रासादीक आहे. मांडणी नेटकी आहे केवळ ललित वाङमय म्हणून तिचा विचार केला तर मनाला चटका लावणारी आहे."[१४] या कादंबरीच्या विधवेसंबधीच्या विचारामुळे टिकाकारांनी ती विचारात घेतलेली नसावी बाबा पदमनजींची यमुना पर्यटन ही कृतीही मराठी टिकाकारांकडून प्रारंभी दुर्लक्षित झाली होती.

डॉ. हिवाळेंनी 'ज्ञानोदय' संपादकपदाच्या काळात सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विषयावर लेख लिहून या परिस्थितीवर प्रकाश टाकला व आपले समाजासमोर परखडपणे मांडले. यावेळी लिहिलेल्या राजकीय लेखांचा अभ्यास केला तरी आपल्याला १९३० नंतरच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे सत्य माहिती पडते. तसेच १९३० नंतरची जागतिक परिस्थिती इतर देशांच्या धोरणांची माहिती मिळते. हे लेख वाचत असताना दुसऱ्या महायुद्धाचे प्रत्ययकारी रूप डोळ्यासमोर उभे राहते. त्यांचे हे लेख अतिशय चिकित्सकपणे लिहिलेले आहेत. जागतिक इतिहास व भारतीय स्वातंत्र्य इतिहास लिहिण्यास इतिहासकारास या लेखांची निश्चित मदत होईल. याबरोबरच अनेक सामाजिक विषयावरही त्यांनी लेख लिहिले. हिंदुस्थानची प्रगती, हिंदुस्थानमधील वर्तमानपत्रे, अनिष्ट चालीरिती, गुरूभक्ती, सतीविषयीचे वर्तमान, गळ टोचून घेणे, पाणी शुद्ध करण्याची रित, हिंदू - मुसलमानी विद्या, स्त्री विद्याभ्यास, कन्याशाळा, लग्नासंबधी खर्च, पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, शेतकऱ्यांची दुर्दशा, मुलींचे विवाहाचे वय, रयतेची दुर्दशा व त्यावरील उपाय, सामाजिक व इतर हक्काविषयी परखडपणे त्यांनी लेखन केले. त्यांच्या निर्भीड लेखनामुळे कधी ख्रिश्चनेतर धर्मियांचा रोषही पत्करावा लागला. तरीही त्यांनी आपले कार्य अव्याहतपणे चालू ठेवले.

डॉ.हिवाळेंनी अमेरिकन लोकांना मराठी शिकविण्याचे कार्य केले. त्यांना मराठी भाषा शिकवत असताना त्यांना अनेक समस्या निर्माण होत असत. त्याचबरोबर काही भारतीयांना इंग्रजी भाषा शिकण्यात काही अडचणी येत. "अनुभव लक्षात घेऊन मराठी 'सिनॉनिम्स एक्सप्लेंड' या पुस्तकाचे संपादन केले"[१५] हे पुस्तक म्हणजे एक शब्दकोश होता. यात मराठी भाषेतील अनेक शब्दांच्या अर्थछटा इंग्रजीत कशाप्रकारे व्यक्त करता येतील ते सोदाहरण दाखविले आहे. यामुळे परदेशी लोकांना मराठी भाषा शिकणे अधिक सोपे झाले व महाराष्ट्रीयन लोकांना सुद्धा इंग्रजी भाषा शिकणे सोपे झाले.

ख्रिस्ती समाजातील लोकांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी 'ख्रिस्ती लोकशिक्षण माला' या नावाचे मासिक सुरू होते. १९३० नंतर "ख्रिस्ती लोकशिक्षन मालेचे ते संपादक व प्रकाशक झाले."[१६] यामधून त्यांनी अनेक लहानमोठ्या पुस्तिका प्रकाशित केल्या त्यात प्रामुख्याने फादर स्टीफन्स यांचे खिस्तपुराण तसेच ख्रिस्तमरणाची कथा हे पुस्तक होय. "महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्म प्रसारास आरंभ सुमारे चारशे वर्षापूर्वी झाला मराठी बोलणारे लोक ख्रिस्ती झाल्यावर त्यांच्याकरिता बरीच मराठी पुस्तके लिहिण्यात आली. पण त्यापैकी एकाच ग्रंथाची वाङ्मयाच्या दृष्टीने फार मोठी योग्यता आहे तो म्हणजे फादर स्टीफन्स नावाच्या इंग्रज मिशनरीने लिहिलेले ख्रिस्तपुराण हे होय हे काव्य ज्ञानेश्वर, नामदेव वगैरेंच्या काव्याच्या तोडीचे आहे. हे वाचकास सहज दिसून येईल या ग्रंथाची पहिली आवृत्ती इ.स.१६१६ व दुसरी १६४६ मध्ये छापून प्रसिद्ध झाली असे म्हणतात पण एकही छापील प्रत सध्या उपलब्ध नाही. १९०७ मध्ये प्रो.जे.एल.साल्ढना यांनी हस्तलिखिताच्या साह्याने एक मोठी आवृत्ती छापली ती रोमन लिपित आहे. तिच्या आधारे देवनागरी लिपीत हे उत्तरे देण्यात येत आहेत. मूळ ग्रंथ इतका मोठा आहे की, असली सुमारे दीड हजार पृष्ठे भरून जातील."[१७] फा.स्टीफन्स हे भारतात येणारे पहिले इंग्रज होते. त्यांना वेगवेगळ्या भाषा अवगत

होत्या त्यांनी मराठी भाषेत ख्रिस्तपुराण हा ग्रंथ लिहिला. परंतु त्यांच्या लेखनाच्या अस्सल प्रती राहिल्या नाहीत म्हणून डॉ.हिवाळेंनी मराठी भाषा समजणाऱ्या ख्रिस्ती लोकांना ख्रिस्त जन्म मरणाविषयी माहिती मिळावी म्हणून रोमन लिपीच्या आधारे ख्रिस्तपुराण हा ग्रंथ लिहिला.

ख्रिस्ती लोकशिक्षण मालेतील डॉ.हिवाळेंनी लिहिलेले आणखी एक पुस्तक म्हणजे बायबल व तत्संबद्ध इतिहास हे होय. "बायबल हा इस्त्राइल लोकांचा पद्धतशीर लिहिलेला राजकीय किंवा सामाजिक इतिहास नव्हे त्यात निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळ्यावेळी आपल्या काळच्या धार्मिक प्रश्नांचा उहापोह केलेला आहे. तो करीत असताना अर्थात त्यांना काही ऐतिहासीक माहितीही द्यावी लागली."[१८] या पुस्तकात त्यांनी युरोपातील ऐतिहासीक घटनांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे विशेषत: वेगवेगळ्या संस्कृतीचा उदय व अस्त याची माहिती दिलेली आहे. त्यामुळे या ग्रंथाचे ऐतिहासीक मोल विशेष आहे. ख्रिस्ती लोकशिक्षण मालेत केलेले आणखी एक पुस्तक म्हणजे प्रात:स्मरण यात योहानकृत शुभवर्तमानातील निवडक उताऱ्यांचे त्यांनी संपादन केले आहे. ते वैयक्तीक व कौटुंबिक उपासनेकरता आहे. यापुस्तकात त्यानी आजच्या तरूण तरूणींविषयी विचार मांडले आहेत आजची मुले मुली उनाड निघत आहेत त्यांना प्रार्थनेची गोडी नसते ते इश्वरावर विश्वास ठेवायला नकार देतात.याचे मुख्य कारण म्हणजे कौटुंबिक वातावरण च त्यांना घडविण्यास कमकुवत ठरत आहे. असे त्यांना वाटते. आई वडिलांना आजच्या धकाधकीच्या जीवनात मुलांकडे लक्ष देण्यास वेळ नसतो. हे आई वडील आपल्या मुलांना घडविण्याचे पवित्र कार्य विसरत आहेत. असा त्यांचा सूर आहे.

डॉ.हिवाळेंनी मराठी साहित्यात महत्त्वाची भर घातली. "डॉ.हिवाळे यांची मराठी साहित्यातील महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी संपादन केलेले ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे भाग १ व २ हे ग्रंथ होत."[१९] अमेरिकन मिशनची अहमदनगरला स्थापना

झाल्यानंतर १९४२ मध्ये ज्ञानोदय नियतकालिक सुरू केले. १९४१ मध्ये त्याला शंभर वर्ष पूर्ण झाली होती इतक्या दीर्घकाळ अव्याहतपणे सेवा करणाऱ्या नियतकालिकापैकी ज्ञानोदय हे एकमेव नियतकालिक आहे त्यांनी ज्ञानोदयाच्या शतसांवत्सरीक उत्सवानिमित्त ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्ष भाग १ व २ प्रकाशित केला. "गेल्या शंभर वर्षात अनेक उपयुक्त लेख व तऱ्हेतऱ्हेची माहिती ज्ञानोदयातून प्रसिद्ध झाली आहे. ज्ञानोदयाचे जुने ग्रंथ आता अगदी दुर्मिळ झाले आहेत. पुढच्या पिढीच्या माहितीकरता आणि शिक्षणाकरिता काही महत्त्वाचे लेख पुन्हा प्रसिद्ध करावेत म्हणून ही योजना केली आहे."[२०] ज्ञानोदयाने आजपर्यंत अनेक समाजोपयोगी लेख लिहिले. ते काळाच्या ओघात लोप पावतील तसे होऊ नये म्हणून अशा लेखांचे जतन व्हावे समाजाला सुद्धा त्याचा उपयोग व्हावा शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्र खरोखरच एक थंड गोळा होता काय याची शहानीशहा करता यावी हा हे ग्रंथ प्रकाशित करण्यामागचा उद्देश असलेला दिसून येतो. या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या वेळी त्यांची आर्थिक परिस्थिती देखील अतिशय हालाखिची होती. तरीही हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे धाडस त्यांनी दाखविले. " The Dnyanodya Board is unable to give me asingal rupee for publication of this volume my friends in America can not do very much now that there country is involed in the world war the price of paper on the other hand is going up every day , I have intirely to depend on the help rendered by friends in India "[२१] तरीही त्यांनी हा ग्रंथ प्रकाशित करून ज्ञानोदयाच्या लेखाचे जतन केले. त्याच्या वाचकांनी व मित्रांनी या कामी त्यांना मदत केली त्यांनी आपल्या अभ्यासू व चिकित्सक वृत्तीने ज्ञानोदयातील लेखांचे आठ भागात वर्गीकरण केले. १. वर्तमानपत्रे २. अनिष्ट चालीरीती ३. शिक्षणविषयक ४. स्त्रियांचे प्रश्न ५. प्रजा आणि सरकार ६. ख्रिस्ती मंडळाविषयी ७. वाङ्मय ८. विविध माहिती अशाप्रकारे सुसंबधित माहिती करून त्यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला त्यावेळी हा ग्रंथ विविध वृत्तपत्रांनी उचलून धरला त्यांचा सूर होता की, येथून पुढे सर्वच वर्तमानपत्रासंबधी अशा पद्धतीने लिखान व्हावे जेणे करून ते भावी काळात समाजाच्या

उपयोगी पडेल. "सर्व उतारे वाचनीय असून त्या त्या काळातील घडामोडींवर चांगला प्रकाश पाडणारे आहेत. आजही ते वाचकांना नवीन व मनोरंजक वाटतील"[२२] ही त्यांच्या साहित्य विषयक कार्याची पावतीच होती आजही या ग्रंथाचे ऐतिहासीक मोल महत्त्वाचे आहे. संशोधकांना व अभ्यासकांना त्याचा नेहमीच उपयोग होतो.

डॉ.हिवाळेंच्या ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्ष या ग्रंथाचे मोल किती आहे हे वेगवेगळया इतिहासकारांचे त्याविषयीचे मत जाणून घेतल्यावर आपल्याला समजते. "सुदैवाने गेल्या शंभर वर्षातील सगळी पुस्तके सध्या उपलब्ध आहे त्यामध्ये वेळोवेळी प्रसिद्ध झालेले लेख बातम्या व वृत्तांत ऐतिहासीक दृष्ट्या फार महत्त्वाचे आहेत. सन.१८७0 पूर्वी महाराष्ट्र खरोखर थंडगोळा होता काय त्यावेळी विपन्नावस्थेतून वर डोके काढण्यासाठी आमच्या लोकांनी काहीच धडपड केली नाही काय जांभेकर ,महाजन लोकहितवादी फुले यांच्यासारखे त्यावेळचे विचारी व वजनदार लोक समाजाबद्दल इतके उदासीन व बेफीकीर होते काय? याची शहानीशा करायची झाल्यास खात्रीलायक माहिती साठी अगोदर ज्ञानोदयाचे जुने अंक वाचले पाहिजे तेव्हा तेवढी साधने तुर्त आपल्या हाती आहेत पण ही गोष्ट सर्वांना शक्य नाही म्हणूनच प्रस्तुत लेखसंग्रहात साधनग्रंथ जेवढे प्रसिद्ध होतील तेवढे आपणास हवे आहेत."[२३] प्रा.गं.बा.सरदारांच्या मताचा विचार केल्यास डॉ.हिवाळेंनी खरोखरच हा ग्रंथ प्रकाशित करून एक माहितीचा समाजाला दिलेला आहे. त्यांनी हे मोठे कार्य करून समाजाला तसेच संशोधक अभ्यासकांना ऋणी करून ठेवले आहे यात शंका नाही.

डॉ.हिवाळे अहमदनगर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावरून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी वेगवेगळे सामाजिक उपक्रम हाती घेतले. १९५२च्या ऑगस्टमध्ये उषा नावाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. दोनही विभागाचे संपादन ते स्वत: करत असत. पहिल्या वर्षी चार पृष्ठांचे असणारे साप्ताहिक १९५३ च्या ऑगस्ट महिन्यापासून आठ पृष्ठांचे निघू लागले यातून त्यांनी चौफेर लेखन करून समाजजागृती केली व सामाजिक,

सांस्कृतिक व राजकीय विचार मांडले. 'उषा' साप्ताहिकातील इंग्रजी मजकूर इंग्रजी भाषा जाणकारांसाठी तर मराठी मजकूर मराठी जाणकारांसाठी असे याच्या माध्यमातुन १९५८ पर्यंत अव्याहतपणे सेवा करून नगरच्या सामाजिक व शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान दिले हे नजरेआड करून चालणार नाही. प्रकाशन व मुद्रणासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो ही गोष्ट लक्षात आल्यानंतर त्यांनी स्वत:चे उषा प्रकाशन व मुद्रणालय चालविले. ही फार खर्चीक बाब होती. त्यामुळे त्यांना मोठा ताण सहन करावा लागला कॉलेज काम सांभाळून हे मुद्रणालय व प्रकाशन स्वत: चालवून त्यादवारे त्यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली त्यात प्रामुख्याने १ प्रार्थना कशी करावी २. क्रूसावरील उदगार ३. हिंदी ख्रिस्ती मंडळाचे एकीकरण ४. मानवीस्वभाव ५. डॉ. हिवाळे यांचे धर्मपर लेख १ते ८ अशी या पुस्तकाची नावे आहेत. ही पुस्तके आकाराने छोटी असून यात धार्मिक गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

प्रार्थना कशी करावी या पुस्तकात प्रार्थनेची उपयुक्तता, मूलतत्त्वांचे महत्त्व, पवित्र शास्त्र, खरी प्रार्थना, कोठे करावी, केव्हा करावी याविषयी या पुस्तकात थोडकी परंतु अर्थपूर्ण माहिती दिली आहे. "प्रभु येशू ख्रिस्ताने आपल्या डोंगरावरील उपदेशात जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे. तसे तुम्ही पूर्ण व्हा अशी आपल्या शिष्यास आज्ञा दिली आहे. ( मत्तय ५:४८ ) अधिक साधू संतानी ही आज्ञा पाळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातल्या काही सूचना फार उपयुक्त आहे असे आम्हाला अनेक वर्षाच्या अनुभवावरून म्हणता येते. त्यापैकी काही विचार या लहानशा पुस्तकात आम्ही प्रसिद्ध करीत आहोत अध्यात्मिक जीवनाची मीमांसा अर्थातच असल्या छोट्या पुस्तकात करणे अशक्य आहे. पण व्यवहारिक दृष्ट्या हे पुस्तक उपयोगी पडेल अशी आम्हाला इच्छा आहे. या लहान आकाराचे पुस्तक आम्ही मुद्दाम तयार केले आहे. वाचक ते जवळ बाळगतील व वेळ मिळेल तेव्हा वाचतील अशी आशा आहे."[२४] या पुस्तकाचा आकार खिशात मावण्याएवढा होता.

क्रूसावरील उदगार हे डॉ.हिवाळेंचे आणखी एक पुस्तक असून त्यात येशू ख्रिस्ताने क्रूसावर जाताना कोणते उदगार काढले त्याचा आशय या पुस्तकात दिलेला आहे. धार्मिकदृष्ट्या या पुस्तकाचे मोल अनन्यसाधारण आहे त्याचबरोबर यातून कुटुंबसंस्था मातृप्रेम कुटुंबसंस्थेचे महत्त्व याविषयी मार्मिक लेखन केले आहे. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. त्याचबरोबर अध्यात्मिक विकास मंडळ यासारखी पुस्तके छापून धार्मिक कार्यात हातभार लावला.

डॉ.हिवाळेंचे सामाजिक दृष्टिकोनातून उपयुक्त असणारे व प्रौढशिक्षणाच्या कार्यास हातभार लावणारे पुस्तक म्हणजे 'अनक्षर लोकांकरिता सोपी वाचनपद्धती' हे होय. अडाणी लोकांना व नवीनच वाचायला लिहायला शिकलेल्यांना वाचनाची आवड लागावी म्हणून डॉ.हिवाळेंनी हे पुस्तक तयार केले. यात चित्रासह काही वाक्य दिलेली होती. त्यामुळे चित्रावरून शेजारी काय दिले आहे हे लगेच समजत असे व अक्षर ओळख होत असे. उदा.

" राजाचा बाग होता
राजा बागात आला
राजाला नाग दिसला
नाग राजावर धावला
राजा ओरडला
नाग, नाग, नाग......"[२५]

यासारखी छोटी-छोटी व सोपी वाक्ये देऊन नवसाक्षराला प्रोत्साहन दिले या वाक्यात एक सुसंगतता दिसून येते. एक वाक्य वाचल्यानंतर दुसरे वाक्य आपोआपच वाचकांच्या लक्षात येते. अशा पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी साक्षरता प्रचार, प्रसारात महत्त्वाचे योगदान दिले.

## ५.३ डॉ.हिवाळे व शब्दकोश :

डॉ.हिवाळेंनी अहमदनगर सारख्या ग्रामीण व दुष्काळी भागात महाविद्यालय काढून उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागात पोहोचविली तरी त्यांनी जी वाङ्मयनिर्मिती केली ती सर्वसामान्यांना माहिती नाही. "त्यांनी इ.स.१९१७ मध्ये व इ.स.१९५६ साली कोशरचना सिद्ध केल्या."[२६] व विद्यार्थ्यांना उपयुक्त असे कार्य केले. १८९१ मध्ये बाबा पदमनजी यांनी काळाची गरज म्हणून एक शालोपयोगी व गृहोपयोगी संस्कृत मराठी शब्दकोश रचला होता. ज्या प्रमाणे आपण शिकतो. त्याप्रमाणे डॉ.हिवाळेंनीसुद्धा विद्यार्थ्यांची गरज ओळखून शब्दकोश रचले आहेत. तत्कालीन विद्यार्थ्यांबरोबर आजच्या विद्यार्थ्यांची सुद्धा गरज भागविण्यासाठी हे शब्दकोश उपयुक्त आहेत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. "इ.स.१९१७ साली डॉ.हिवाळे मुंबईस होते. त्याकाळात ते पुण्याच्या लॅग्वेज स्कूलमध्ये मराठीचे अध्यापन करत असत मराठी शिकणाऱ्या इंग्रजी विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांनी याकाळात एका कोशाची रचना केली."[२७] त्याचे नाव मराठी सिनॉमिक्स एक्सप्लेन्ड होय. हा शब्दकोश इंग्रजी – मराठी असा आहे. प्रथम इंग्रजी शब्द पुढे त्याचे मराठी समान अर्थी शब्द व त्याचे इंग्रजी स्पष्टीकरण असा क्रम त्यांनी लावलेला असल्यामुळे ते समजण्यास अतिशय सुलभ वाटतात. एकूण ३७० इंग्रजी शब्दाचा विचार केलेला आहे. त्याचे समानअर्थी २०४० शब्द व त्याचा इंग्रजी अर्थ महत्त्वाचे अवतरण व काही वाक्प्रचारांसह शब्दाचा विचार प्रस्तुत शब्दकोशात केलेला आहे. हा शब्दकोश विद्यार्थ्या ंसाठी असल्यामुळे त्याची किंमतसुद्धा विद्यार्थ्यांना परवडेल अशीच म्हणजे अडीच रूपये ठेवली होती. याविषयी तत्कालीन मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणतात की, "ज्या मातृभाषा इंग्रजी आहे अशा विद्यार्थ्यांना मराठीचा अभ्यास करताना मदत व्हावी अशी दृष्टी ठेवून भास्कर पांडुरंग हिवाळे यांनी प्रस्तुत समानअर्थी 'मराठी सिनॉनिम्स एक्सप्लेन्ड' या नावाचा कोश रचला आहे."[२८] याचा उपयोग मराठी शिकणाऱ्या इंग्रजी

विद्यार्थ्यांना तर होईलच त्याबरोबरच इंग्रजी शिकणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांनाही वाक्प्रचार व म्हणींनी युक्त अशा इंग्रजी शब्दाची ओळख होईल.

डॉ.हिवाळेंनी हा शब्दकोश तयार करताना आपला अनुभव जमेस धरून त्याची रचना केली होती. ते बऱ्याच दिवस परकीय मिशनऱ्यांना मराठी शिकविणारे शिक्षक होते. त्यामुळे त्यांना विद्यार्थ्यांच्या बारीक सारीक सामर्थ्यांची जाणीव होती. त्या समस्या लक्षात घेऊन त्यांनी हा शब्दकोश तयार केला होता. त्यातील काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

उदा. “River नदी ( F ) D river – गंगानदी the Gangas

नद ( M ) a big river – These are three in India ब्रम्हपुत्रा, सिंधू शोण

फांटा ( M) - a Branch of river

डोह (M) - Deep part in river

पूर ( F ) a flood

पाट ( M ) a canal

नदीचे पात्र ariver bed ”[२९]

अशा पद्धतीचा शब्दकोश विद्यार्थ्यांसाठी फारच उपयुक्त होता बाबा पदमनजी यांनी सुद्धा शब्दरत्नावली या नावाचा असा शब्दकोश इ.स.१८६0 मध्ये रचला होता. हा शब्दकोश कवी, लेखक व वृत्तपत्रकर्ते यांना फार उपयुक्त ठरला होता. हिवाळेंचा शब्दकोशही अशाचप्रकारचा होता. त्यांनी याची रचना विद्यार्थ्यांना डोळयासमोर ठेवून केली होती.

डॉ.हिवाळेंनी १९५६ मध्ये इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साधने या ग्रंथमालेपैकी पहिले पुष्प म्हणून इंग्रजी शब्द या नावाचा शब्दकोश रचला “अहमदनगर कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साधने या नावाची एक ग्रंथमाला गुंफण्याचा आमचा विचार आहे पहिला ग्रंथ इंग्रजी शब्द आज प्रसिद्ध होत आहे.”[३0] या

शब्दकोशाची रचना अतिशय सुलभतेने केली होती त्यामुळे त्याचा उपयोग मोठ्याप्रमाणावर होत. "आपल्या विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा सुधारावी म्हणून मोठ्या परिश्रमाने त्यांनी इंग्रजी शब्द उच्चारण मराठीत दिलेला शब्दकोश छापला आणि अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अर्पण केला. विद्यार्थ्यांबद्दलचे आपले आपार प्रेम अशा रीतीने प्रकट केले आहे."[३१] एवढे करून डॉ.हिवाळे थांबणाऱ्यापैकी नव्हते त्यांनी आपली योजना आखलेली होती १९५७ साली इंग्रजी वाक्प्रचार तसेच १९५८ साली इंग्रजी पारिभाषिक शब्द यासारखी उपयुक्त पुस्तके प्रकाशित करायची योजना होती. त्यामागे कारण सुद्धा तसेच होते. "सध्या अहमदनगर कॉलेजात प्रवेश करणाऱ्या मुलामुलींचे इंग्रजी भाषेचे ज्ञान फार कमी असते असे आढळून आले. इंग्रजी माध्यम आहे तोपर्यंत उच्च शिक्षण मिळवू इच्छिणाऱ्यांचे त्यामुळे फार नुकसान होत आहे कधीतरी मराठी माध्यम होईलच पण तोपर्यंत तरी इंग्रजीचा चांगला अभ्यास व्हावा हे इष्ट आहे."[३२] आणि याच हेतूने त्यांनी ही मालिका तयार करण्याचे ठरविले होते. आजच्या आधुनिक युगात इंग्रजी वृत्तपत्रै, दैनिक व नियतकालिके यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही त्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचे ज्ञान मिळवणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत असे यातून त्यांच्या दूरदृष्टीची जाणीव होते. आज महाराष्ट्र शासनाने इंग्रजी विषय अनिवार्य केला आहे.

मुलांचा शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा ही त्यांची खटपट होती. उदा.व्हरायटी याचा अर्थ विविधता, प्रकार असा इंग्रजी शब्दकोशात आहे.

इंग्रजी चांगले येण्याच्या दृष्टीने उच्चार, आघात किती महत्त्वाचे आहेत हे वेगळे सांगण्याची गरज नाही आज महाराष्ट्रातील विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षेत मागे राहतात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे इंग्रजी कच्चे असते. आपल्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये यासाठी त्यांनी १९५६ मध्येच काळजी घेतली होती.

विद्यार्थ्यांचे इंग्रजी सुधारण्यासाठी हा कोश रचला ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे.

## संदर्भ

१. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, १० फेब्रुवारी १९३८ अंक ०६ पृ. ३

२. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदय, ३ फेब्रुवारी १९३८ अंक ०५ पृ. ३

३. कित्ता, पृ.३

४. कित्ता, पृ.३

५. हिवाळे भा.पां. : उषा, २४ नोव्हे. १९५९ अंक ४५ पृ.३

६. बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७ पृ.७७

७. कित्ता, पृ.२४४

८. कित्ता, पृ.२४५

९. हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८ पृ.१३२

१०. कित्ता, पृ.१३६

११. हिवाळे भा.पां. : उषा, २१ जाने. १९५८ अंक १ पृ.१

१२. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३ पृ.२४

१३. हिवाळे भा.पां. : उषा, १५ जाने. १९५८ अंक १ पृ.१

१४. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ.६

१५. कित्ता, पृ.७

१६. कित्ता, पृ.७

१७. फादर स्टीफन्स : ख्रिस्तपुराण, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई कालोल्लेख नाही पृ.१

१८. हिवाळे भा.पां. : बायबल व तत्संबंद्ध इतिहास, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई १९३६ पृ.१

१९. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. ८

२०. हिवाळे भा.पां. : ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे, ज्ञानोदय सोसा. मुंबई पृ.२

२१. Editorial Dnyanodaya – 1 Augest 1942 , page 16

२२. संपादक ज्ञानप्रकाश : संपादकीय ज्ञानप्रकाश, ३० ऑक्टो.१९४२ पृ.४

२३. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. १०

२४. हिवाळे भा.पां. : रोजची अध्यात्मिक प्रगती, उषा प्रकाशन, अहमदनगर १९५४ पृ.१

२५. हिवाळे भा.पां. : अनक्षर लोकांकरिता सोपी वाचन पद्धती, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई १९३७ पृ.१

२६. मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३, पृ. २७

२७. कित्ता, पृ.२७

२८. कित्ता, पृ.२७

२९. कित्ता, पृ.२८

३०. हिवाळे भा.पां. : इंग्रजी शब्द, उषा प्रकाशन, अहमदनगर १९५६ प्रस्तावना.

३१. बंडेलू शांताराम : सिनेच्या परिसरातील ज्ञानगंगा, अहमदनगर महाविद्यालय, उषा १५ जानेवारी १९५८ अंक १, पृ. ५

३२. हिवाळे भा.पां. : इंग्रजी शब्द, उषा प्रकाशन, अहमदनगर १९५६ प्रस्तावना.

❖❖❖❖❖

# प्रकरण सहावे

# मूल्यमापन

❖❖❖❖❖

# प्रकरण सहावे

## मूल्यमापन

डॉ.भा.पां.हिवाळे यांच्या कार्याचा अभ्यास करत असताना मला त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच धार्मिक कार्याविषयी विपुल माहिती मिळाली. त्या आधारे मी काही निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे. डॉ.हिवाळे यांचा जन्म २२ जाने १८८९ रोजी सोलापूर येथे झाला. त्यांना पाच बहिणी व एक भाऊ असा त्यांचा असा त्यांचा परिवार होता. त्यांचे वडील ख्रिस्ती धर्मोपदेशकाचे कार्य करीत असत. त्यांची परिस्थिती हालाखिची असल्याने बालवयातच शिक्षण घेण्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. त्यांची रवानगी अहमदनगर येथील 'अमेरिकन मराठी मिशन' च्या शाळेत झाली. येथील शाळेत त्यांच्यावर परोपकाराचे व सदाचाराचे संस्कार झाले. बालपणापासूनच अभ्यासूवृत्ती जोपासली असल्याने ते शिक्षक व विद्यार्थीवर्गात लोकप्रिय झाले. त्यांच्या बालपणीच आई व वडिलांचा प्लेगमध्ये मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचे वय १४ वर्षांचे होते. हा आघात सहन करून त्यांनी आपल्या बहीण-भावंडाच्या पालकत्वाची जबाबदारी स्विकारली. ती जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. एकतर त्यांचे स्वत:चे शिक्षण चालू होते व दुसरे आपल्या भावंडाच्या पालकत्वाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यासाठी काही कामधंदा करणे आवश्यक होते. शिक्षणाची ओढ तर जबरदस्त होती. शिक्षण सोडणे त्यांच्या तत्त्वात बसत नव्हते. त्यातच मिशनरी लोकांनी शिक्षणाचे व समाजसेवेचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवले होते. म्हणून त्यांनी शिक्षण व नोकरी दोन्हीही गोष्टी साध्य करण्यासाठी सुरवातीला अहमदनगर येथील मुलांच्या शाळेत नोकरी मिळवली त्यानंतर उच्च शिक्षणासाठी मुंबई या ठिकाणी गेले. तेथे शिक्षण घेत असतानाही वेगवेगळ्या ठिकाणी

नोकऱ्या केल्या व आपला व कुटूंबाचा खर्च भागवला. मुंबईच्या विल्सन कॉलेजची तत्त्वज्ञान विषयाची पदवी मिळवली. ते जात्याच हुशार असल्याने त्यांनी नोकरी करून शिक्षण पूर्ण केले होते. परंतु पदवी घेऊन ते थांबले नाहीत तर पुढील शिक्षणाची धडपड त्यांनी सुरू केली.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळचा विचार केल्यास परदेशी जाऊन शिक्षण घेणारांची संख्या जेमतेम होती त्यातल्या त्यात पाश्चात्य देशात जाऊन शिक्षण घेणे अवघड गोष्ट होती. भारतातील काही प्रतिष्ठित व उच्चभ्रू लोकच फक्त अमेरिका इंग्लंडसारख्या देशात जाऊन शिक्षण घेत होती. डॉ.हिवाळेंची आर्थिक परिस्थिती मात्र त्याच्या उलट होती घरचे अठराविश्वे दारिद्रय, घरात खाणाऱ्या लोकांची संख्या जास्त त्यातच कुटूंबाची जबाबदारी स्वत:कडे असल्याने उच्च शिक्षण घेणे हे त्यांचे स्वप्न स्वप्नच राहणार होते. परंतु जिद्द, चिकाटी, बुद्धिमत्ता यांच्या जोरावर माणूस काय करू शकतो याची प्रचिती डॉ.हिवाळेंचा शैक्षणिक प्रवास अभ्यासल्यावर येते. अमेरिकेला शिक्षण घेण्यासाठी जाण्याचा निश्चय करून त्यांनी अमेरिकन मराठी मिशनची मदत घेतली. अमेरिकन मराठी मिशनरींना डॉ.हिवाळेंच्या बुद्धिमत्ता, जिद्द, चिकाटी व प्रामाणिकपणा यांची जाणीव असल्याने या व्यक्तिची आपल्याला मिशनच्या कार्यात भावी काळात मदत होईल हा दृष्टिकोन समोर ठेऊन मदत केली व ते १९१७ मध्ये शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तेथे अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी हॉर्वर्ड विद्यापीठाची 'बी.डी.' थिऑलॉजिकल सेमिनरीत पदवी मिळवली. तेथे असतानाच त्यांना हार्वर्ड विद्यापीठाविषयी आकर्षण वाटू लागले व याच विद्यापीठातून संशोधन पूर्ण करावे असे वाटू लागले परंतु त्यासाठी आर्थिक सुस्थिती असणे आवश्यक होते. त्यासाठी ते १९२१ मध्ये भारतात आले. तेथे आल्यानंतर त्यांना मिशनने वेगवेगळ्या पदावर कार्य करण्यासाठी आमंत्रण दिले . परंतु त्यांना पुढील शिक्षणाची ओढ लावल्या मुळे त्यांनी आर्थिक मदत मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला व अमेरिकेला जाण्यापुरते पैसे

जमा करून पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तेथे गेल्यानंतर शिक्षणासाठीची त्यांची खरी धडपड सुरू झाली. तेथे आपल्या मित्रांच्या मदतीने वेगवेगळ्या ठिकाणी धार्मिक व्याख्याने देण्यास सुरूवात केली व त्यातून त्यांनी आपल्या शिक्षणासाठी पैसा जमा करून आपला पीएच.डी.चा प्रबंध पूर्ण केला. ही पदवी मिळविल्याने त्यांच्या आतापर्यंत केलेल्या कष्टाचे चीज झाले. त्यानंतर त्यांना अमेरिकेतील वेगवेगळ्या ठिकाणावरून नोकरीच्या संधी चालून आल्या. त्या त्यांनी स्वीकारल्या असत्या तर डॉ.हिवाळेंना अमेरिकेत राहून चांगल्या सुखवस्तू कुटुंबासारखे जीवन जगता आले असते. परंतु त्यांनी आपला निर्णय घेतला होता. तो म्हणजे भारतात येऊन समाजकार्य करण्याचा यासाठी त्यांनी १९२८ मध्ये अमेरिका सोडली व भारतात येऊन मुंबईला स्थायिक झाले. भारतात आल्यावर सुद्धा त्यांना कंपनीच्या वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी बोलावले गेले पण त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही व ते विल्सन कॉलेजात रूजू झाले त्यांनी आपले शिक्षण घेताना अथक परिश्रम घेतले होते. बालवयातच त्यांना शिक्षणाची महती कळली होती. शाळेत शिक्षण घेत असतानाच ते शिक्षण घेणाऱ्या व अशिक्षित लोकांची चिकित्सा करत होते. शिक्षणाशिवाय आपला समाज सुधारणार नाही. त्यासाठी आपण स्वत: उच्च शिक्षित होऊन समाजाला शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करावे हा विचार त्यांना बालपणापासूनच येत होता त्याकार्याची सुरूवात त्यांनी विल्सन कॉलेजातूनच केली तेथे त्यांनी वेगवेगळे कार्यक्रम करून विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची गोडी लावली. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वत: प्रयत्न केले. स्कॉलरशिप बोर्डाचे सदस्य असताना त्यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची पाहणी करून गरीब विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती मंजूर केली यावेळी त्यांचा केंद्रबिंदू हा ग्रामीण व खेड्यापाड्यातील विद्यार्थी होता. यासाठी येणारे अर्ज प्रामुख्याने शहरी भागातील होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी कमी असत त्याचे कारण शोधून डॉ.हिवाळेंनी ग्रामीण भागात कॉलेज नाही उच्च शिक्षणाच्या सोयी नाहीत तेथील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते त्यामुळे

त्यांची शिष्यवृत्ती मिळून कॉलेजची समस्या सुटली. तसेच त्यांच्या राहण्या – खाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी हिवाळेंनी स्वत: प्रयत्न केले. दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकल घेऊन देणे, अल्पदरात मेस चालविणे असे विविध उपक्रम त्यांनी राबविले.

विल्सन कॉलेजात कार्यरत असतानाच विद्यार्थी संख्येअभावी ह्यूम हायस्कूल बंद पडण्याच्या मार्गावर होते त्यावेळी हायस्कूलची सर्व जबाबदारी स्वीकारून स्वत: ते हायस्कूल व्यवस्थितपणे चालवले. त्यासाठी खेड्यापाड्यातील वाडी वस्तीवर फिरून लोकांच्या मनात शिक्षणाविषयी जागृती निर्माण केली. त्यांच्या मुलांना शाळेत दाखल करून घेतले. याबरोबरच त्यांच्या पोषण आहाराची सोय केली. आज शासनाने शालेय पोषण आहाराची जी योजना सुरू केलेली आहे तिची सुरूवात हिवाळेंनी १९४२ मध्येच केली होती. त्याबरोबरच स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या भारताला शैक्षणिक विकासाची मोठी गरज आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठीच ज्ञानदानाच्या कार्याकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यातच त्यांचा वेळ जात असे त्यामुळे कुटूंबाकडेही लक्ष देण्यास त्यांना वेळ नसे यावेळी कुटुंबाची जबाबदारी रूथबाईंनी समर्थपणे सांभाळली.

महाराष्ट्रात शैक्षणिक परिस्थितीची जाणीव झालेल्या शिक्षण तज्ज्ञांपैकी हिवाळे हे एक होते. त्यांना शिक्षणाची महती पटली होती म्हणून त्यांनी शिक्षणप्रसाराला प्राधान्य दिले. ग्रामीण जनतेचा विकास करण्यासाठी खेडोपाड्यात शिक्षणप्रसार केला. डॉ.हिवाळेंनी ग्रामीण भागात कॉलेज काढून उच्च शिक्षणासाठी स्वत: प्रयत्न सुरू केले. १९४७ पूर्वी कॉलेज काढणे सोपी गोष्ट नव्हती पण अथक परिश्रम करून ही योजना त्यांनी प्रत्यक्षात उतरवली स्वत: आर्थिक अडचणीत असताना अमेरिकेत जाऊन मित्रांकडून आर्थिक मदत मिळवली त्यासाठी काही लोकांचे उपरोधिक बोलणे सहन करावे लागले. सर्वस्वाचा त्याग करावा लागला. स्वत:च्या घरातील सर्व धन खर्च करावे लागले. आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी त्याची कधी पर्वा केली नाही.

अहमदनगरला प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय असली तरी उच्च शिक्षणापासून येथील विद्यार्थी वंचित राहात होते. एकदा कॉलेज काढण्याचा प्रयत्नही निष्फळ ठरला होता अशाही परिस्थितीत जिद्दीने २0 जून १९४७ रोजी हिवाळेंनी अहमदनर कॉलेज सुरू केले व अहमदनगर जिह्यात उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

अहमदनगर शहरावरच नव्हे तर संपूर्ण आजूबाजूचे जिल्ह्यातील शिक्षणक्षेत्रात आपल्या बुद्धिकर्तृत्वाची छाप उमटवली. उच्च शिक्षणातील उच्चभू लोकांची मक्तेदारी मोडीत काढली. विज्ञानगंगा व ज्ञानगंगा सर्वसामांन्यापर्यंत पोहोचविली त्यामुळे याभागातील शिक्षणक्षेत्रात क्रांती घडून आली. "नॉट थिंग्ज बट मेन आय डेअर यू' हे महाविद्यालयाचे 'बोधवाक्य' बनविले. व महाविद्यालयीन तरूणांना मानससेवा व समाजसेवा करण्याचे अवाहन केले.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केले त्यात म.फुले, कर्म वीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या समाजसुधारकांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची जाणीव व जागृती केली होती. ती त्यावेळची गरज होती. पुढे विसाव्या शतकात उच्च शिक्षणाच्या प्रसाराची गरज होती ती डॉ.हिवाळेंनी भरून काढण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडली. प्राथमिक शिक्षण देऊन फक्त कारकून निर्माण करण्याचा डॉ.हिवाळेंचा हेतू नव्हता. तर त्यांना आपल्या नवभारतात शिक्षक , वकील , डॉक्टर, शास्त्रज्ञ निर्माण करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी अहमदनगर महाविद्यालयाची स्थापना केली व अहमदनगर जिल्ह्यात उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा आणली म्हणून त्यांना शिक्षणमहर्षि म्हणने यथार्थ वाटते.

डॉ.हिवाळेंनी फक्त उच्च शिक्षणासाठीच प्रोत्साहन दिले असे नाही तर प्रौढशिक्षण प्रसारातही त्यांनी भरीव असे कार्य केले त्यासाठी ख्रिस्ती लोकशिक्षण मासिक चालविले. त्यातून त्यांची समाजसुधारणेची तळमळ जाणवते त्यांच्या या प्रयत्नामुळे खेड्यातील खेडूत लिहिण्यावाचण्यासाठी प्रयत्न करू लागला.

महाविद्यालयीन नवयुवकांच्या शक्तीची डॉ.हिवाळेंना कल्पना होती त्यांना विधायक कार्यात गुंतवले तर मोठे समाज उपयोगी कार्य होईल यासाठी त्यांनी कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये ग्रामसुधारणा पथक उभारले गावे दत्तक घेऊन त्या गावांमध्ये सुधारणा घडवून आणल्या. प्रत्यक्ष ग्रामीण भागात जाऊन कार्य करण्यास उत्तेजन दिले. ग्रामसफाई रस्तेबांधणी, पुल बांधणी, वृक्षलागवड, जनजागृती यासारख्या कार्या मुळे गावाचा तर विकास झालाच शिवाय विद्यार्थ्यांची ग्रामीण भागाशी नाळ जोडली गेली. डॉ.हिवाळेंनी सुरू केलेले हे ग्रामसुधारणा पथक पुढे विस्तारून त्याचे रूपांतर 'सेंटर फॉर स्टडिज इन रूरल डेव्हलपमेंट' मध्ये झाले. तेथून पुढे समाजात जाऊन काम करणारे विद्यार्थी बाहेर पडू लागले आजही या नवयुवकांच्या शक्तीची जाणीव झाल्याने महाविद्यालयीन युवकांना ग्रामीण भागात जाऊन कार्य करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. याची सुरूवात हिवाळेंनी केली होती यातूनच राष्ट्रीय सेवा योजनेचा जन्म झाला. ही योजना आता भारतभर राबविली जात आहे.

आपले विचार समाजासमोर आणण्यासाठी 'ज्ञानोदय' या नियतकालिकातून व 'उषा' मासिकातून त्यांनी वेळोवेळी लेखन केले. इतर समाजसुधारकांप्रमाणे आपली भूमिका लोकांपर्यंत पोहोचावी हा त्यामागे उद्देश होता. धार्मिक , सामाजिक व शैक्षणिक स्वरूपातील अनेक लेख त्यांनी लिहिले. लेखन करण्याबरोबरच संपादकपदाची जबााबदारीही यशस्वीपणे सांभाळली. एकट्यानेच समाजसुधारण्यासाठी प्रयत्न न करता आपल्या प्राध्यापकांनीही त्यात भाग घ्यावा यासाठी त्यांनी सेवा नावाचे नियतकालिक कॉलेज तर्फे काढण्यास प्रोत्साहन दिले.

शैक्षणिक, सामाजिक कार्य करण्याबरोबरच तत्त्वचिंतक लेखक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याबरोबरच ख्रिस्ती मिशनरींच्या व महाराष्ट्रातील ख्रिस्ती धर्मियांच्या संदर्भातील विविध उपक्रमाने ते सहभागी होत असत. या माध्यमातून वेगवगळ्या समस्या सोडविण्याचे काम त्यांनी केले. तसेच वेळोवेळी भरणाऱ्या अधिवेशने व चर्चा

सत्रांना ते उपस्थित राहात. याबरोबरच कार्यशाळा व शिबीरांचे यशस्वी आयोजन करून समाजजागृती घडविण्यासाठीही त्यांनी अथक परिश्रम केले.

डॉ.हिवाळेंचा सर्वधर्मसमभाव दृष्टिकोन त्यांच्या विचार व कृतीतून जाणवतो. महाविद्यालय सुरू झाल्यानंतर त्यांनी सर्व धर्मिय विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला त्यामध्ये कोणताही भेदभाव केला नाही. गावोगावी भेटी देऊन विद्यार्थी व पालक यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला. काही खेड्यांमध्ये मोफत वसतिगृह बांधली. यातून खेड्यांच्या विकासास त्यांनी कसा हातभार लावला ते जाणवते.

डॉ.हिवाळेंनी वेगवेगळ्या धार्मिक अधिवेशनात भाग घेऊन पाश्चात्यांना दाखऊन दिले की, भारतीय हे युरोपियनांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत. यावरून ते पाश्चात्य धार्जिने नव्हते, तर भारतीयांनी व्यवहारी बनुन आधुनिकतेची कास धरावी ही त्यांची भूमिका होती.

डॉ. हिवाळे यांच्या कार्याचा वेध घेतला असता आपल्याला जाणवते की, सामान्य कुटुंबात जन्म घेऊन सुद्धा त्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, हुशारी, कृतीशिलता, ध्येयनिष्ठा, चिकाटी यांच्या जोरावर असामान्य असे कार्य केले व देशालाच नव्हेतर विदेशात सुद्धा आपले नाव उज्वल केले. त्यांनी जो शिक्षणसंस्थेचा पाया घातला त्यावर आज मोठी इमारत उभी आहे व देशातील नावाजलेली संस्था म्हणून त्या संस्थेकडे पाहिले जाते. स्वातंत्र्योत्तर भारताला या शिक्षणसंस्थेत अनेक शिक्षक डॉक्टर, वकील, इंजिनियर, तंत्रज्ञ, राजकारणी, कलाकार पुरविले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात लागणाऱ्या शिक्षित वर्गाची गरज डॉ.हिवाळेंनी भरून काढण्यास हातभार लावला पर्यायाने देशविकासास हातभार लावला हे त्यांचे कार्य नजरेआड करून चालणार नाही.

डॉ.हिवाळे यांनी अतिशय बिकट परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले होते. त्यांचा शैक्षणिक प्रवास विचारात घेतल्यास याची कल्पना येते. यावरून त्यांच्याकडे असलेली ध्येयनिष्ठा, चिकाटी या गुणांची जाणीव होते. दारिद्रयामुळे खचून न जाता

संकटाला सामोरे जाण्याची व त्यातून मार्ग काढण्याची त्यांची वृत्ती होती. आपल्याला शिक्षण घेण्यासाठी जे कष्ट घ्यावे लागले तसे इतरांच्या बाबतीत होऊ नये यासाठी त्यांनी अहमदनगर सारख्या ग्रामीण भागात महाविद्यालय सुरू करून या परिसरात ज्ञानगंगा आणली. त्यामुळे उच्च शिक्षणातली उच्चभ्रू लोकांची मक्तेदारी मोडीत निघाली. त्यामुळे तेच खरे शिक्षणमहर्षी होत.

ज्ञानोदय सारख्या जुन्या वृत्तपत्राचे ते दीर्घकालीन संपादक होते. त्यांनी या वृत्तपत्रामार्फत आपले सुधारकी विचार समाजासमोर मांडले व समाजसुधारणा घडवून आणण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. त्यामुळे त्यांचे सामाजिक कार्य इतर कोणत्याही समाजसुधारकांच्या कार्यापेक्षा कमी महत्त्वाचे नाही, हे मान्य करावे लागते. प्रौढ शिक्षण क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आज जो प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम सरकार हाती घेत आहे. त्याची सुरूवात डॉ.हिवाळेंनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच केली होती. म्हणून त्यांना प्रौढ शिक्षणाचे अग्रदूत म्हणणे वावगे ठरणार नाही.

डॉ.हिवाळेंनी ब्रिटीश काळात जो काळा – गोरा भेदभाव होत होता तो नाहिसा करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय लोक गोऱ्या लोकांपेक्षा कोणत्याही गुणात कमी नाही हे त्यांनी आपल्या बुद्धिचातुर्य व दीर्घोद्योगीपणातून दाखवून दिले.

डॉ.हिवाळेंनी फक्त ख्रिश्चन धर्मियांसाठीच कार्य केले असे काहींना वाटते. परंतु ते खरे नाही. त्यांचे कार्य धर्मापुरते मर्यादित नव्हते तर ते समाजातील दीन दुबळया व दलितांसाठी केलेले कार्य होते. एकुणच त्यांच्या जीवनातील संपूर्ण कार्याचा आढावा घेता त्यांचे कार्य हे आखिल मानव समाजासाठी, धर्मनिरपेक्षपणे केलेले कार्य होते हे सिद्ध होते.

❖❖❖❖❖❖

## परिशिष्ट एक

# संदर्भ ग्रंथ सूची


१ कीर धनंजय : म. जोतिबा फुले, मुंबई १९१३

२ ग्रोवर बी.एल / बेलेकर एन.के : आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद प्रकाशन नवी दिल्ली, २००३

३ चिटणीस कृ.ना.(संपा) : इतिहास संशोधन पत्रिका, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे १९९०

४ प्रधान.ग.प्र. : संपा. आगरकर लेखसंग्रह, नवी दिल्ली, १९७१

५ फादर स्टीफन्स : ख्रिस्तपुराण, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई

६ बार्नबस सरला : मर्मबंधातली ठेव, भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर २००७

७ मोरजे गंगाधर : डॉ.भा.पां.हिवाळे जीवनकार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर १९७३

८ दीक्षित राजा : आधुनिक भारताचा व चीनचा इतिहास, प्रगती बुक्स, १० वी आवृत्ती पुणे २००४

९ सरदार ना.य.मिरीकर : अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, अहमदनगर

१० हिवाळे भा.पां. : ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे, ज्ञानोदय सोसा. मुंबई

११ हिवाळे भा.पां. : बायबल व तत्संबंद्ध इतिहास, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई १९३६

१२ हिवाळे भा.पां. : अनक्षर लोकांकरिता सोपी वाचन पद्धती, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई १९३७

१३ हिवाळे भा.पां. : इंग्रजी शब्द, उषा प्रकाशन, अहमदनगर १९५६

१४ हिवाळे भा.पा. : रोजची अध्यात्मिक प्रगती, उषा प्रकाशन, अहमदनगर १९५४

१५ हिवाळे रूथबाई : आमचे कृतार्थ सहजीवन , विदर्भ मराठवाडा बुक कंपनी १३२० शुक्रवार पेठ, पुणे १९६८

१६ हुद्देदार माधुरी : भास्करायण, ऋतू प्रकाशन, अहमदनगर २००८

## नियतकालिके

१ ज्ञानोदय.
२ उषा.
३ दै. लोकसत्ता.
४ दै. समाचार.
५ दै. लोकमत.

# परिशिष्ट दोन

## डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांची छायाचित्रे